# धर्म आणि संविधान

सुरेश सावंत



# धर्म आणि संविधान

# धर्म आणि संविधान

सुरेश सावंत

**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**
**अन्नपूर्णा परिवार**

सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

E-mail : ammco-ordinatorpune@annapurnapariwar.org
ammco-ordinatormumbai@annapurnapariwar.org

Website : www.annapurnapariwar.org

किंडल आवृत्ती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
मो. : ९३७२७१५४२१, ९९२२९६७०००

किंमत : ₹ ६०/-

**ददददददददद**

**लेखक :** ददददद

मुखपृष्ठ : दददददद

**किंमत : ₹ ६०/-**

**प्रकाशक**
**डॉ. मेधा पुरव सामंत**
**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अन्नपूर्णा परिवार**
सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रणस्थळ**
अंजूम बाइंडिंग वर्क्स, हमीद शेठचा गाळा, मेसेंट रोड, फ्रि वे समोर,
खांब क्र. २००, शिवडी (पू.), मुंबई - ४०००१५, दूरध्वनी : २४९८५२९०



# प्रकाशकाचे मनोगत



श्री. सुरेश सावंत यांनी लिहिलेले 'धर्म आणि संविधान' हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. 'दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'च्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. आमची ही संस्था व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. दरवर्षी एका महत्त्वाच्या विषयावरील एक पुस्तक प्रकाशित करण्याची आमची प्रथा आहे.

या वर्षी 'धर्म आणि संविधान' हा विषय आम्ही सर्व संपादक मंडळाच्या संमतीने निवडला, याचं कारण सध्या समाजामध्ये चाललेल्या घडामोडी! धर्म हा राजकारणाचा आणि अर्थकारणाचा एक भाग बनताना दिसत आहे. यामुळे आम्हाला सर्व संपादक मंडळाला असं वाटलं की, या विषयावर एक चर्चा आणि एक जाणीव जागृती कार्यक्रम असा हाती घेतला पाहिजे आणि त्यानुसार आम्ही श्री. सुरेश सावंत यांना हे पुस्तक लिहिण्याची विनंती केली.

आमच्या विनंतीला मान देऊन श्री. सुरेश सावंत यांनी अतिशय कमी वेळात दीड ते दोन महिन्यांत फार मोठे पुस्तक नाही, छोटी पुस्तिका लिहून दिली. श्री. सुरेश सावंत यांनी अतिशय सोप्या भाषेत ही पुस्तिका लिहिलेली आहे आणि नुसती सोप्या भाषेत नसून त्यामध्ये खूप चांगली प्रत्येक धर्माची उदाहरणे घेतलेली

आहेत. संविधानाशी प्रत्येक धर्माचं नातं आणि कशा प्रकारे धर्म हा राजकारणाचा भाग असू नये, कुठलाही राजकीय पक्ष आणि सरकार हे धर्माधिष्ठित नसावं अशा प्रकारचे त्यांनी प्रतिपादन केलं आहे तेही त्यांनी उदाहरणांच्या आधारे! पुरावे देताना सुद्धा खूप किचकट, क्लिष्ट न करता, सोप्या भाषेत सर्वसामान्य वाचकांना पोहोचवण्यासारख्या भाषेत लिहिलेले आहे.

याबद्दल खरोखर श्री. सुरेश सावंत यांचे किती आभार मानावे तेवढे थोडे. मी माझ्या स्वत:च्या वतीने तसेच संपादक मंडळाच्या वतीने लेखक श्री. सुरेश सावंत यांचे मन:पूर्वक आभार मानते.

हे पुस्तक आम्ही माझे वडील कॉ. दादा पुरव यांच्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ १९ ऑगस्ट २०२२ रोजी प्रकाशित करणार आहोत. त्या नंतर हे पुस्तक अन्नपूर्णा परिवारच्या वेबसाइटवर वाचकांसाठी विनामूल्य उपलब्ध असेल आणि लवकरच ह्याचं इंग्लिश भाषांतरसुद्धा आम्ही करून घेऊ आणि येत्या काही महिन्यांतच ते ही प्रकाशित होऊन वेबसाइटवर उपलब्ध राहील, असे सर्व वाचकांना आश्वासन देते. या पुस्तकाच्या वाचनाचा लाभ अनेक वाचक घेतील, अशी आशा बाळगते.

धर्म, राजकारण आणि अर्थकारणाचा भाग बनणं आणि कुठलंही सरकार धर्माधिष्ठित असणं धोकादायक आहे हा विषय समाजापर्यंत पोहोचेल व अनेकांना पटेल, अशी आशा बाळगून हे पुस्तक वाचकांना अर्पण करत आहे.

**डॉ. मेधा पुरव-सामंत**
**पुणे**

■



# ही पुस्तिका कशासाठी?

ही पुस्तिका लिहीत असताना उदयपूरमध्ये एक निर्घृण खून झाला आहे. दोन मुस्लीम तरुणांनी कन्हैयालाल नावाच्या हिंदू शिंप्याची त्याच्या दुकानात माप घेण्याच्या बहाण्याने येऊन तलवारीचे बेछूट वार करत हत्या केली. त्यांना अटक झाली. त्यांच्यावर पुढील कारवाई सुरू आहे. उदयपूर शहरात या घटनेविरोधात उग्र निदर्शने झाली. जाळपोळ झाली. कर्फ्यू लागला. एरवी, पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेले हे शांत शहर खूप अस्वस्थ झाले. तेथील तसेच देशातील अन्य भागांतील मुस्लीम समाजात सध्या असुरक्षिततेची भावना आहे. या घटनेत पुढील उत्पाताची भीती आहे.

ही भीती यासाठी की, एका हिंदूचा दोन मुसलमानांनी आपसातील वैयक्तिक हेवेदाव्यांतून हा खून केलेला नाही. तर त्यांच्या दृष्टीने पैगंबरांचा अवमान केल्याची ही शिक्षा आहे. खून करणारे व ज्याचा खून झाला ते परस्परांच्या ओळखीचेही नव्हते. नुपुर शर्मा या भाजपच्या प्रवक्त्या बाईंनी काही दिवसांपूर्वी पैगंबरांचा अवमान करणारी विधाने जाहीरपणे माध्यमांवर व्यक्त केली. या नूपुर शर्मांना पाठिंबा देणारी पोस्ट कन्हैयालाल यांनी समाजमाध्यमांवर टाकली होती. खुन्यांच्या लेखी नुपूर शर्मांप्रमाणेच त्यांना पाठिंबा देणारा कन्हैयालालही धर्मद्रोही होता. अशा धर्मद्रोह्याला काही मुस्लीमदेशांत देहांताची शिक्षा आहे. 'सच्चे मुसलमान' म्हणून हे धर्मकर्तव्य खुनी मुस्लीम तरुणांनी पार पाडले. हत्या करून ते बेनाम राहिले नाहीत. तर त्यांनी या हत्येचा व्हिडीओ करुन, या हत्येची जबाबदारी घेऊन असे करू धजणाऱ्यांना जाहीर इशारा दिला. नूपुर शर्मांनाही हीच शिक्षा त्यांच्या लेखी आहे. पण त्या कडक सुरक्षेत आहेत. कन्हैयालाल हा सामान्य टेलर त्यांना सहज सापडला.

अमरावती शहरात उमेश कोल्हे नावाच्या एका केमिस्टची हत्या झाली. त्याही बाबत नूपुर शर्माची कोल्हेंनी बाजू घेतल्याने त्यांचा खून झाला, असा नवा दावा पोलिसांनी राज्यातले सरकार बदलल्यावर केला आहे. या घटनांचे निमित्त साधून

हिंदूंच्या मनातल्या स्वाभाविक संतापाला चेतवणे आणि मुस्लिमांवरील हल्ल्यांना प्रवृत्त करणे हे हिंदूंच्यातील कट्टरपंथी करू शकतात. या हिंदू कट्टरपंथीयांच्या नावे अशा हत्या वा हिंसा गेले पाऊण दशक अगणित आहेत. हिंदू-मुस्लीम तणाव हा जुना मामला. पण केंद्रात मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार आल्यानंतर हिंदू कट्टपंथीयांना विलक्षण जोम चढला आहे. गुजरातमधील उना शहरात गाईंना मारून नेत असल्याच्या वहिमावरून काही दलित युवकांना बेदम मारहाण करून त्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवरून या कट्टरपंथीयांनी प्रसारित केल्याचे आपण पाहिले आहे. उत्तर प्रदेशातील दादरी येथे अखलाक या मुस्लीम इसमाच्या घरी गोमांस असल्याच्या संशयावरून त्याच्या घराची तोडफोड करून त्याची हत्या करण्यात आली. पुण्यात मोहसीन या आयटीत नोकरी करणाऱ्या शिक्षित युवकावर हिंदूंच्या अवमानाचा आळ घेऊन खून करण्यात आला. या खुन्याचा नंतर काहींनी शौर्य पुरस्कार देऊन सत्कारही केला. उना, दादरी आणि पुणे या तिन्ही ठिकाणचे आरोप खोटे निघाले. केवळ संशयावरून मुसलमान वा दलित यांच्याविषयीच्या द्वेषापायी हे खून झाले. ही मालिका आजही चालू आहे.

या घटनांमधून काही प्रश्न आपल्या मनात उभे राहतात. राहायला हवेत.

उदयपूरमध्ये ज्याचा खून झाला त्याने इस्लामच्या पूज्य प्रेषितांचा अवमान केला. उना, दादरी येथे गोहत्येचे पातक केल्याचा आरोप होता. तर पुण्यात हिंदूंच्या पूज्य व्यक्तीचा अवमान केल्याचा आरोप होता. हे आरोप खरे असोत वा संशय असो. त्यांच्या निराकरणासाठीचा कायद्याने घालून दिलेला मार्ग आहे, तो म्हणजे पोलिसांत तक्रार. पोलीस चौकशी व गरज पडल्यास अटक करतील. न्यायालयात खटला भरेल. सुनावणी, साक्षी-पुरावे होतील. न्यायालय निकाल देईल. खालच्या कोर्टाचा निकाल मान्य नसेल तर वरच्या कोर्टात जाता येते. न्यायालयाचा निकाल मनासारखा वा बरोबर असेलच असे नाही. साक्षीपुराव्याअभावी अथवा कायद्याचा वेगळा अर्थ लावल्याने आरोपी सुटू शकतो वा त्याला नाहक शिक्षाही होऊ शकते. कायद्याच्या राज्यात कायद्याने करावयाची ही प्रक्रिया आपण संविधानाद्वारे स्वीकारली आहे. संविधानाच्या उद्देशिकेत म्हटल्याप्रमाणे हे संविधान आपण अंगीकृत, अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण केले आहे. म्हणजे त्याच्या पालनाला आपण स्वत:हून बांधील आहोत.

अशा वेळी आरोपीला स्वत: शिक्षा करण्याचा, कायदा हातात घेण्याचा अधिकार या खुन्यांना, हिंसा करणाऱ्यांना दिला कोणी? आरोप खरा, खोटा, संशय काहीही असो. कायद्याच्या मार्फतच त्याची तड लागली पाहिजे, हे यांना का मान्य नाही?



याचे एक कारण धर्माबद्दलचा या लोकांनी लावलेला अर्थ आणि दुसऱ्या धर्म-जातीबद्दलचा द्वेष हे आहे. माझ्या धर्मातील आराध्याबद्दल कोणी काही अवमानकारक बोलले तर त्याला शिक्षा करणे हे माझे धर्मकर्तव्य आहे, हा समज यांच्या मनात खोल रुजलेला असतो. पैगंबरांच्या अवमानाबद्दल काही देशांत असेल देहांताची शिक्षा. आपल्याकडे ती नाही. आपल्याकडे या अवमानासाठी वेगळ्या कायदेशीर तरतुदी आहेत. पण जिथे मृत्युदंडाची शिक्षा ईशनिंदेला आहे, तेथेही ती शासनच देते. भली-बुरी न्यायालयीन प्रक्रिया करून देते. पाकिस्तानातही हा कायदा आहे. पण अजून तरी तिथे कोणाला मृत्युदंड दिलेला नाही. जे काही असेल ते शासन करेल. कोणी व्यक्ती तिला वाटले म्हणून पाकिस्तानात किंवा त्यासारख्या ईशनिंदेला मृत्युदंडाची शिक्षा असलेल्या देशात आपणहून आरोपीचा खून शिक्षा म्हणून करू शकत नाही. भारतात तर नाहीच नाही. आपल्या घटनेने हा अधिकार व्यक्तीला दिलेला नाही. उलट आरोपीच्या माणूस म्हणून असलेल्या अधिकाराला जपण्याची आपली भूमिका आहे. शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एक निरपराध चुकीने अपराधी सिद्ध होऊ नये, ही दक्षता आपल्या न्यायप्रक्रियेत घेतली जाते. अशा वेळी आपल्याकडच्या या स्वयंघोषित दंड देणाऱ्यांना शासनाने चाप बसवलाच पाहिजे. पण समाजानेही ठामपणे हे आम्हाला चालणार नाही, असे बजावले पाहिजे.

तथापि, समाजाच्या मनातच आमच्या भावना दुखावणाऱ्याला, कठोर गुन्हा करणाऱ्याला जागेवर न्याय देण्याची धारणा रुजू लागली असेल, तर त्याहून घातक काही नाही. हैद्राबादला बलात्काराच्या आरोपींना एनकाऊंटरमध्ये मारून चटदिशी न्याय करणाऱ्या पोलिसांवर लोकांनी याच भावनेतून फुले उधळली होती. पुढे हे एनकाऊंटर जाणूनबुजून करण्यात आले होते, हे सिद्ध झाल्याने आता ते करणाऱ्या पोलिसांवरच कारवाई सुरू झाली आहे. जे मारले गेले ते खरोखरच गुन्हेगार होते की लोकांच्या मनातील रोष शमवायला सापडेल त्यांना पकडून ठार करण्याचा शॉर्टकट पोलिसांनी अवलंबला होता, हे आता कळणे कठीण आहे. पोलीस आणि त्या मागे असलेले चटदिशी न्यायाचे समाजमन यांनी निरपराधांचा हा हकनाक बळी घेतलेला असू शकतो.

उदयपूरच्या घटनेनंतर नुपुर शर्मांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेली तंबी गरजेची होती. तुम्ही ज्या रीतीने टीव्हीवर पैगंबरांविषयी बोलत होता, ते अवमानकारकच होते. आता देशात जे घडत आहे, त्याला तुम्हीच जबाबदार आहात. देशाची तुम्ही माफी मागितली पाहिजे, असे खरमरीतपणे न्यायालयाने त्यांना बजावले आहे.

आज आधुनिक काळात, जगातील देश संविधानाने, कायद्याने चालत असताना प्राचीन काळातले धर्म किती प्रचंड प्रभाव गाजवत आहेत, हे आपल्याला इथे दिसते. हा धर्म काय प्रकार आहे? त्याचे माणसाच्या आयुष्यातले प्रयोजन

काय? त्याच्या नावाने वा त्याचा अर्थ लावून आज जे चालले आहे, त्याला या धर्माची मान्यता आहे का? त्याच्याशी ते सुसंगत आहे का? आणि ते काहीही असले तरी आजच्या कायद्याच्या राज्यात त्याचे स्थान काय असायला हवे?... याची स्पष्टता आपल्याला असणे गरजेचे आहे. अन्यथा आपला सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनव्यवहारच कुंठित होऊ शकतो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी तसेच समाजात सुधारणा व्हाव्यात म्हणून जे लढले, त्यांनी जी आधुनिक मूल्ये पुरस्कृत केली आणि पुढे ती घटनेत संकलित करून आपल्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ उभारला ते सर्व मातीमोल होऊ शकते. एका भयाण अराजकाला आपण आमंत्रण देऊ. जे आपल्या पूर्वसुरींनी कमावले त्याला खिंडार तर आता पडले आहेच. ते लवकरात लवकर बुजविण्याची गरज आहे.

या प्रश्नांच्या विविध पैलूंची थोडी तपशिलात, पण खूप सैद्धांतिक वा शोधप्रबंधाच्या रीतीने नव्हे, आपण या पुस्तिकेत चर्चा करणार आहोत. धर्म आणि त्याचे माणसाच्या जीवनातले प्रयोजन, संविधान आल्यावर त्याचे धर्माशी ठरलेले नाते, त्याचे विविध घटक, संविधानाशी असलेल्या धर्माच्या या नात्यात येत गेलेले पेच, आजची आव्हाने आणि पुढील दिशा शोधण्याचा प्रयत्न आपल्याला इथे करायचा आहे.

हा प्रयत्न आहे. त्यातील मते अर्थातच निर्णायक नाहीत. नव्या संदर्भात, नव्या आकलनात त्यांची फेरमांडणी होऊ शकते. आपले भोवताल सजगपणे पाहण्याचा आणि त्यात सम्यक बदलासाठी आपल्या परीने खटपट करणाऱ्या, अशा खटपटींना पूरक वा त्यांचे हितचिंतक राहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून या पुस्तिकेतील हे विवेचन आहे.

ते अधिक पुढे जाण्यासाठी आपला प्रतिसाद, सूचना अपेक्षित आहेत.

हे सर्व लिहिण्यासाठी मला उद्युक्त करणारे ज्येष्ठ कामगार नेते कॉ. सुरेश धोपेश्वरकर आणि ज्यांच्या वतीने हे पुस्तक निघत आहे तो अन्नपूर्णा परिवार, त्याच्या संस्थापक डॉ. मेधाताई पुरव सामंत यांचे मनःपूर्वक आभार. पद्मश्री प्रेमाताई पुरव यांना अभिवादन!

ज्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा विचारांचा खल करणाऱ्या लेखनाला अन्नपूर्णा परिवारातर्फे समाजापुढे आणण्याचा प्रयत्न केला जातो, ते डाव्या, प्रगतिशील चळवळीतील आदरणीय नेते, दिवंगत कॉ. दादा पुरव यांच्या विचार व स्मृतीस मनोभावे अभिवादन.

**सुरेश सावंत**

■



# धर्म : स्वरूप व प्रयोजन

सर्व प्रमुख धर्म हजार ते चार हजार वर्षे जुने आहेत. तथापि, मनुष्यमानसावरील त्यांचा प्रभाव, समाजजीवनातील त्यांचा हस्तक्षेप आजही ताजा आहे. सृष्टीतली अनेक रहस्ये उलगडणारे आजच्या इतके प्रगत विज्ञान नव्हते, सार्वजनिक व राजकीय व्यवहाराचे नियमन करणारे संविधान किंवा राष्ट्र राज्य नव्हते, अशा काळात या गरजा धर्म भागवत होता. ती गरज आता उरलेली नसतानाही धर्माला माणसांच्या मनात तसेच सामाजिक जीवनात कळीचे महत्त्व आहे. मध्ययुगीन राजेशाहीच्या काळातील सम्राट अकबराने 'दीने इलाही' नावाचा नवा धर्म काढण्याचा प्रयत्न केला, हे समजू शकतो. पण आधुनिक काळातील महात्मा फुले यांनाही 'सार्वजनिक सत्यधर्म' स्थापावासा वाटतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या भारतीय संविधानाच्या शिल्पकाराला अडीच हजार वर्षांपूर्वीच्या बुद्धाचा धम्म आपल्या लाखो अनुयायांसह अनुसरावासा वाटतो याचे गमक काय?

म्हणजेच व्यक्तीची, समाजाची काहीएक महत्त्वाची गरज धर्म आजही भागवतो. संविधान, राष्ट्र राज्य, विज्ञान किंवा अन्य कोणतेही घटक ही गरज भागवायला अपुरे पडतात. म्हणूनच ज्यांना समाजाच्या गतीचा अभ्यास करायचा आहे, ज्यांना समाज अधिक न्याय्यपूर्ण बनवायचा आहे, त्या अभ्यासक किंवा कार्यकर्त्यांना धर्माला टाळता येत नाही. समाजबदलाच्या दिशेचा वेध घेण्यासाठी धर्माच्या आजच्या प्रयोजनाचा, लोकमनातील व लोकजीवनातील त्याच्या अस्तित्वाच्या संदर्भांचा विचार करावाच लागतो.

काही संकल्पनांचे स्वरूप आधी नक्की करू.

**धर्म म्हणजे काय?**

ज्याला आपण धर्म म्हणतो त्याचा अर्थ सगळीकडे एक नाही. ज्यांना आपण नंतर धर्म म्हणू लागलो त्यांनी त्यांच्या स्थापनेच्या वेळी त्याला धर्म म्हटलेच होते असे नाही. ख्रिस्ती आणि इस्लाम हे Religion आहेत. म्हणून पाश्चात्त्यांनी

आपल्याकडच्या धर्मांनाही त्याच दृष्टीने पाहिले व रिलिजन म्हटले. आपणही ख्रिस्ती व इस्लाम यांना धर्म म्हटले. एकमेकांचे भिन्न भाषांतले समानार्थी शब्द म्हणून वापरत असलो तरी रिलिजन व धर्म यांचा अर्थ एक नव्हे. आपल्याकडे धर्म हा शब्द कर्तव्य वा कर्तव्यांची सूची या अर्थाने आहे. एक गॉड किंवा अल्ला, एक धर्मग्रंथ, एक संस्थापक, सर्वसाधारण विधींचे निर्देश ही ख्रिस्ती किंवा इस्लाम धर्माची वैशिष्ट्ये हिंदू धर्माला वा त्याआधीच्या वैदिक धर्माला लागू पडत नाहीत. हिंदू धर्माचा एक संस्थापक, एक ईश्वर, एक धर्मग्रंथ, उपासनेची सर्वसाधारण समान रीत नाही. बौद्ध व जैन धर्मात ईश्वरच नाही. बौद्ध धर्मात भिख्खूंसाठी दीक्षा होती. सर्वसामान्य उपासकासाठी असा दीक्षाविधी नव्हता. ज्याला आज आपण हिंदू म्हणतो, ती हिंदू संज्ञा हिंदूंच्या प्राचीन ग्रंथांत आढळत नाही. म्हणजेच आधी जे अस्तित्वात होते त्याचे नंतर नामकरण केले गेले. भारतात प्राचीन काळापासून असलेल्या विविध संप्रदायांचा संच म्हणजे आजचा हिंदू धर्म असे म्हटल्यास वावगे ठरू नये. जगण्याची पद्धत (Way of life) असे त्यास म्हटले जात असले, तरी तीही एकसारखी नाही, असे हे धर्माचे स्वरूप होते. वैदिक चाणक्याचा शिष्य चंद्रगुप्त जैन होतो, चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार वैदिक धर्म स्वीकारतो तर बिंदुसाराचा मुलगा अशोक बौद्ध बनतो. आजोबा, पिता व मुलगा तिघांचे तीन वेगळे धर्म. सम्राट अशोक बौद्ध, तरी त्याच्या राज्यात सर्व धर्मांच्या प्रति समान व्यवहार. धर्म या संज्ञेच्या अर्थाचा व स्वरूपाचा हा असा विस्तृत प्रवाही अवकाश आहे.

तरीही आज मात्र हिंदू, मुस्लीम, ख्रिस्ती, बौद्ध, जैन आदींना आपल्याकडे सरसकटपणे धर्मच म्हटले जाते आणि ते रिलिजन या अर्थानेच. या संज्ञांचा इतिहास काहीही असला तरी समाजमानसात त्यांचा आजचा अर्थ एकच आहे. तो म्हणजे रिलिजन.

### धर्म व अध्यात्म एकच आहे का?

रिलिजन या अर्थाने असलेला धर्म आणि अध्यात्म एका अर्थाचे दोन शब्द नव्हेत. म्हणजे धर्माचा अध्यात्म हा एक घटक असतो. त्याचबरोबर धर्मात विधी, नीतिनियम हा एक महत्त्वाचा घटक असतो. हे विधी, नीतिनियम आणि ईश्वरादी मान्यता यांमुळे वेगवेगळे धर्म ओळखले जातात. अध्यात्म हे विशिष्ट धर्माशी जोडलेले असलेच पाहिजे असे नाही. ईश्वर, स्वर्ग, नरक मानण्याशीही अध्यात्माचा संबंध नाही. ईश्वरी शक्तीवर विश्वास असलेला तसेच असा विश्वास नसलेला निरीश्वरवादी माणूसही आध्यात्मिक असू शकतो. मी आध्यात्मिक आहे पण माझा कोणताही धर्म नाही, मी आध्यात्मिक आहे पण मी ईश्वर मानत नाही, असे म्हणणारे लोक जगात खूप आहेत. रजनीश, जे कृष्णमूर्ती यांचे पंथ आध्यात्मिक



आहेत. पण त्यात रुढ अर्थाने देव नाही. गोयंका गुरुजींची विपश्यना याच प्रकारची. अध्यात्म याचा ढोबळ अर्थ-स्वत:चा शोध. मी कोण आहे, माझे या सृष्टीशी, अन्य मनुष्यमात्राशी नाते काय, माझ्या जीवनाचा हेतू काय अशा प्रश्नांचा शोध अध्यात्मात मोडतो. अध्यात्म ही अगदी वैयक्तिक प्रक्रिया आहे. रिलिजन या अर्थी धर्म ही सामूहिक बाब आहे. धर्मातले लोक वैयक्तिक पातळीवर आध्यात्मिक असू शकतात. तसेच धर्माला मानणारे पण अजिबात आध्यात्मिक नसलेले लोक असू शकतात. बहुसंख्य तसेच असतात. धर्माचे विधी, कर्मकांडे, जपजाप्य, सण-समारंभ, तीर्थयात्रा नित्यनेमाने करणारे लोक आध्यात्मिक असतातच असे नाही. तर हे काहीही न करणारे लोक पूर्णपणे आध्यात्मिक असू शकतात.

### आज विज्ञान व संविधान युग; तरीही धर्म का हवा?

ज्या काळात सृष्टीची कोडी आजच्यासारखी विज्ञानाने उलगडलेली नव्हती, त्यावेळी निसर्गाच्या विविध रूपांविषयी अचंबित होऊन तसेच त्यांची अवकृपा होऊ नये म्हणून त्यांना भजणारी सूक्ते मानवाने गायली. त्यांच्या कृपेसाठी अनुष्ठाने, कर्मकांडे केली. पण आता विज्ञानाने हे सर्व उलगडल्यावर त्यांची गरज काय? राज्यरचना कशी असावी, कोणाची कर्तव्ये काय असावीत, कोणत्या गुन्ह्यांना कोणत्या शिक्षा असाव्यात, उत्पन्नाचे वितरण कसे व्हावे यासाठी घटना व राज्याचे प्रशासन, दंडसंहिता असताना धर्माचे काम काय? कोणताही धर्म न मानता आजच्या व्यवस्थेत मी जगू शकतो. या व्यवस्था नसण्याच्या काळात मला ते शक्य झाले नसते. आज व्यक्ती म्हणून मला याबाबतीत मोकळीक आहे. घटनेने मला उपासनेचे तसेच उपासना न करण्याचे, धर्म मानण्याचे तसेच धर्म न मानण्याचे स्वातंत्र्य मूलभूत अधिकार म्हणून दिला आहे. तरीही बहुसंख्य लोक धर्माचा अंगीकार करतात. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर धर्माचा पुरस्कार करतात.

### धर्म नीती शिकवतो

विज्ञान सृष्टीची रहस्ये उलगडते, त्यातील घटनांची कार्यकारणपरंपरा विशद करते. मात्र माणसाने माणसाशी कसे वागावे हे सांगत नाही. विज्ञान नीती शिकवत नाही. विज्ञान अणूचा वापर काय काय प्रकारे करता येऊ शकतो, याच्या शक्यता सिद्ध करते. पण या तंत्राच्या साहाय्याने अणुबॉम्ब बनवून हिरोशिमा-नागासाकीवर टाकून माणसांच्या कित्येक पिढ्या बरबाद करायच्या की ऊर्जेसाठी, आरोग्य चिकित्सेसाठी, पदार्थ टिकविण्यासाठी त्याचा वापर करायचा हा निर्णय विज्ञान देत नाही. तो निर्णय माणसे, त्यांचे शासन घेते. हे शासन स्वत: जगा, इतरांनाही जगू द्या सांगणारे असू शकते. त्याच्या घटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय ही तत्त्वे असू शकतात. ही नीतीतत्त्वे आहेत. त्यांना कायद्याचे स्वरूप असू शकते

वा भविष्यातील राज्यासाठीचे ते दिशादिग्दर्शनही असू शकते. विज्ञानाने न घडणारी कामे जर राज्य व घटना करत असेल, तर मग धर्माची गरज काय? घटना लिहिल्यानंतर बाबासाहेब आंबेडकर लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार करतात. म्हणजेच धर्म करत असलेली अजून अशी काही महत्त्वाची कामे आहेत, जी संविधान किंवा राज्य करू शकत नाही.

**धर्म आशा, दिलासा, सहनशक्ती देतो**

बाबासाहेब आंबेडकर म्हणतात- 'धर्म माणसाला आशा देतो. त्यामुळेच गरिबांना धर्माची अधिक गरज आहे.' मार्क्स धर्माला अफू म्हणतो, हे आपण लाख वेळा ऐकलेले आहे. पण ते विधान करण्याआधीची दोन विधाने आपल्यापर्यंत पोहोचतात असे नाही. तो म्हणतो- ''धर्म हा पीडितांचा नि:श्वास आहे, तो हृदयहीन जगाचे हृदय आहे. आत्माहीन परिस्थितीचा तो आत्मा आहे. ती माणसांची अफू आहे.''

ज्या समाजात सगळी माणसे न्याय्यपूर्ण, सर्व भौतिक सुख-सुविधा असलेले व त्या भोगण्याची उसंत असलेले जीवन जगत नाहीत, जिथे आजही प्रचंड विषमता व त्यापोटी येणारी मानसिक असुरक्षितता आहे, तिथे धर्म दिलासा देतो. आधार देतो. माणसांना परस्परांशी माणुसकीने वागण्याची प्रेरणा देतो. त्यासाठीची आत्मिक ताकद देतो. अर्थात, या आधाराने बाहेरची विषम स्थिती बदलणार नसते. ती सहन करण्याची शक्ती धर्म देतो. ऑपरेशनवेळी वेदना कळू नयेत म्हणून भूल दिली जाते. हे भुलीचे काम पूर्वी अफू करे. या अर्थाने आजच्या स्थितीत अफू उपयुक्त आहे. पण दुखणे तसेच ठेवून त्याची वेदना कळू नये म्हणून धर्माचा वापर होण्याने मूळ दुखणे दूर होणार नाही. त्यासाठी बाहेरची स्थिती बदलली पाहिजे. त्यासाठीचा संघर्ष अनिवार्य आहे. त्याला धर्म अडथळा होता कामा नये. धर्माचे हे आभासी स्वरूप म्हणूनच दूर झाले पाहिजे, अशी मार्क्सची मांडणी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पारंपरिक बौद्ध धर्म नाकारून 'नवयान' स्वरूपात जो धम्म देतात तो असे आभासी समाधान देत नाही. हा बौद्ध धर्म ईश्वराचा संदर्भ घेत नाही. आत्मा नाकारतो. अधिक नेमकेपणाने सांगायचे तर बुद्ध अज्ञेयवादी (Agnostic) आहे. देव आहे की नाही या चर्चेत वा त्यासंबंधीच्या अंतिम निष्कर्षात तो पडत नाही. सृष्टीच्या उत्पत्तीची कोणतीही चमत्कृतीपूर्ण कथा तो सांगत नाही. सृष्टीचा कोणीही निर्माता नसून ती विकसित झालेली असल्याचे सांगतो. जग अनित्य, परिवर्तनशील आहे, माणसे मर्त्य आहेत, ही वस्तुस्थिती मांडतो. जन्म व मृत्यू यातील जीवन ही हकिगत आहे. हे जीवन कसे सुंदर करायचे याचा मार्ग बुद्ध सांगतो. म्हणूनच मार्क्सला वाटणारी चिंता बाबासाहेबांना वाटत नाही. बौद्ध धम्म माणसाला जीवन सुंदर करण्यासाठीच्या संघर्षापासून परावृत्त करत नाही.



आत्मसंतुष्ट करत नाही. बाबासाहेबांनी याची पराकाष्ठेने दक्षता घेतली आहे. मात्र त्यांच्यानंतर बौद्ध धर्माचे आचरण म्हणजे काय, याबद्दल ज्या काही बाबी वा विचार प्रचारण्यात येत आहेत, त्यांत मार्क्स म्हणतो तशी गडबड होऊ शकते. त्यातील एक भाग विपश्यना आहे. विपश्यना याचा अर्थ विशेष प्रकारे पाहणे. या ध्यानाच्या सरावाने साक्षीभावाची ताकद मिळते. तो मनाचा व्यायाम आहे. मनाचे हे स्थैर्य अंतिम लक्ष्य मानले तर गडबड होते. विपश्यनेने मिळालेली मनाच्या स्थैर्याची ताकद भोवतालचे दु:ख निर्माण करणारे विषम जग बदलण्यासाठीचा संघर्ष करायला मदतच करते. मात्र केवळ विपश्यनेने प्रत्येक माणूस बदलण्याचे लक्ष्य ठेवल्याने सामाजिक-राजकीय व्यवस्था बदलत नाही. प्रत्येकाने विपश्यना करावी असा प्रचार, प्रयत्न जरूर करावा. पण तो समाज बदलण्याचा पर्यायी मार्ग नव्हे. तो तसा समजणे म्हणजे मार्क्सचे म्हणणे खरे होणे होय. बाबासाहेब बसलेला बुद्ध की उभा बुद्ध अशी चर्चा करून उभा बुद्ध प्रचारतात ते यासाठीच.

महात्मा फुले त्यांनी स्थापिलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' नावाचा धर्म स्वीकारण्याचे आवाहन करतात. त्याच वेळी त्यांच्या चळवळी, संघर्ष चालू आहेत. हा धर्म त्यांना या संघर्षातून अलिप्त करत नाही. तर तो या संघर्षाचा एक भाग असतो. सर्व अनिष्ट रूढींना फाटा देत, मांग, मुस्लीम, ब्राह्मण सर्वांना बंधुपरी पोटाशी घेणाऱ्या नव्या समाजरचनेचा तो नमुना असतो. पुन्हा यातही हाच धर्म स्वीकारण्याचा आग्रह नाही. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने विविध धर्मांची पुस्तके अभ्यासून त्यांना पटणारा धर्म स्वीकारण्यास फुले प्रोत्साहन देतात. अशा विविध धर्ममतांचा स्वीकार केलेली माणसे एका कुटुंबात गुण्यागोविंदाने नांदावीत, असे त्यांचे स्वप्न आहे. सेक्युलर घटना लिहिणारा महामानव डॉ. आंबेडकर जन्माला येण्याआधी मृत्यू पावलेल्या महात्मा फुलेंचे हे द्रष्टेपण वा उद्दिष्ट किती महान होते, ते आपल्याला यावरून कळते.

**बुद्धिनिष्ठ अल्पसंख्य; बहुसंख्यांत करुणा, विवेक जागवणे गरजेचे**

मानसिक असुरक्षिततेच्या काळात लोक अधिक धार्मिक होतात, हे आपण पाहतो. पण सारं काही नीट असतानाही माणसे धार्मिक असतात. या सृष्टीच्या उत्पत्तीची कितीतरी रहस्ये उलगडली, जगात देव नाही हे स्टिफन हॉकिंगने सिद्ध केले असले तरी बहुसंख्य माणसांना धर्म लागतो. पूर्ण विवेकवादी ती बनत नाहीत. अवकाशात यान सोडतानाही शास्त्रज्ञांकरवी धार्मिक पूजा केली जात असल्याचे आपण पाहतो. अवकाशयानाच्या तयारीच्या शास्त्रात ते ईश्वराला किंवा त्याच्या चमत्कारांना गृहीत धरत नाहीत. मात्र या अनंत, असीम विश्वाच्या पसाऱ्याचा नियंता म्हणून कुठेतरी त्यांना ईश्वर दिलासा देत असतो. तो पार करण्याची ताकद फार कमी शास्त्रज्ञांत व डॉक्टरांच्यात असते. सामान्यांचे तर विचारूच नका.

म्हणूनच समाजवादी क्रांतीनंतरही लोक रशियात चर्चमध्ये किंवा चीनमध्ये बुद्धविहारात जायचे थांबत नाहीत. जेव्हा त्यांवर काही बंधने आणण्याचा प्रयत्न झाला, त्यावेळी लोकांनी लष्करी ताकदीला घाबरून बंड केले नसेल, पण ते अत्यंत अस्वस्थ मात्र झाले. सोव्हिएट कोसळल्यावर आणि चीनमध्ये थोडी मोकळीक मिळाल्यावर लोकांचे धर्मस्थळांमध्ये जाणे प्रचंड वाढले.

माणसाच्या मनाच्या गुंत्यांचा निरास विज्ञान किंवा मानसशास्त्र पूर्णपणाने करु शकत नाही. त्याला धर्म हा आधार लागतोच असे आजही दिसते. नजीकच्या भविष्यात यात बदल होण्याची संभावना नाही. अशा वेळी हा आधार मानव्यपूर्ण, करुणावंत कसा असेल, माणसाला परावलंबी करणारा नसेल याकडे आपण लक्ष द्यायला हवे. धर्माचे नव्हे, तर त्यातील कशाचे उच्चाटन करायचे याचा विवेक विवेकशील म्हणवणाऱ्यांना करावा लागेल.

### धर्माचे मर्म क्रमात हरवते

आपापल्या मूर्ती कवटाळून परस्परांचे कोथळे काढणाऱ्या अरबस्थानातील टोळ्यांना एक करताना भेदांचे कारण म्हणून मूर्तींना उद्ध्वस्त करुन त्याजागी निराकार अल्लाची स्थापना करणारा इस्लाम हे प्रगत पाऊल होते. पण कोणतीही मूर्ती हाच अधर्म मानणे हा मूलतत्त्ववाद होतो. धर्माचे मर्म हरवून त्यातील सूत्राचा कर्मठ अर्थ लावणे, विवेकाला, ऐतिहासिकतेला मूठमाती देणे म्हणजे मूलतत्त्ववाद. शेकडो वर्षांची निर्मिती असलेले, असंख्यांनी आपले श्रम व कला ओतलेले बामियानचे विशाल बुद्धशिल्प तोफा लावून उद्ध्वस्त करण्याचे तालिबानचे कृत्य हा या मूलतत्त्ववादाचा क्रूर नमुना. बायबलमध्ये पृथ्वी सपाट असल्याचे म्हटले आहे. म्हणून गॅलिलिओचे पृथ्वी गोल आहे हे म्हणणे पोपच्या दृष्टीने धर्मद्रोही ठरते. गॅलिलिओपुढे विधान मागे घेणे वा देहदंड स्वीकारणे हा पर्याय ठेवला जातो. गॅलिलिओ नाईलाजाने जीव वाचावा म्हणून पहिला पर्याय स्वीकारतो. पुढच्या इतिहासात गॅलिलिओचाच जय होतो. आज ख्रिस्ती जगत बायबलमध्ये लिहिले आहे म्हणून पृथ्वी सपाट मानून व्यवहार करत नाही. धर्माच्या नावाने ख्रिश्चनांनी क्रुसेड्स तर मुस्लिमांनी जिहाद केलेत. अशी धर्मयुद्धे हिंदूंत दिसत नसली तरी धर्मरक्षणासाठी शंबुकाचा शिरच्छेद करणे, ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांना बहिष्कृत करणे, तुकोबांना सदेह वैकुंठाला पोहोचविणे अशी कैक पापे हिंदू धर्माच्या ठेकेदारांनी केली आहेत. आम्ही म्हणू ते धर्ममत. त्याला आजची कायदेव्यवस्था आड येत असेल तर तीही आम्ही धुडकावून लावू म्हणणारी या ठेकेदारांची परंपरा आजही जिवंत आहे. दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्या ही या मूलतत्त्ववादी हिंदूंची अधम करणी आहे.



### धार्मिक मूलतत्त्ववादाचा राजकारणासाठी वापर

मूलतत्त्ववादाला कायम राजकीय हितसंबंधांसाठी वापरले जाते. अमेरिका-सोव्हिएट शीतयुद्धात तालिबान्यांना अमेरिकेने पोसले. भारत आपल्या गोटात येत नाही, म्हणून त्याला धडा शिकवण्यासाठी, कमकुवत करण्यासाठी पाकिस्तानातील धार्मिक दहशतवाद्यांना तसेच आपल्याकडच्या खलिस्तानवादी अतिरेक्यांना शस्त्र तसेच ते चालवण्याचे प्रशिक्षण अमेरिकन शासकांनीच दिले. बाबरी मशीद उद्ध्वस्त करणे हे केवळ धार्मिक मूलतत्त्ववादी काम नव्हे, तो मूलतत्त्ववादाचा वापर करून झालेली अव्वल राजकीय कृती होती. त्याची फळे मोदींच्या सत्तारोहणानंतर आपण भोगतो आहोत. संविधानाची शकले उडवण्याचा बेछूट तालिबानी कार्यक्रम अहर्निश चालू आहे. धर्माला राजकारणात खेचण्याने, धर्माच्या नावाने राष्ट्र उभारण्याने लोकांचे कल्याण होत नाही हे सिद्ध झालेले आहे. इस्लाम हा सामायिक धर्म आहे म्हणून अरबस्थान एक राहिला नाही. इराण-इराक संघर्ष शमला नाही. आपल्याच बौद्ध धर्माची माणसे आहेत म्हणून जपानने चीनवरील हल्ले सौम्य केले नाहीत. सेक्युलर भारतापासून फुटून धर्माच्या आधारावर स्थापन झालेला पाकिस्तान एक राहिला नाही. भाषा, संस्कृती व पश्चिम पाकिस्तानची प्रभुत्वशाली वृत्ती या कारणांनी बांगलादेश अलग झाला.

### धर्माचे नव्हे, मूलतत्त्ववादाचे निर्मूलन आजची निकड

धर्माचे निर्मूलन नव्हे, तर राजकारण, मूलतत्त्ववाद यांतून धर्माला सोडविणे हे प्रगतिशील प्रवाहाचे आजचे लक्ष्य हवे. धर्माला देशाच्या, भाषेच्या सीमा नाहीत. मुसलमानांचा पाकिस्तान म्हणून हिंदूंचा हिंदुस्तान हे अवास्तव व गैर आहे. उर्दू ही पाकिस्तानची राष्ट्रभाषा आहे, म्हणून ती मुसलमानांची भाषा आहे हा चुकीचा समज आहे. उर्दू ही भारतीय भाषा आहे. ती उत्तरेकडील मुस्लीम व हिंदू दोहोंत प्रचलित आहे. सामाजिक सण-उत्सव, प्रार्थना स्थळे यादृष्टीने धर्माचे सामाजिक स्वरूप हानिकारक नाही. मात्र आस्थेच्या पातळीवर धर्म वैयक्तिक बाब राहणे याकडे आपण सरकायला हवे. आजही त्याचा लग्न, वारसा आदी बाबींत जो सामाजिक संबंध आहे, तो हलक्या हाताने, प्रबोधन करत दूर करायला हवा. केवळ कायद्याच्या ऑपरेशनने ते साधणार नाही. भारतीयत्वाची ओळख ठळक करणाऱ्या विशेष विवाह कायद्याचा वापर करण्यासाठी तरुण पिढीला प्रोत्साहन द्यायला हवे. कोणत्याही धर्माशिवायचे अध्यात्म मानणारी माणसे वाढली तर ते चांगलेच आहे. ही माणसे भले वैयक्तिक मुक्तीचा ध्यास धरत असतील. पण ती दुसऱ्याला हानी पोहोचावी असे कृत्य करत नाहीत. तसे झालेच तर ते त्यांना सखलन वाटते. धर्माच्या नावाने हिंसेला त्यांचा विरोधच असतो. ती जात्याच सेक्युलर असू शकतात. घटना वा

राष्ट्र राज्याचे नियमन याच्या पलीकडे जाणारे, मानसिक पातळीवर अधिक स्वीकृत होणारे नियमन धर्माचे असते. त्यासाठी वारकरी, सूफी, बाऊल असे संप्रदाय त्यांच्या निखळ स्वरूपात पसरायला हवेत.

हजारो वर्षांचा धर्म व अध्यात्माचा प्रवास आजही चालू आहे, समाजमनात तो घट्ट रुतलेला व रुजलेला आहे. आगामी काळातही तो राहणार आहे. हे कबूल करून केवळ नव्हे, तर नीट समजून घेऊन, त्याच्याशी जोडून घेऊन, त्यातील वावगे ते दूर करण्याचे व पोषक ते टिकवण्याचे, संवर्धित करण्याचे प्रयास करणे हे आजचे पुरोगामी कार्य आहे.

**धार्मिकता, श्रद्धा व अंधश्रद्धा**

हातात मोबाईल, खांद्याला उंची पर्स; मात्र पायात चपला नाहीत. हे दृश्य रस्त्यात, स्टेशनवर जागोजाग नवरात्रात आपण पाहतो. पूर्वी हातात मोबाईल नसायचे, कमरेत जीन्स नसायची. साडी, सलवार-कुर्ता असायचा. साधने, वेश बदलला. त्यात अधिक प्रगती, आधुनिकता आली. पण मनावरचा रूढींचा प्रभाव जुनाच राहिला. जीवनाला वेग आला. त्या वेगाशी जुळवताना आधुनिक साधनांचा वापर वाढला. त्यात प्रत्यक्ष पूजेला बसण्याचा वेळ वाचवण्यासाठी संगणकाच्या साहाय्याने पूजा सांगण्याचेही प्रकार लोक अवलंबतात, असे ऐकले आहे. एवढंच कशाला, कुठेतरी एक अनुभव वाचला होता. एका म्हातारीचा अंत्यविधी सुरू होता. भटाचे विधी चालले होते. त्याच्यासमोर लॅपटॉप होता. त्या लॅपटॉपवर स्काईपवर म्हातारीचा अमेरिकेतला मुलगा होता. हातातल्या महत्त्वाच्या एंगेजमेंट्स सोडून तातडीने तेही हजारो किलोमीटरवरून आईच्या अंत्यविधीला वेळेवर पोहोचणे त्याला शक्य नव्हते. म्हणून तो या मार्गाने सहभागी झाला. भटालाही काही प्रॉब्लेम नव्हता. भट भारी लवचीक असतात. अलीकडे भटही यजमानाच्या अपेक्षेप्रमाणे तासाची, मिनिटांची पूजा सांगतात. सगळी पॅकेजेस त्यांच्याकडे उपलब्ध असतात. दक्षिणेत तडजोड नसली म्हणजे झाले.

कोणी म्हणेल ही धर्माची चेष्टा आहे. कोणी म्हणेल हे आधुनिक जगाबरोबर बदलणे आहे. दोन्ही असू शकते. पण यात धर्माचा एक भाग विसरला जातो, जो अनेक थोर संतांनी सतत प्रतिपादला आहे. तो म्हणजे, ईशशक्ती चराचरात व्यापलेली आहे. तिचे स्मरण, तिच्याशी तादात्म्यता साधणे हाच धर्म आहे. त्या शक्तीशी काही मागायचे नसते. अनवाणी राहून वा अन्य एखादे व्रत करून भौतिक जगातील समृद्धीची कामना करायचा सौदा करायचा नसतो. उलट परमशक्तीला समर्पित व्हायचे असते.



**श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्या सीमारेषा**

इथेच श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्या सीमारेषा ठळक होतात. हा सौदा व त्याप्रीत्यर्थ करावयाचे कर्मकांड ही अंधश्रद्धा आहे. एखादा निर्मिक कल्पून त्याच्याप्रति समर्पित होणे ही श्रद्धा आहे. अंधश्रद्धा असो वा श्रद्धा दोहोंना विज्ञानाचा, तर्काचा पाठिंबा नाही. देव, निर्मिक यांचे अस्तित्व किंवा त्याची कृपा विज्ञानाने सिद्ध होत नाही. म्हणून काही जण निरीश्वरवादी, नास्तिक असतात. त्यांना अशी श्रद्धा बाळगणे, देवापुढे हात जोडणे हेही मंजूर नसते. काही जण ईश्वर असेल वा नसेल, आज त्याची प्रचीती येत नाही, जीवन वा सृष्टीच्या घडामोडींत त्याचे अस्तित्व दिसत नाही, सबब त्याची चर्चा करण्यात वेळ घालवणे हेच निरर्थक आहे, असे मानतात. या गटातल्यांना अज्ञेयवादी म्हणतात.

संत तुकाराम, महात्मा फुले, गाडगेमहाराज ही निर्मिकाला मानणारी, त्याच्या प्रति श्रद्धा बाळगणारी, पण अंधश्रद्धेवर तुटून पडणारी मंडळी. त्यांची सश्रद्धता वैज्ञानिकतेत भले बसत नसेल पण मनुष्यजातीला पुढे नेणारी आहे. नाशिकला गोदावरीत उभे राहून स्वर्गवासी पितरांना ओंजळीत पाणी घेऊन अर्घ्य देणाऱ्यांच्या शेजारी गाडगेबाबा उभे राहतात. स्वत:ही तसेच खापरात पाणी भरून ओतत राहतात. अर्घ्य देणाऱ्या शेजारच्या इसमाला त्यांची ही कृती चमत्कारिक वाटून 'तुम्ही हे काय करत आहात?' असे तो विचारतो. गाडगेबाबा उत्तर देतात, 'माझ्या अमरावतीच्या शेताला पाणी घालतो आहे.' प्रश्नकर्ता हसू लागतो. 'हा काय वेडपटपणा! शेकडो किलोमीटरवरच्या शेताला असे कसे पाणी पोहोचेल?' उत्तरादाखल गाडगेबाबांचा प्रतिप्रश्न असतो, 'अमरावतीपेक्षा दूर असलेल्या स्वर्गातील पितरांना जर तुमचे हे अर्घ्य पोहोचते तर माझ्या शेताला का नाही पोहोचणार?'

'गोपाळा गोपाळा-देवकीनंदन गोपाळा' असे कीर्तन करत गाडगेबाबा माणसांना माणूसपणाच्या धरतीवर उतरवण्यासाठी आयुष्यभर हिंडत राहिले. महात्मा फुले निर्मिकाला मानूनही कर्मकांड पसरविणाऱ्या, सत्यनारायणासारखा स्वत:चे उखळ पांढरे करण्यासाठीचा विधी प्रचारणाऱ्या ब्राह्मणांचे कसब उघडे करण्याचा सत्यशोधकी जागर करत राहिले.

गांधीजी धर्माचा स्वत:चा अर्थ लावतात व तो समाजात रुजवण्याचा प्रयत्न करतात. 'ज्या धर्मात अस्पृश्यता आहे तो हिंदुधर्म माझा नाही' हे, अस्पृश्यता पाळणाऱ्या समाजाला स्वत:ला हिंदू म्हणवून घेत ते सांगतात. ते कधीही कुठल्याही देवळात गेलेले नाहीत. 'मी सनातनी हिंदू आहे' असे ते म्हणतात तेव्हा धर्माचे उन्नत स्वरूप त्यांना अपेक्षित असते, कर्मकांडांनी भ्रष्ट झालेले नव्हे.

**धार्मिकता वाईट नव्हे**

आपण पाहिले अज्ञेयवादी, श्रद्धावान हे लोक धार्मिक आहेत. त्यांचा समाजाला पुढे न्यायला उपयोग झाला आहे. त्यांची धार्मिकता मनुष्यजातीला पोषकच ठरली आहे. त्यामुळे मुळात धार्मिकताच वाईट असे म्हणता येत नाही. निरीश्वरवाद हा विज्ञानवाद आहे. त्याचेही स्वागतच असायला हवे. या विचारांची मंडळी धर्म मानत नसतील, तरी हरकत नाही. पण ते जर सर्वसामान्यांच्या श्रद्धांवर, धर्मावर केवळ कर्कश्य कोरडेच ओढत राहिले, तर त्यातून काही साध्य होत नाही. त्यांना अपेक्षित माणसे बदलत नाहीत. उलट ती तुटतात. हे निरीश्वरवादी माणसाचे माणसाशी असलेले नाते अधिक सुंदर करायला काय करतात, कोणती नीतीतत्त्वे प्रचारतात हेच त्यांच्या कार्याचे मापदंड राहणार आहेत. ते देवाला मानत नाहीत, हे नीतीमूल्य नाही. ती त्यांची धारणा आहे. धारणा नव्हे, तर नीतीमूल्य व त्याचा प्रसार माणसे बदलतो, हे निरीश्वरवाद्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

अंधश्रद्धांचा तर माणसाचे माणूसपण वाढविण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. नऊ दिवस अनवाणी फिरा, उपवास करा, सिद्धिविनायकाला दहा किलोमीटर रांग लावा यातून स्वत:ला माणसे कष्टवतील, त्यातून पुण्यप्राप्तीचे कृतक समाधान मिळवतील एवढेच. दारू प्याल्यावर येणारी आभासी सुखद झिंग व ही कृतक पुण्यप्राप्तीची झिंग एकाच कुळातली. दारूची झिंग सकाळी उतरते तरी. अंधश्रद्धेची ही झिंग अशी उतरत नाही. विवेकवादी विचारांची जोपासना हाच त्यावरचा उतारा असतो.

पण ही मंडळी जोवर इतरांना आपल्या अंधश्रद्धांचा त्रास देत नाहीत तोवर त्यांना ती पाळायचा संविधानाने अधिकार दिलेला आहे. निरीश्वरवादी, श्रद्धावादी, अज्ञेयवादी व दुसऱ्याला त्रास न देणारे अंधश्रद्धावादी यांना आपल्या आस्था, विचार जपण्याचे, आचरणाचे व प्रचारण्याचे स्वातंत्र्य भारतीय घटनेने दिलेले आहे. तथापि, देशाचा कारभार धार्मिकतेवर चालणार नाही, भौतिकवादच त्याचा पाया राहील.

धर्मांध मूलतत्त्ववादी तसेच सत्तेसाठी धर्माला वापरणाऱ्या या चलाखांपासून लोकांना सतत सावध करत राहावे लागेल. तथापि, एक लक्षात घ्यायला हवे. भौतिक प्रगतीबरोबर माणसे आपोआप प्रगत होत नाहीत. त्यासाठी मनांची मशागत समांतरपणे करत राहावी लागते. या मशागतीचा एक भाग धर्म, धार्मिकता, श्रद्धा, अंधश्रद्धा, अज्ञेयवाद, निरीश्वरवाद व संविधानाचा त्यांच्याप्रतिचा दृष्टिकोन यांच्या स्पष्टतेचे प्रबोधन हा असेल.

■



# भारतातील धर्म व संस्कृती यांची वैशिष्ट्ये

मागच्या प्रकरणात धर्माच्या स्वरूप व प्रयोजनाविषयी चर्चा करताना भारतातील धर्मकल्पना आणि पाश्चात्त्य देशांतील रिलिजन ही कल्पना यांच्या फरकाविषयीची थोडक्यात नोंद केली होती. या प्रकरणात त्याविषयी तसेच इथल्या परंपरा व संस्कृती यांच्या खास वैशिष्ट्यांची अधिक चर्चा करू. सेक्युलॅरिझमला मराठीत धर्मनिरपेक्षता असा शब्द आपण वापरतो. तथापि, पाश्चात्त्य जगातील सेक्युलॅरिझम आणि भारतातील सेक्यलॅरिझम यांत काही मूलभूत फरक आहेत. ते आपण पुढील प्रकरणांत पाहणार आहोत. या फरकांचे कारण भारतातील धर्म, संस्कृती यांच्या स्वरूपवैशिष्ट्यांत आहेत. म्हणूनच सेक्युलॅरिझमच्या चर्चेआधी ती समजून घेणे उपयुक्त ठरेल.

**प्रवाही भारतीयत्व साच्यात बसणे कठीण**

भारत हा एक खंडप्राय देश आहे. फाळणीआधी तर तो आणखीच मोठा होता. उत्तरेला हिमालय, पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर तर दक्षिणेला हिंदी महासागर असे तीन बाजूने पाणी आणि एका बाजूने जमीन असलेला हा महाकाय द्वीपकल्प आहे. याची एकेक राज्ये म्हणजे आकाराने युरोपातली एकेक राष्ट्रे आहेत. बर्फ, वाळवंट, सपाट मैदानी प्रदेश तर डोंगराळ पट्टा अशी भौगोलिक रचनेतली विविधता आणि पोशाख, आहार, भाषा यांची विविधता असलेला हा देश आहे. प्राचीन काळापासून बाहेरच्यांचे येणे, वसणे चालू असल्याने तसेच व्यापारासाठी दोन्हीकडून ये-जा असल्याने खानपान, मान्यता, रीती यांचा संगम होणे नैसर्गिक होते. या सगळ्यातून येथील धर्म, संप्रदाय, संस्कृती यांची घडण होत गेली. स्वाभाविकच त्यात असंख्य प्रवाह, पदर आहेत. हे सगळे मिळून 'भारतीय' आहे.

युरोपातील एका देशात एक भाषा, एक प्रमुख धर्म, समान चालीरीती

आढळतात. तसे इथे नाही. युरोपात प्रमुख धर्म ख्रिश्चन आहे. इस्लाम प्रमुख धर्म असणाऱ्या मध्य आशियातील देशांचेही तसेच आहे. हा एकजिनसीपणा आपल्या देशात कधीही नव्हता. आजही नाही. अनेक परिवर्तने, मिश्रणे होतील. पण भविष्यातही तो एकजिनसी होणे असंभव आहे. 'एक देश, एक भाषा आणि एक धर्म' ही घोषणा कोणी कितीही उच्चरवात केली तरी ती प्रत्यक्षात येणे नाही. थोडेसे कोणी याबद्दल बोलले तरी देशाच्या विविध भागांतून त्यास प्रतिरोध होतो. जबरदस्तीने करायचा प्रयत्न झालाच, तर देश तुटेल. आपल्या देशाच्या मिश्रसंस्कृतीला 'गंगा-जमनी' तहजीब म्हणायची प्रथा आहे. पण ती गंगा, यमुनेपर्यंत सीमित नाही. त्यात झेलम, ब्रह्मपुत्रा, कावेरी, तुंगभद्रा, गोदावरी यांचाही समावेश होतो. या सर्व नद्यांच्या खोऱ्यांत, काठांवर ज्या संस्कृती वसल्या त्या सर्वांची मिळून भारतीय संस्कृती बनते. या वैविध्याला एका साच्यात घालण्याऐवजी त्यातले चांगले वाढवणे आणि वाईट बाजूला काढणे एवढेच व्हायला हवे.

जे मिसळते त्यातून काही सूत्रे, गुणधर्म यांत साधर्म्य येते. प्रमुख सूत्र बनते. पण त्याचे रंगरूप स्थानिक राहते. बौद्ध लेण्या देशभर आढळतात. त्यानंतर सम्राट अशोकाचे शिलालेखही विविध भागांत आढळतात. शंकराचार्यांची चार पीठे देशाच्या चार टोकांवर आहेत. याचा अर्थ भारताच्या मोठ्या भूभागावर बौद्ध धर्म पसरला होता. त्याचप्रमाणे आज ज्याला हिंदू म्हटले जाते त्याचा प्रसार विस्तृत झालेला दिसतो. विचारांची, आस्थांची काही सूत्रे एक असली तरी या धर्मांचे त्या त्या प्रदेशातील विधी, सण यांत वैविध्य आढळते. होळीच्या सणात कितीतरी विविधता देशभर दिसते. अगदी महाराष्ट्रातही तो एकाच प्रकारे साजरा होत नाही. कोकणातली होळी, पश्चिम महाराष्ट्रातली होळी, उत्तर महाराष्ट्रातल्या आदिवासी पट्ट्यातली होळी यांत खूप फरक दिसतात. या फरकात मौज आहे, सुंदरता आहे. त्या कोणी एकसारख्या करू म्हणेल तर तो नादानपणा होईल.

ज्याला आज हिंदू म्हणतात असे वरच्या परिच्छेदात म्हटले आहे. त्याचे आणि त्या अनुषंगाने प्राचीन भारताच्या संस्कृतीविषयी थोडे स्पष्टीकरण करू.

## हिंदू : विविध जाती, संप्रदायांचा संच

हिंदू हा शब्द वेद, महाभारत, रामायण, मनुस्मृती आदींत आढळत नाही. आता पाकिस्तानात असलेल्या सिंधू नदीच्या आसपास राहणारे ते सिंधी. इराणाच्या फारसी भाषेत स चा उच्चार ह होतो. त्यामुळे सिंधीचे हिंदी, हिंदू झाले. ते मूळ धर्माचे नाव नसून त्या विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्यांचे नाव होते. त्यात विविध आस्था, संप्रदाय मानणारे लोक असू शकतात. लोकांची ओळख प्रामुख्याने जात आणि



संप्रदायाने होत असे. राजपूत, मराठा, जाटव, महार, लिंगायत, शैव, वैष्णव अशा या ओळखी असत. जात महार आणि पंथ कबीर सांगणारे दलितांत लक्षणीय असत. बौद्ध, जैन, शीख, मुसलमान, किरिस्ताव म्हणजे ख्रिश्चन, पारशी अशा ओळखी असत. हिंदू हे नामाभिधान १३ व्या शतकापासून आढळत असले तरी हिंदू ही ओळख क्वचितच कोणी देई. याचा अर्थ हिंदू हा संघटित धर्म वा संप्रदाय नव्हता. बौद्ध, जैन, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारशी नाहीत ते सगळे हिंदू या संज्ञेने ओळखले जाणे ब्रिटिशांच्या काळात अधिक रूढ झाले. ब्रिटिशांना संघटित धर्म म्हणून इस्लाम, ख्रिश्चन ठाऊक होते. त्याच प्रकारे ते भारतातील धर्माचे स्वरूप समजू लागले. ब्रिटिश विरोधी लढ्यात लोक संघटित करताना विविध जात, संप्रदायांच्या लोकांना 'हिंदू' म्हणून एकवटणे, त्यांच्या पूर्वपरंपरेचा अभिमान जागवणे एक डावपेच म्हणूनही स्वातंत्र्य चळवळीतल्या काही नेत्यांनी सुरू केले. इस्लाम, ख्रिश्चन या धर्मात एक ईश्वर, एक ग्रंथ, सर्वसाधारण सारखे विधी आहेत. तसे हिंदू धर्माचे सांगता येत नाही. एक ईश्वर, एक धर्मग्रंथ, विधींची सर्वसाधारण सारखी रीत हिंदूंत दिसत नाही. हिंदू म्हणवणारे लोक आपापले देव वेगळे सांगू शकतात. हा एकच आमचा पवित्र ग्रंथ आहे, असे ते सांगू शकणार नाहीत. ब्रिटिश विरोधी लढ्यात आणि ब्रिटिश कायद्यांनी केलेल्या कक्षांनी 'हिंदू' ही ओळख दृढ होत गेली. आता तो अन्य धर्मांप्रमाणेच एक धर्म आहे. पण जात्याच त्याचे अंतर्गत स्वरूप संमिश्र आहे. मणिपूरचा हिंदू गोमांस खातो. बंगालातील ब्राह्मण मासे खातात. ही संमिश्रता दुर्लक्षून समाजाला एकसाची करायचे प्रयत्न संकुचितपणाकडे जातात आणि त्यातून जमातवादाला चालना मिळणे. एका बाजूला व्यवहारात मोकळीढाकळी संमिश्रता आणि दुसरीकडे धर्माभिमानाच्या भिंतींची चौकट यात वास्तविक सामान्य 'हिंदू' गुदमरून जायला हवा. पण त्यातले काही मुसलमानांच्या द्वेषापायी स्वत:ला 'गर्व से हिंदू कहो'च्या सापळ्यात अडकवून घेतात किंवा अडकवले जातात. त्यांचे स्वभान या खोट्या गर्वाच्या ज्वराने आलेल्या ग्लानीत मलूल होते.

## वेदःसृष्टीविषयक कुतूहलाचा उद्गार आणि विषमता, कर्मकांडाची संहिता

आज ज्याला हिंदू परंपरेत गणले जाते, तो वेदांचा काळ हा वैदिक काळ. त्याआधीचा हडाप्पाच्या उत्खननामुळे शोध लागलेला काळ हा सिंधू संस्कृतीचा. ती प्रगत संस्कृती होती एवढे कळते. पण लिपी वाचता येत नसल्याने त्या काळातील श्रद्धा, विचार यांविषयी ठोस काही कळत नाही. वैदिक संस्कृतीविषयी विपुल कळते. विविध वेद वाचता येत असल्याने तत्कालीन चालीरीती, कर्मकांडे समजात.

लहान बाळाला जगाविषयी जे कुतूहल, अचंबा, प्रश्न पडतात, ती अवस्था वेदांतून व्यक्त होणाऱ्या मनुष्य समाजाची होती. उन्ह, वारा, पाऊस या शक्तींचा भला आणि बुरा दोन्ही अनुभव घेणाऱ्या मानवाने त्या शक्ती मानल्या व त्यांना प्रसन्न करणाऱ्या ऋचा लिहिल्या. त्यात सृष्टीच्या निर्मितीविषयी समजून घ्यायचा, अंदाज लावायचा प्रयत्न आहे. ऋग्वेदातील नासदीय सूक्तात हा प्रश्न आहे. हे सूक्त असे:

'नासदासीन्नो सदासात्तदानीं नासीद्रजो नोव्योमा परोयत। किमावरीव: कुहकस्य शर्मन्नंभ: किमासीद् गहनंगभीरम्।'

नेहरूंच्या 'भारताचा शोध' या पुस्तकावर आधारित टी.व्ही. मालिका 'भारत एक खोज' च्या शीर्षक गीतात हे मूळ सूक्त आणि त्याचा हिंदी तर्जुमा आहे. तो असा:

सृष्टी से पहले सत् नहीं था, असत् भी नहीं
अंतरिक्ष भी नहीं, आकाश भीं नहीं था
छिपा था क्या कहाँ, किसने देखा था
उस पल तो अगम, अटल जल भी कहाँ था
सृष्टी का कौन हैं कर्ता? कर्ता हैं यह वा अकर्ता
ऊंचे आसमान में रहता, सदा अध्यक्ष बना रहता
वोहीं सच मुच में जानता, या नहीं भी जानता
हैं किसी को नहीं पता, नहीं पता
नहीं है पता, नहीं है पता....

मूळ श्लोक आणि त्याचे हिंदी रूपांतर सविस्तरपणे मुद्दाम दिले. धर्म, संस्कृतीच्या प्रवासाविषयी ठोकळेबाजपणे आजच्या दुर्बीणीतून भूतकाळ पाहू नये. नाहीतर गफलत होते. आमच्या प्राचीन ऋषिमुनींना सर्व काही ज्ञात होते. त्या काळात विमान होते, प्लॅस्टिक सर्जरी होत होती...अशा काहीही बाता आमची मोठ्या पदावरची, देशाचे नेतृत्व करणारी माणसे मारत असतात. नासदीय सूक्तात या सृष्टीला कोणी निर्माण केले, याविषयी ठाऊक नसल्याचे कबूल केले आहे.

परमेश्वराने सृष्टी निर्माण केली, असे म्हणावे तर ती त्याने कशातून निर्माण केली? जर त्याने निर्माण केली तर त्याला कोणी निर्माण केले?..असे प्रश्न तयार होतात. वेदांचा काळ इ.स. पूर्व दीड ते तीन हजार वर्षांचा. म्हणजे आजपासून पाच हजार वर्षे पूर्वीचा. बुद्धाचा काळ आजपासून अडीच हजार वर्षे पूर्वीचा. बुद्धाने सृष्टीच्या निर्मितीविषयी ती कोणी निर्माण केलेली नसून विकसित झाली आहे असा



निर्वाळा दिला आहे. आज विज्ञानाच्या प्रगत काळात स्टीफन हॉकिंग आणि जगभरचे शास्त्रज्ञ एकत्र आले आणि त्यांनी सृष्टीच्या निर्मितीवेळचा अंदाज यायला 'महास्फोटाचा' प्रयोग केला. त्यातून ही सृष्टी कोणी ईश्वराने निर्माण केलेली नसून विकसित झाली, हे सिद्ध झाले आहे. बुद्धाचे निरीक्षण आणि त्या आधीची निरीक्षणे यातून अंदाजच शक्य होता. आजच्यासारखी संशोधनाची साधने आणि त्यासाठीची मापन पद्धती त्या वेळी नव्हती.

अशा सृष्टीविषयक कल्पना, यज्ञाचे विधी, वैद्यक असे खूप काही वेदांत आढळते. ते स्वैर आहे. प्राचीन जीवनाचा दस्तावेज म्हणून त्याला जरूर महत्त्व आहे. पण तो ज्ञानाचा सर्वश्रेष्ठ मापदंड कोणी म्हणाले तर मग कठीण आहे. एका मोठ्या कालपटावर विविध टप्प्यांत लिहिलेल्या बाबी त्यात एकत्रित आहेत. एका व्यक्तीने एका विशिष्ट तारखेला लिहिलेले हे ग्रंथ नव्हेत. त्यातून त्यावेळच्या समाजस्थितीच्या भल्या-बुऱ्या बाबींची नोंद मिळते. माणसांचे, स्त्री-पुरुषांचे संबंध ध्यानात येतात. वि. का. राजवाडेंनी लिहिलेल्या विवाह संस्थेच्या इतिहासातील या काळातील वर्णने आज आश्चर्याचे धक्के देतात. आजच्या नैतिक मान्यतेत न बसणारे ते संबंध होते. पण उलट विचार केला तर त्यावेळच्या लोकांना आजचे विवाह व कुटुंब चमत्कारिक वाटेल. स्त्री-पुरुष संबंध, कुटुंब, नीती यांना ऐतिहासिकदृष्ट्या समजून नाही घेतले तर नैतिक-अनैतिकता मापनाच्या व्यर्थ जाळ्यात आपण अडकू.

### वर्तमानातील धारणांनी भूतकाळ मापू नये

माणसांच्या धारणा कालचक्रात बदलतात. वर्तमानातील धारणांच्या फूटपट्ट्या ते भूतकाळाला लावू लागतात. पण प्राचीन शिल्पे, चित्रे आपल्याला सतत दणका देत असतात. सिंधुसंस्कृतीत आढळणारी लज्जागौरीची मूर्ती काळाच्या विविध टप्प्यांवर देशाच्या वेगवेगळ्या भागांत आढळते. नवा जीव जन्माला घालणारा, सृजन घडवणारा स्त्रीची योनी हा अवयव अपवित्र कसा असेल? त्याचे थेट दर्शन लज्जागौरीची मूर्ती घडवते. कुठलीही लज्जा न बाळगता. आपल्याकडे ती पुजली जाते. शिवलिंग हा स्त्रीची योनी व पुरुषाचे लिंग यांचा संगम आहे. नवसर्जनाचेच ते चिन्ह. एकेकाळी समाज ते समजून पवित्र माने. आजही लोक त्याची पूजा करतात. पण हा त्यातला अर्थ दृष्टिआड करतात. खजुराओतली संभोगशिल्पे फक्त तिथेच नाहीत. भारतातील अनेक प्राचीन मंदिरांत ती आढळतात. म्हणजेच तेव्हाचा समाज शृंगाराला, संभोगाला, स्त्री-पुरुष जननेंद्रियांना, नग्नतेला पवित्र मानत होता. माणसाच्या उगमाचा मूलाधार म्हणून त्यांचा आदर करत होता.

अलीकडची घटना. काशीला गंगेत एक तरुण जोडपे स्नान करत होते. त्यातल्या तरुणाने आपल्या पत्नीच्या ओठांवर हलकेच ओठ टेकवले. या 'घोर' पातकासाठी त्याला लोकांनी पाण्यातून खेचून काढून बदडले. काशीचा देव महादेव. त्याला विचारायची आणि त्याने बोलण्याची जर काही सोय असती, तर समाजाच्या या दांभिकतेवर त्याने नक्कीच कोरडे ओढले असते.

**गाय: वेदकाळात भक्ष्य; आज पवित्र**

राजवाडेंच्या पुस्तकात आणि आता अन्य संशोधकांनीही दुजोरा, संदर्भ दिल्यानुसार वेदकाळात गाईंना यज्ञावेळी बळी दिले जाई. गाईला मारल्यानंतर तिच्या मांसाचे कसे वाटे करावे, याचेही निकष त्यात नोंदवलेले आहेत. ज्या वैदिक धर्माला हिंदू धर्माचा प्रारंभीचा भाग म्हटले जाते, त्या धर्मात ब्राह्मण गायीला मारून खात. आज गाय पवित्र मानली जाते. तिच्या हत्येविरोधात कायदे केले गेले आहेत. तिच्या हत्येच्या संशयावरून माणसांना ठार केले जाते. हिंदुत्वाचे भाष्यकार म्हणून हिंदू कट्टरपंथीयांना प्रिय व पूज्य असणारे सावरकर गायीला उपयुक्त पशू मानत. त्यांचे ते मत ही मंडळी सोयीने बाजूला सारतात.

**वैदिकांच्या विरोधात चार्वाक, महावीर, बुद्ध यांचे बंड**

वैदिकांच्या यज्ञयाग, त्यातील पशुहत्या, माणसांच्या श्रेणी करणारी वर्णव्यवस्था यांस विरोध चार्वाक, महावीर, बुद्ध यांनी केला. पारलौकिक नव्हे, तर या इहलोकीचे जीवन कसे सुखी करायचे हा या मंडळींचा ध्यास होता. त्यामुळे त्यांना नास्तिकही संबोधले गेले. चार्वाक म्हणतो – 'यदा जीवेत सुखं जीवेत, ऋण कृत्वा, घृतं पिबेत' (जिवंत आहात तोवर सुखाने जगा, उसनवारी करा आणि तूप प्या.) कर्ज काढून तूप प्या, याचा अर्थ इहलोकीचे जीवन एवढेच जीवन. ते सुखाने जगा. बुद्धाने आपले लक्ष्य ठेवले जन्म आणि मृत्यू या दरम्यानचे माणसाचे जीवन सुखी करणे. माणूस मेल्यावर कुठे जातो, हा बुद्धाच्या विचारांचा प्रांत नव्हता. 'न ही वेरेन वेरानि, समन्तीध कुदाचन । अवेरेन च समन्ति, एस धम्मो सनन्तनो । (वैराने वैर शमत नाही, ते अवैराने म्हणजे प्रेमानेच शमते, हीच धर्माची शाश्वत शिकवण आहे.) अशी ही मैत्री, करुणेची अजोड देण बुद्धाने भारताला आणि मानवजातीला दिली आहे. 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' म्हणजेच सर्व प्राणिमात्र सुखी होवोत, हे त्याच्या धम्माचे लक्ष्य आहे. जैन तत्त्वविचार अनेकांतवादी मानला जातो. अनेकांतवाद म्हणजे सत्याकडे जाण्याचे विविध मार्ग आहेत, हे मानणे.

एकाच धार्मिक आदेशापुढे विचार न करता मूढपणे मान वाकवायची स्थिती



प्राचीन भारतातील या स्थितीत दिसत नाही. 'वादे वादे जायते तत्त्वबोध:' हे इथे लागू होते. आधुनिक लोकशाहीतील विचार, अभिव्यक्तिस्वातंत्र्याला हे पोषक आहे. अख्खी मानवता प्रेमाने कवेत घेण्याच्या नेहरूंनी राबवलेल्या भारताच्या परराष्ट्र धोरणाचा हा पाया आहे. संविधानाच्या उद्देशिकेत 'बंधुता' हे मूल्य बाबासाहेब आंबेडकर घालतात, ते मैत्री, करुणा यांच्याच प्रेरणेने.

**सम्राट अशोक : सर्वधर्मसमभावाचा आद्यस्रोत**

इ.स. पूर्व तिसरे शतक सम्राट अशोकाचा काळ. देशाच्या खूप मोठ्या भागावर त्याचे साम्राज्य होते. त्याचे शिलालेख, स्तूप आजही उत्खननात सापडत आहेत. तो स्वत: बौद्ध धर्म स्वीकारतो. त्याचा पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अनुराधापूर म्हणजे आजच्या श्रीलंकेत जातात. आज श्रीलंकेत प्रमुख धर्म बौद्ध आहे. सम्राट अशोक बौद्ध धर्माचा स्वत: प्रचारक आहे. पण राजा म्हणून प्रजेला तो स्वीकारायला भाग पाडत नाही. त्याच्या राज्यात वैदिक, जैन यांना त्यांच्या धर्माचा प्रचार-प्रसार करण्याची पूर्ण मोकळीक होती. या सर्वांप्रति सम्राट अशोक आदर बाळगे, त्यांना विविध प्रकारे साहाय्य करे. या सर्व संप्रदायांत वाजवी वादविवाद जरूर व्हावेत. त्यातूनच विचारांची प्रगती होते. पण परस्परांविषयी आदर ठेवून हे वादविवाद व्हावेत. त्यांत द्वेष व दुसऱ्याला नामोहरम करण्याची भावना नसावी. सम्राट अशोकाची ही भूमिका त्याच्या शिलालेखांतून आज आपल्याला कळू शकते. गुजरातमधील गिरनार येथील शिलालेखातील त्याच्या संदेशाचा हा मराठी सारांश पहा –

'देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा सर्व संप्रदायांना मान देतो. संन्यासी आणि गृहस्थाश्रमी या दोघांनाही मान देतो. स्वत:च्या संप्रदायाची स्तुती न करणे, परसंप्रदायाची अवास्तव निंदा न करणे. अन्य संप्रदायांचासुद्धा वाजवी सत्कार केलाच पाहिजे..एकमेकांचे धर्म एकमेकांनी ऐकावेत व मानावेत..'

सम्राट अशोकाच्या या विचारांमुळेच त्याची काही शिल्पे, चिन्हे आपण राष्ट्रीय चिन्हे म्हणून स्वीकारली. त्याच्या सारनाथच्या सिंहस्तंभाची प्रतिमा आज आपली राजमुद्रा आहे. त्यावरील धम्मचक्र आज अशोकचक्र म्हणून आपल्या राष्ट्रध्वजावर विराजमान आहे. इथे एक लक्षात घ्यायला हवे. सिंहस्तंभाच्या राजमुद्रेत खाली 'सत्यमेव जयते' हे बोधवाक्य आढळते. ते अशोकाच्या मूळ स्तंभावर नाही. ते वेदांच्या नंतर प्रगत विचारांची जी उपनिषदे आली, त्यातील मंडूक उपनिषदातले आहे.

## मध्ययुगीन संतांचा विद्रोह

आपल्या प्राचीन परंपरेचा एका बाजूला उन्नत वैचारिक वारसा तर दुसरीकडे जातिव्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रियांचे दुय्यम स्थान हा अवनत वारसा आजही आपल्या अनुभवास येतो. चार्वाक, बुद्ध, महावीर यांनी या विरोधात केलेल्या बंडाबद्दल आपण वर बोललो. मध्ययुगीन संतांनी आपल्या अभंग, गाथा, कवने, उपदेशातून या प्रतिगामित्वाशी युद्ध छेडलेले दिसते. इसवी सनाच्या १२ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत जवळपास सातशे वर्षे हा झगडा संतांनी केला. त्यात सूफी संतही आले. कर्नाटकात १२ व्या शतकात ब्राह्मण समाजात जन्माला आलेल्या लिंगायत पंथाचे संस्थापक बसवण्णांनी स्वत:चे ब्राह्मणपण संपवून जातिव्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवला. आपली ओळख सांगताना ते म्हणतात –

'पिता माझे मांग चन्नया, आजोबा माझे ढोर कक्कया
चुलते माझे चिकय्या पहा, बंधू माझा किन्नरी बोमय्या
मज का बरे तुम्ही जाणत नाही, कुंडलसंगमा'

समाजातल्या सर्वोच्च श्रेणीत गणल्या जाणाऱ्या एका ब्राह्मणाने आपले नातेगोते, सोयरे तळच्या जातीतले जाहीर करणे, हा तत्कालीन धर्माच्या ठेकेदारांना जबरदस्त ठोसा होता. या भूमिकेने सुरू झालेली त्यांची चळवळ ही 'शरण' चळवळ. या चळवळीतले दुसरे श्रेष्ठतम नाव म्हणजे अक्कमहादेवी. आपले राणीपण आणि वस्त्रे त्यागून ही विरक्त युवती बसवण्णांची शिष्या बनते. ती तर वेद, शास्त्रे व पुराणे यांना कठोरपणे फटकारते –

'वेद म्हणजे पढत गोष्टी। शास्त्र म्हणजे बाजारच्या वार्ता । पुराण म्हणजे पुंडांच्या कथा।

१२ व्या शतकातलीच केरळची गोगव्वा स्त्री-पुरुषांच्या समान अधिकाराबद्दल काय करारीपणे बजावते पहा –

'पुरुषाने मोहित होऊन नारीस वश केल्यास
ती आपली संपत्ती असे जाणावे
नारीने मोहित होऊन पुरुषास वश केल्यास
त्याचे उत्तर कोणते ते जाणून घ्यावे'
....



'येता स्तनांना उभारी म्हणतात नारी
फुटताच मिसरुड जर म्हणतात नर
ज्ञान या उभयाचे, नारी असो की नर, नास्तिनाथा'

१४ व्या शतकातली काश्मीरची लल्लेश्वरी दगडाच्या देव आणि देवळांवर आघात चढवताना म्हणते –

'देव भी  पत्थर और देवल भी पत्थर, उपर नीचे एकसमान स्थिती
रे पंडित इसमे किसकी करेगा तू पूजा
इसलिए कहती हूँ, अपने मन और प्राण को एक कर दे'

धर्मा-धर्मातील भेदाला विरोध करताना ती म्हणते –

'थल थल में बसता है शिव ही, भेद न कर क्या हिंदू मुसलमाँ
ज्ञान है तो स्वयं को जान,यही है साहिब से पहचान'

याच १४ व्या शतकात महाराष्ट्रात जन्मलेली जनाबाई संत नामदेवाच्या घरात दासी होती. खुद्द विठ्ठल तिला जाते ओढू लागायचा, इतर मदत करायचा, अशा कथा आहेत. त्याच्याशी नाते सांगताना ती म्हणते – 'पांडुरंग माझा पिता, रखुमाई झाली माता'. हे नाते इतके सघन आहे की, ती विठ्ठलाला शिव्याही घालू शकते –

'अरे अरे विठ्या, मूळ मायेच्या कारट्या
तुझी रांड रंडकी झाली
तुझे गेले मढे, तुला पाहून काळ रडे'

स्त्रियांनी आपल्या मर्यादेत राहायला हवे, हे सांगणाऱ्या व्यवस्थेला जनाबाई आव्हान देते –

'डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी
हाती घेई टाळ, खांद्यावर वीणा, आता मज मना कोण करी
पंढरीच्या पेठे मांडियले पाल, मनगटावर तेल घाला तुम्ही
जनी म्हणे देवा मी जाले वेसवा, रिघाले घर केशवा तुझे'

हो, भले मला म्हणा वेश्या, काय करायचे ते करा...हे जनाबाई सनातन्यांना बजावताना काय चीड असेल तिच्या मनात स्त्रियांना चेपणाऱ्या रूढी, मानकांविषयी!

१५ व्या शतकात रैदास किंवा रविदास, मीरा, कबीर आपल्याला भेटतात. चांभार या अस्पृश्य समाजात जन्मलेल्या रैदास यांनी माणसाशी माणूस जोडला जाण्याची पूर्वअट जाती संपणे आहे हे नेमकेपणाने ओळखले आहे. ते म्हणतात –

'जाति-जाति में जाति है, जो केतन के पात
रैदास, मनुष ना जुड सके जब तक जाति न जात'

केळीला (झाडाला) सोलत गेल्यास एक एक पात जाईल आणि अखेरीस काहीच हाती लागणार नाही. तसेच जातीच्या आत जाती आहेत. जोवर जात हा प्रकारच नष्ट होत नाही, तोवर माणूस एक होणे कठीण आहे, हे अगदी समर्पक रुपकाद्वारे ते समजावतात.

त्यांना म्हणजे एका अस्पृश्याला गुरू मानणारी मीरा ही क्षत्रिय राणी. तिने कृष्णाला आपला सखा मानला आहे. त्यासाठी नवरा, राजपाट त्यागते. आपल्या अवस्थेचे वर्णन करताना आणि गुरूबद्दल बोलताना ती म्हणते –

'नहीं मै पीहर सासरे, नहीं पिया जी री साथ । मीरा ने गोबिन्द मिल्या जी, गुरु मिलिया रैदास'

कबिरांनी हिंदू-मुस्लीम दोहोंच्या कर्मठतेवर, दांभिकतेवर आघात करून प्रेम जाणणारा खरा पंडित अशी ग्वाही दिली. हिंदूंच्या मूर्तिपूजेविषयी ते म्हणतात –

'पाथर पूजे हरि मिले, तो मैं पूजू पहाड
घर की चाकी कोई ना पूजे, जाको पीस खाये संसार'

दगडालाच पुजायचे तर जाते पुजायचे. त्यातून पीठ निघते. जगाचे भरण-पोषण होते. दगडाला पुजून देव मिळत नाही, हे ते सांगतात. मुस्लिमांच्या बांगेविषयी ते म्हणतात –

'कंकर पाथर जोडी के, मस्जिद लय बनाय
ता चढी मुल्ला बांग दे, क्या बहरा हुआ खुदाय'

ईश्वर वा अल्लाशी भक्ताचा थेट संबंध आहे. अल्लाला भक्ताच्या मनात काय चालले आहे, हे कळविण्यासाठी बांग देण्याची गरज काय? आयुष्यभर वेद, शास्त्रे, पुराणे खूप वाचली. अखेरीस मरून गेला. पण तो पंडित झाला नाही. ज्याला प्रेमाची अडीच अक्षरे कळतात, म्हणजेच जो मानवजातीवर प्रेम करतो, तोच खरा पंडित होतो. हे सांगणारा त्यांचा हा दोहा प्रसिद्ध आहे –

'पोथी पढि पढि जग मुआ, पंडित भया न कोय
ढाई आखर प्रेम का पढे, सो पंडित होय'

१७ व्या शतकातले बुल्लेशहा. आजही त्यांची कवने पंजाबात लोकामुखी आहेत. हेही प्रेमाची महती गाणारे संत. सत्तरच्या दशकातला ऋषी कपूर आणि



डिंपल यांचा बॉबी सिनेमा ज्यांनी पाहिला आहे, त्यांना चंचलच्या आवाजातली त्यातली कव्वाली आठवत असेल - 'बेशक मंदिर मस्जिद तोडो...पर प्यार भरा दिल न तोडो...कहता है बल्लेशहा'. ही कव्वाली म्हणजे बुल्लेशहांच्या पंजाबीतील कवनाचे हिंदी रूपांतर.

मध्ययुगातल्या संतांविषयी अजून खूप सांगता येईल. तुकोबांचे कर्मठांवरचे आघात तर महाराष्ट्रातल्या आपणा सर्वांना सुपरिचित आहेत. त्यांची विशेष ओळख करून द्यायची गरज नाही. ही मंडळी सर्वत्र होती. काश्मीरपासून केरळपर्यंत, गुजरातपासून ओरिसा-बंगालपर्यंत देशातल्या अनेक राज्यांत हे संत होते. बंगालमधल्या वैष्णव व बौद्ध परंपरेचे मिश्रण असलेला बाऊल पंथ समाजवादी विचारांना जवळ जाणारा. एकटेच वा गटाने गात, नाचत फिरणाऱ्या बाऊलांचा रवींद्र टागोरांवर प्रभाव होता. रवींद्र संगीताचा बाऊल भजने हा मोठा आधार आहे.

मध्ययुगीन संतांच्या या विस्ताराने नोंदवलेल्या मुद्याचा शेवट करताना त्यांच्या बंडाविषयी काही विधाने करायला हवीत. त्यांनी ईश्वर आणि मनुष्य यांचे नाते खाजगी मानले. तो कोणी प्रियकर मानला, कोणी सखा, कोणी माऊली, कोणी पिता. या नात्यांत भक्त आपल्या आईजवळ, प्रियकरावजळ, पित्याजवळ रुसेल, भांडेल, त्याला अद्वातद्वाही बोलेल. तो त्यांचा आपसी मामला झाला. त्यात दुसऱ्याने पडायचे कारण नाही. म्हणजेच ईश्वरापर्यंत पोहोचायला, त्याच्या जवळ रदबदली करायला कोणी पुरोहित, पाद्री, मुल्ला असे मध्यस्थ नकोत. नाही मंदिर, मशीद अशा प्रार्थना स्थळांची गरज आहे ईश्वर भेटीस. तो कुठेही भेटेल. कबिराला हातमागावर कापड विणताना, जनाबाईला पीठ दळताना, गोऱ्या कुंभाराला मडके घडवताना तर सावता माळ्यास फुलांची रोपे रोवताना. या सर्वांनी मृत्यूनंतरच्या जगाची कामना केलेली नाही. जिवंतपणीच्या कर्मकांडालाही महत्त्व दिले नाही. त्यांनी माणसा-माणसातील प्रेमाला, मैत्रीला, बंधु-भगिनीभावाला, सहभावाला अव्वल मानले. जात, लिंग यांच्या सामाजिक विषमतेला नकार दिला. किमान आध्यात्मिक क्षेत्रात तरी त्यांनी मानवतेचा जागर मांडला. हा जागर आजही भजनांतून कानावर येत असतो. मात्र त्याचा मूळ आशय धूसर होतो आहे. कर्मकांडे जोरात सुरू आहेत. मध्यस्थ शिरजोर आहेत. ज्यांना आजच्या या विकृतींशी झगडायचे आहे, त्यांच्या मदतीला ही मध्ययुगीन संतांची विचार कवने तत्परतेने तयार आहेत.

### भारतीय मुस्लीम, ख्रिश्चन भारतीयत्वाचा हिस्सा

१६ व्या शतकातला सम्राट अकबर हा त्याच्या अठराशे वर्षे आधीच्या सम्राट अशोकाची आरशातली प्रतिमा वाटावी इतकी त्या दोघांची धर्म व वैविध्याचा आदर

करणारी धोरणे सारखी आहेत. त्याचा नवरत्न दरबार, दिने इलाही हा स्वतंत्र उदारमतवादी धर्म स्थापन करणे, अन्य विविध आस्थांचा आदर करणे, विविध धर्मांच्या विद्वानांच्या एकत्रित चर्चा घडवणे, कलांना उत्तेजन यांमुळे भारतीय सांस्कृतिक जीवन समृद्ध व्हायला मदत झाली.

इस्लामच्या मूर्तिभंजनाच्या, अन्य श्रद्धा बाळगणाऱ्यांना काफर म्हणण्याच्या रुढ अर्थांना मुस्लीम तत्त्ववेत्तेही प्रश्न करतात. प्रत्यक्ष व्यवहारात सर्वसामान्य मुस्लिमांच्या जगण्यात तर या अर्थांना जवळपास स्थानच नाही. खुद्द बाबराने हुमायूनला पूर्वग्रहांपासून मुक्त राहण्याचा, देवळांचे रक्षण, गाईंचा सांभाळ करण्याचा, उचित न्याय करण्याचा सल्ला दिला होता. अवधचा नवाब वाजिद अली शाह याने राधा-कृष्णाच्या प्रेमकथेवर नाटक लिहिले. मुस्लीम शाही महालात होळी खेळली जाताना दिसते. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या घरात ज्या हिंदू राण्या, सुना होत्या, त्या त्यांच्या पूजाअर्चा करताना दिसतात. औरंगजेबाचा भाऊ दाराशुकोह याने भगवद्गीतेचा फारसीत अनुवाद केला. दर्ग्याला भेट देऊन तिथे चादर चढविणे हे हिंदू सहज करत असतात. अनेक देवळे व दर्गे एकाच आवारातही दिसतात. अनेक गावांत देवळांतले एक मानकरी मुस्लीमही असतात. मुस्लिमांच्या चालीरीतींत कितीतरी हिंदू प्रथा आल्या. हिंदूंच्या लग्न, मेजवानीतील जिलबीसारखे पदार्थ मुस्लिमांकडून आले. हिंदूंचे मंगळसूत्र इथल्या अनेक मुस्लीम व ख्रिश्चन स्त्रियांनी स्वीकारलेले दिसते. सहाशे वर्षांची मुस्लीम राजवटीची गुलामी म्हणून तिच्या विरोधात आज हिंदूंची अस्मिता भडकावली जाते. पण याच हिंदूंतले ब्राह्मण, क्षत्रिय राजे (ज्यात तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, पेशवे आदी होते) यांनी १८५७ च्या उठावात दिल्लीच्या बहादूरशहालाच आपला बादशहा घोषित केले होते.

### संस्कृती, राजनिष्ठा आणि आजचे राष्ट्र राज्य यांची गल्लत नको

राष्ट्र राज्याची आजची कल्पना जुन्या राजेशाहीवर लादली गेली तर गडबड होते. जोधपूरच्या महालात काही दिवसांपूर्वी आम्ही गेलो होतो. 'पधारो म्हारो देस' म्हणून तेथे दोन राजपूत गायक गात होते. शेजारी फलकावर शत्रूशी काय शौर्याने येथील सैन्य लढले आणि मातृभूमीला त्यांनी कसे वाचवले असे वर्णन होते. ते वाचल्यावर वा ऐकल्यावर शौर्यरसाने शत्रूविरोधात लढण्यासाठी आपले बाहू फुरफुरू लागतात आणि देशभक्तीने आपली छाती भरुन येते. पधारो म्हारो देस ऐकताना आपल्यासमोर लढवय्या राजपुतांची मरूभूमी राजस्थान हे संपूर्ण राज्य असते. शत्रूविरोधी लढाईचे वीररसपूर्ण वर्णन ऐकताना भारत देश आपल्या डोळ्यासमोर असतो. पण फलकावरील पुढील भाग वाचल्यावर फूस होऊन



आपल्या वीररसाच्या फुग्यातली हवा निघून जाते. कारण जोधपूरची ही लढाई जयपूरच्या राजाशी केलेली असते. हे दोन्ही राजे राजपूत असतात. हिंदू असतात. जोधपूरला येण्याआधी किंवा नंतर पर्यटक जयपूरला भेट देतच असतात. तिथे त्यांना हाच वीररस त्या राजाच्या पराक्रमाच्या कथेत चाखायला मिळतो आणि तिथेही पधारो म्हारो देस म्हणून गायक स्वागत करतच असतात. हे लढवय्ये, बलिदानाला मागेपुढे न पाहणारे राजपूत आपसातले हिशेब करायला मुस्लीम आक्रमकाला कसे मिळतात, याच्या पुष्कळ कहाण्या इतिहासात आहेत.

संस्कृती आणि राष्ट्र यांची गल्लत होऊ देता कामा नये. जुन्या राजनिष्ठा आज भारतीय निष्ठांशी जोडू नयेत. गफलत होते.

### राम नाही सीतेच्या तोलाचा

'राम म्हणू राम, नाही सीतेच्या तोलाचा । हिरकणी सीतामाई, राम हलक्या दिलाचा । हे आपण महाराष्ट्रातल्या महिलांच्या ओव्यांत ऐकले असेल. या महिला रामाला बोल लावताना दिसतात. तो सीतेच्या तोलाचा नाही, असा निर्वाळा देतात. कारण? – कारण १४ वर्षे रावणाकडे राहिलेली सीता पवित्र कशी असेल, ह्या कोण्या परिटाने उपस्थित केलेल्या शंकेची तो दखल घेतो. गर्भवती सीतेचा त्याग करतो. म्हणून तो हलक्या दिलाचा.

हा तर 'श्रीरामाचा' अवमान! म्हणजे या बाया आजच्या भाषेत ईशनिंदा करत आहेत. त्यांना शिक्षा द्यायची की नाही? 'जय श्रीराम' चा युद्धघोष करत या महिलांना धडा शिकवायचा की नाही? किमान दम तरी द्यायचा की नाही?

ही गंमत नव्हे. खरोखरच हे होऊ शकते. इतकी 'भक्ती' आज पिसाळली आहे.

रामायणाच्या उत्तरकांडातल्या सीतेशी रामाच्या झालेल्या या व्यवहाराबद्दल कितीतरी कथा, कविता, नाटके लिहिली गेली आहे. 'उत्तररामचरित' या नावाने भवभूतीचे यावर नाटक आहे. मध्ययुगाच्याही आधी आठव्या शतकाच्या अखेरीस लिहिलेले हे नाटक आहे. म्हणजे एका घटनेची वेगवेगळी कथ्ये (नरेटिव्हज), मापने जुन्या काळापासून आपल्याकडे आढळतात. रामाने तप करणाऱ्या शूद्र शंबूकाची केलेली हत्या, लक्ष्मणाच्या बायकोचे- ऊर्मिलेचे एकाकीपण, द्रोणाचार्यांनी एकलव्याचा अंगठा घेणे, ज्येष्ठ कुंतिपुत्र, पहिला पांडव असतानाही कर्णाला अवमान सहन करावा लागणे, अश्वत्थाम्याच्या माथ्यावरची अखंड भळभळणारी जखम, सिद्धार्थाचे राहुल-यशोधरेला सोडून जाणे यांनी विचारवंतांना, कलावंतांना नेहमीच खुणावले आहे.

## रावण, दुर्योधन, कर्ण यांचीही देवळे

साहित्य, कला, ग्रंथातच नाही, तर प्रत्यक्ष लोकजीवनात या मापनांनुसार लोकांनी आपली श्रद्धास्थाने ठरवलेली दिसतात. कानपूर जवळ रावणाचे मंदिर आहे. दक्षिण भारतात तर रावणाला पूज्य मानतात. रावण दहनाला त्यांचा विरोध असतो. रावणाला पूज्य मानणाऱ्यांचे एक वेगळे कथ्य असते. बाजू असते. लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले. एका स्त्रीचे नाक कापणे हे कोणत्या नीतीत बसते? शूर्पणखा ही रावणाची बहीण. बहिणीच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी रावणाने सीतेचे अपहरण केले. तिला कैदेत ठेवले. पण तिच्या स्त्रीत्वाचा त्याने आदर केला. रावण विद्वानही होता. म्हणून रावण त्यांना पूज्य वाटतो. रामाने वाली त्याचा भक्त असताही सुग्रीवासाठी त्यावर लपून बाण मारणेही काहींना मंजूर नसते.

हे रामाचे आणि रावणाचे भक्त दोघेही हिंदू म्हणवतात. उद्या अधिकृत 'हिंदू राष्ट्र' झाले तर रामाला की रावणाला पुजायचे? एक निर्णय कसा करणार?

उत्तराखंड राज्यात हर की धूनच्या रस्त्यावर दुर्योधनाचे देऊळ आहे. दुर्योधन हा ज्येष्ठ कौरव पांडवांचा विरोधक, महाभारतातला खलनायक. त्याचे देऊळ इथे का बरे? त्याला मानणाऱ्यांच्या मते तो जातिवादी नव्हता. कर्ण या सुतपुत्राला त्याने आपला मित्र मानून सन्मान दिला. आई गांधारीलाही त्याने मी उच्चनीचता मानत नाही, असे सांगितले. कर्णाचेही देऊळ याच भागात आहे. तोही अन्याय झालेला नायक मानला जातो.

## वामन की बळी?

वामनाची कथा प्रसिद्ध आहे. बळी दानशूर, पराक्रमी राजा. पण देवांच्या डोळ्यांत खुपू लागतो. त्याचा बंदोबस्त करायला विष्णू वामन या ब्राह्मण मुलाचा जन्म घेतो. दानशूर बळीकडे वामन जातो. काय दान हवे, असे बळीने विचारल्यावर तीन पावले जमीन वामन मागतो. बळीने हो म्हटल्याबरोबर वामन हिमालयाएवढा उंच व विशाल बनतो. पहिल्या पावलात पृथ्वीवरील सर्व जमीन व्यापतो. दुसऱ्या पावलात आकाश संपते. तिसरे पाऊल कुठे ठेवू विचारल्यावर राजा माझ्या मस्तकावर ठेव म्हणतो. ही संधी साधून वामन बळीला पाताळात गाडतो.

ही कथा इथेच संपत नाही. दानशूर लोककल्याणी बळी राजा पाताळात गेला तरी दरवर्षी काही दिवसांसाठी पृथ्वीलोकात येतो. आपल्या जनतेची ख्यालीखुशाली घेतो. या त्याच्या आगमनाचा उत्सव केरळमध्ये सर्वधर्मीय लोक साजरा करतात. त्या सणाला 'ओणम' म्हणतात.



हिंदू राष्ट्र आले तर वामन राहणार की बळी? अन्यत्र हिंदू वामनाला मानतील आणि केरळातले हिंदू बळीला असे कसे होईल. मध्यंतरी अमित शहांनी केरळमध्ये वामनाची स्तुती केली होती. त्याला संतप्त प्रतिक्रिया आल्या.

## दुर्गा की महिषासुर?

नवरात्र हा हिंदूंमध्ये सार्वत्रिकपणे साजरा होणारा सण. बंगालमध्ये तर दुर्गेचा हा सोहळा विशेषच असतो. दुर्गेने क्रूरकर्मा महिषासुर या राक्षसाचा पायाखाली दाबून हातातील त्रिशूळाने वध केला आणि लोकांना त्याच्या त्रासातून मुक्त केले, ही कथा. या कथेशी प्रतिकूल कथ्य खुद्द बंगालमधीलच संथाळ या आदिवासी समूहाचे आहे. ते स्वत:ला महिषासुराचे वंशज मानतात. त्यांच्या मतानुसार त्यांचा राजा महिषासुर लोककल्याणी, पराक्रमी. देवांना ते बघवेना. त्यांनी दुर्गा या सुंदर युवतीला त्याचा काटा काढायला पाठविले. तिने महिषासुराला मोहिनी घातली. राजाला वश केले. त्याच्यासोबत राहिली आणि नवव्या दिवशी त्याचा तिने कपटाने खून केला. इथे संथाळांच्या दृष्टीने दुर्गा खलनायिका.

## नक्की नायक कोण, याचा निकाल कसा लावायचा?

काही वर्षांपूर्वी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात महिषासुराची जयंती साजरी केली म्हणून स्मृती इराणींनी संसदेत ही राष्ट्रद्रोही कृती असल्याचे आवेशपूर्ण भाषण केले. त्या वेळी काहींनी त्यांच्या निदर्शनास आणले, गेली २० वर्षे जेएनयूमध्ये ही जयंती होते आहे. या देशात एकच मान्यता नाही. आदिवासींची त्यांची म्हणून मान्यता आहे. ते महिषासुराला आपले आराध्य मानतात. ते त्याची जयंती करतात.

मागे वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. ती अशी. दुर्गोत्सव करणाऱ्या भद्र मंडळींनी संथाळांना महिषासुराविषयीचा त्यांचा कार्यक्रम करायला निमंत्रण दिले. दुर्गेच्या मंडपात महिषासुर मंडन संथाळांनी केले.

मला वाटते हीच रीत आपल्या देशातील या विरोधी कथ्यांचा निरास करायचा खरा मार्ग आहे. तुम्ही तुमच्या दैवताचे भजन करा. आम्ही आमच्या करतो. दोहोंनी आपापले म्हणणे मांडावे. दोहोंकडच्या लोकांनी ते ऐकावे. परस्परांच्या भिन्न वा विरोधी श्रद्धांचा आदर करावा.

छत्तीसगड परिसरातील आदिवासी बहुल विभागात तिथल्या नेत्यांनी दुर्गा पूजा आमच्या भावनांवर आघात करते, सबब तिच्यावर बंदी घालावी अशी मागणी केली. ती खूप पुढे गेलेली दिसत नाही. पण बंदीची ही मागणी निश्चितच बरोबर नाही. ज्याने त्याने आपापले उत्सव करावे. विरोधी बाबींविषयी सहिष्णू राहावे.

### हिंदू-मुसलमान एकाच कुटुंबात

'मेरा निकाह हुआ और मेरी बहन के फेरे.'...आमच्या एका ऑनलाइन बैठकीत राजस्थानातील एक कार्यकर्ती बोलत होती. हे एवढेच ऐकणाऱ्याला वाटू शकते, बोलणारी मुसलमान आहे आणि तिच्या मुसलमान बहिणीने हिंदूशी लग्न केले. कारण तिने फेरे घेतले. पण तसे नाही. या दोघी हिंदू आहेत आणि मुसलमानही. एकाच वेळी दोन्ही धर्माच्या. हे अचंबित करणारे आहे ना? हो. मीही हे सगळे ऐकताना अचंबित झालो होतो.

राजस्थानातील अजमेर, भीलवाडा, पाली आणि राजसमंद या जिल्ह्यांत पसरलेला सुमारे दहा लाखांची संख्या असलेला चीता मेहरात काठात समुदाय. चीता, मेहरात, काठात अशा अंतर्गत तीन ओळखी, भाग असलेला एकाच वैशिष्ट्यांचा हा समुदाय. हिंदू व मुसलमान दोन्ही. तुमचा धर्म कोणता? ..या प्रश्नाला त्यांचे उत्तर आहे: 'हिंदू-मुसलमान'. एकाच कुटुंबात दोन्ही उपासना होतात. दोन्ही धर्मांचे सण साजरे केले जातात. आपल्या आवडीनुसार दोन्ही पेहराव केले जातात. मशीद व देऊळ दोन्ही त्यांच्या गावांत आहेत. कुटुंबातील सदस्यांची नावेही मिश्र आहेत. वडील जवाहरसिंग तर मुलगा सलालुद्दीन. एक बहीण सलमा, तर दुसरी विद्या. सुरुवातीला ज्या कार्यकर्तीचे अवतरण दिले आहे, ती कार्यकर्ती व तिची बहीण याच प्रकारची. दोघींची लग्ने दोन धार्मिक पद्धतीने झालेली. या पद्धती कोण ठरवते? ...ज्यांचे लग्न होणार आहे ती मंडळी. त्या उभयतांची इच्छा. लग्न ज्या पद्धतीने झाले, त्याच पद्धतीने पुढील सर्व रीतिरिवाज होतील असे नाही. ही मंडळी पूजाही घालतील. मुलांची नावे दोन्ही धर्मातली ठेवतील. या मुलांना त्यांचे स्वातंत्र्य असेल, त्यांनी कोणत्या रीती पाळाव्यात याचे. दिवाळी व ईद दोन्ही आपलेच समजून हे लोक साजरे करतात. तब्बल सातशे वर्षे हे चालू आहे.

सातशे वर्षे ठीक चालले होते. त्यांचे 'हिंदू-मुसलमानत्व' अभंग होते. पण आधुनिक काळाने, खरं म्हणजे साचेबंद समजाने त्यांच्यासमोर प्रश्न उभे करायला सुरुवात केली. हॉस्पिटलमध्ये केसपेपर काढताना, ट्रेनचे रिझर्व्हेशन करताना 'रामचंद्र हुमायून' असे नाव सांगितले की लोक चमत्कारिकपणे बघू लागतात. ओळखपत्र दाखवले की पोलीस संशय घेऊ लागतात. 'असली नाम बोल' असे दटावले जाते. शाळेत पूर्वी धर्माच्या रकान्यात धर्म 'हिंदू-मुसलमान' असा लिहिला जात असे. आता तिथेही प्रश्न येऊ लागले आहेत. त्यात हल्ली दोन्ही धर्मातले कर्मठ त्यांना भेटून दम देतात – एक तर हिदू व्हा, नाहीतर मुसलमान..!



हे वातावरण पाहता ही चीता मेहरात जमात आपली मूळ ओळख किती धरून ठेवू शकेल ठाऊक नाही. 'हिंदू-मुसलमान' असलेल्या या समुदायाचे पुढच्या एक-दोन दशकांतच मुख्यत: हिंदू आणि उर्वरित मुसलमान असे विभाजन अटळ दिसते आहे.

...तर भारतीय संस्कृती ही अशी विभिन्नता सामावणारी आहे. इथला कुठलाच धर्म तसा एकसाची नाही. हिंदू धर्म तर नाहीच नाही. त्याच्या उदरात प्रचंड विरोधाभासी घटक एकाच वेळी वसले आहेत.

■

# सेक्युलॅरिझम/धर्मनिरपेक्षता

राजेशाहीत राजा लोक निवडून देत नाहीत. तो वंशपरंपरागत किंवा ज्याने ते राज्य जिंकले तो तिथला राजा असतो. जनता ही राजाची प्रजा असते. वर राजे बदलायचे पण गावे, तेथील रचना, आस्था तशाच राहायच्या. कित्येकदा वर कोण राजा वा शासक आहे याचे जनतेला सोयरसुतक नसायचे. राजे त्यांच्या स्वत:च्या समजानुसार, श्रद्धांनुसार वा राज्य चालवण्यासाठी आवश्यक म्हणून लोकांच्या धर्म-संस्कृतीच्या व्यवहारात सोयीने काही वेळा हस्तक्षेप करायचे. एखाद्या चांगल्या राजा वा सम्राटाविषयी जनतेला कृतज्ञता असायची. पण ती काही स्वत:चे भविष्य स्वत: ठरविण्यासाठीची आकांक्षा नव्हे. या आकांक्षांच्या पूर्तीसाठी लोकांच्या भागीदारीची, मतदानाने सरकार निवडण्याची आधुनिक  राज्यपद्धती आल्यावर, म्हणजे लोकांचे राज्य आल्यावर, 'राष्ट्र  राज्य' (नेशन सेट) आल्यावर जनतेच्या धर्म, आस्था, संस्कृती यांच्या संदर्भात सरकारला औपचारिक भूमिका घेणे भाग पडू लागले. मतदानाच्या दृष्टीने धर्म वा सांस्कृतिक गटांची बहुसंख्या, अल्पसंख्या यांची दखल राज्यकर्त्यांना घेणे गरजेचे झाले. सरकार विशिष्ट धर्माकडे झुकते हा आरोप मिश्रधर्मीय देशात सर्वांचे सरकार या विश्वासाला तडा देणारे असते.  एकच धर्म प्रमुख आणि तेथील ऐतिहासिक क्रमात त्याच धर्माचा प्रभाव असलेल्या शासनाचा व्यवहार निराळा असू शकेल. म्हणजे त्याच धर्माला प्राधान्य देणारा असू शकेल. काहीही असो, अशा वेळी धर्माचा आणि राज्याचा संबंध नक्की करणे शासनाला आवश्यक होते. ते अनौपचारिक ठेवून चालत नाही. धर्माशी राज्याचा हा औपचारिक संबंध सेक्युलॅरिझमच्या मुळाशी आहे.

सेक्युलॅरिझम ही आधुनिक कल्पना आहे. जुने राजे भले सर्व धर्मांशी समान व्यवहार करत आले असतील. तरी आजच्या सेक्युलॅरिझमची तुलना त्या काळाशी करता येणार नाही.



युरोपात धर्मसंस्था (चर्च) धर्म आणि शासन दोहोंत दखल देई. यातून पुढे ताण तयार झाले. राज्यकारभारापासून धर्मसंस्थेने अलग राहावे यासाठी तेथे आंदोलने झाली. परिणामी, धर्माने धर्माच्या क्षेत्रात आणि राज्याने राज्याच्या क्षेत्रात सीमित राहावे. परस्परांच्या क्षेत्रात ढवळाढवळ करू नये, असे तत्त्व स्थापित झाले. हे तत्त्व म्हणजेच सेक्युलॅरिझम. मराठीत त्याला धर्मनिरपेक्षता असे आपण म्हणतो. राज्याने धर्माच्या बाबत निरपेक्ष अथवा तटस्थ असावे हा धर्मनिरपेक्षतेचा ढोबळ अर्थ. ढोबळ यासाठी की देशोदेशीच्या शासनांनी याच काटेकोर अर्थाने आपल्या देशात हे तत्त्व अमलात आणलेले नाही. तेथील ऐतिहासिक प्रक्रियांनी त्यांच्या देशातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वात फारफेर झालेले आहेत. सोयीसाठी आपण सेक्युलॅरिझमचा प्रतिशब्द म्हणून धर्मनिरपेक्षता या शब्दाचा वापर करतो. इथेही करू. तथापि, सेक्युलॅरिझम किंवा धर्मनिरपेक्षता असलेल्या सर्व देशांत त्यांचे अर्थ संपूर्णत: एक नाहीत, हे ध्यानात धरूया.

हे विवेचन थोडे कठीण झाले असेल. त्यातील राष्ट्र राज्य (नेशन सेट) वगैरे आधुनिक संकल्पना, जुन्या शासनापासून त्यांचे वेगळेपण याबाबतची अधिक तपशिलातली मांडणी मूळ मुद्द्याचा अवकाश कळण्यासाठी गरजेची असली तरी ते एक स्वतंत्र व मोठे विवेचन होईल. तूर्त, त्यात अधिक न पडता आपण पुढे जाऊ. क्रमात त्यातील काही बाबींचा बोध होईल. खूप काही अडणार नाही.

साम्राज्यवाद विरोधी म्हणजे इंग्रजांच्या विरोधातल्या स्वातंत्र्य चळवळीत भारताने संविधानात स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्षतेचा विकास झाला. वास्तविक लोकशाही, संसदीय प्रणाली, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या सर्वच मूल्यांचा विकास स्वातंत्र्यासाठीच्या आणि त्यास समांतर चाललेल्या सामाजिक सुधारणांच्या आंदोलनातून झालेला आहे. पुढे ही मूल्ये संविधानात संकलित केली गेली.

याबद्दल आपण पुढच्या प्रकरणात चर्चा करणार आहोत. इथे आपण सेक्युलॅरिझमची संकल्पना पाश्चात्त्य तसेच अन्य काही देश आणि भारत यांच्या संदर्भात समजून घेऊ.

**अमेरिका**

अमेरिकेत शासन आणि धर्म हे पूर्णपणे अलग करण्यात आले आहेत. या दोहोंतले कोणीही एकमेकांच्या क्षेत्रात दखल देणार नाही. धार्मिक संस्थेला अमेरिकन सरकार आर्थिक साहाय्य करणार नाही. त्याचबरोबर त्या धर्माची

मंडळी जर स्त्रीला धर्मगुरू बनवायच्या विरोधात असतील, तर तिथे सुधारणा करायलाही सरकार जाणार नाही. धर्माचे क्षेत्र सोडून सार्वजनिक व्यवहारात स्त्री-पुरुष समानता असेल. तिथे स्त्रीला दुय्यम मानणे कायदेशीर अपराध होईल. पण धर्मकार्यात स्त्रीला दुय्यम मानले जात असेल तर तो धर्म आणि त्याची उपासना करणारे यांच्या अंतर्गतचा तो मामला मानला जाईल. एखाद्या धर्मगुरूने त्याच्या धर्मातील व्यक्तीस बहिष्कृत केले, तर त्याची दाद सरकारी न्यायालयात मागता येणार नाही. कायदा आणि सुव्यवस्था हे सरकारचे क्षेत्र. त्यास बाधा आणणाऱ्या धर्माच्या मंडळींवर सरकार जरूर कारवाई करेल. धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब हे इथे कटाक्षाने पाळले जाते.

अशा या प्रगत अमेरिकेत सनातनी ख्रिश्चन प्रभाव आजही किती जोरदार आहे, हे स्त्रियांचा गर्भपाताचा अधिकार हिरावून घेण्याच्या तेथील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरून ध्यानात येते. अमेरिकेच्या सेक्युलॅरिझमला यामुळे हानीच पोहोचते.

**तुर्कस्थान**

तुर्कस्थानच्या केमाल पाशाने आपल्या देशात एक कठोर प्रकारचा सेक्युलॅरिझम राबवला. मुस्लिमांच्या पारंपरिक टोप्यांना कायद्याने बंदी आणली. स्त्री-पुरुषांना पाश्चात्त्य पोषाख घालायला प्रोत्साहन दिले. पाश्चात्त्यीकरण म्हणजेच आधुनिकता मानून ती झटपट प्रत्यक्षात आणण्यासाठीचे केमाल पाशाचे हे प्रयत्न लोकशाहीला, लोकांच्या वैयक्तिक निवडीच्या स्वातंत्र्याला घातक होते. पुढे ते टिकले नाहीत.

**इराण, इराक, पाकिस्तान**

प्रमुख लोकसंख्या मुस्लीम असलेल्या इराण, इराक, पाकिस्तान यांचा अधिकृत धर्म इस्लाम आहे. तिथे निवडणुका होतात. मात्र धर्मवादी शक्तींचा प्रभाव असतो. अफगाणिस्तानात तर आता मूलतत्त्ववादी म्हणजे कट्टरपंथी तालिबानचीच सत्ता आहे. इस्लाममध्ये मूर्तिपूजा अमान्य आहे, म्हणून बामियानचे जागतिक वारसा असलेले बुद्धाचे विशाल, भव्य प्राचीन शिल्प तोफांनी याच तालिबान्यांनी काही वर्षांपूर्वी उद्ध्वस्त केले. या मूलतत्त्ववादाचा स्त्रियांना प्रचंड फटका बसतो. त्यांचा सार्वजनिक व्यवहार थांबतो. त्या पडद्यात जातात. परिणामी शिक्षण आणि स्वावलंबनही जाते. या क्रमात अखखा देशच मागे पडतो.



**इंग्लंड**

इंग्लंड ही लोकशाही, उदारमतवादाची जननी मानतात. मात्र त्या देशाचा अधिकृत धर्म ख्रिश्चन आहे. मात्र मुस्लीम राष्ट्रांसारखी तेथील स्थिती नाही. व्यक्तीच्या मूल्यांना जोपासणारा तो देश आहे. तेथे आजही राणी आहे. राजघराण्याला विशेष अधिकार नाहीत. राष्ट्रपतीसारखा तो प्रकार आहे. राणी असल्याने तो देश आपल्यासारखा गणतंत्र नाही. गणतंत्र याचा अर्थ त्या देशातील कोणतेही राजकीय पद वंशपरंपरागत नाही. प्रत्येकाला निवडून यावे लागते. इंग्लंडमधील राणी वंशपरंपरागत आहे.

**नेपाळ**

नेपाळ हे एकमेव हिंदू राष्ट्र होते. पण आता ते धर्मनिरपेक्ष आहे. त्यांच्या नव्या घटनेप्रमाणे आता त्या देशाचा अधिकृत धर्म हिंदू नाही. कोणताच नाही.

**फ्रान्स**

इंग्लंडचा शेजारी फ्रान्स हा कठोर धर्मनिरपेक्षता पाळणारा देश आहे. त्याचा अधिकृत कोणताच धर्म नाही. धर्माशी राज्याचा संबंध नाही. धर्म हा लोकांच्या वैयक्तिक श्रद्धेचा भाग. लोकांनी तो घरात, खाजगीत पाळावा. त्याचे प्रदर्शन सार्वजनिकरीत्या करता येणार नाही. तिथे सरकारी शिक्षण संस्थांत ख्रिश्चनांनी गळ्यात क्रूस, शिखांनी पगड्या, मुसलमान पुरुषांनी टोप्या, स्त्रियांनी हिजाब घालायला परवानगी नाही. धर्माची पूज्य देवता, गुरू, प्रेषित यांच्यावर टीका करायला पूर्ण मोकळीक आहे. व्यक्तीच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा तो भाग आहे. प्राण देऊन त्याचे रक्षण करण्याची मानसिकता तिथे तयार झाली आहे. शार्ली एब्दो या नियतकालिकात प्रेषित पैगंबरांची व्यंगचित्रे छापण्यात आली होती. तो आमच्या धर्माचा अवमान आहे, असे मानून काही मुस्लीम कट्टरपंथीयांनी शार्ली एब्दोच्या कार्यालयात घुसून बेछूट गोळीबार केला. त्यात संपादक, प्रमुख पत्रकार ठार झाले. पण म्हणून शार्ली एब्दोच्या जिवंत राहिलेल्या पत्रकारांनी आपले काम थांबवले व नियंत्रित केले नाही. त्यांनी ते तसेच चालू ठेवले. नंतर काही वर्षांनी एका शाळेत एका शिक्षकाने शिकवताना पैगंबरांची चित्रे मुलांना दाखवली. त्यावरून संतापून एका मुस्लीम कट्टरपंथीयाने त्या शिक्षकाची मान कापून शीरच धडावेगळे केले. तरीही तेथील सरकार मागे सरले नाही. त्यांनी आपला सेक्युलॅरिझम कठोरपणे अमलात आणणे चालूच ठेवले आहे.

अशा कठोर सेक्युलॅरिझमने काय साधते, याबद्दल पुढे महत्त्वाच्या वादांची चर्चा करताना त्यावर अधिक बोलू. आता सेक्युलॅरिझमच्या देशोदेशीच्या आवृत्त्या समजून घेत आहोत.

**नेदरलँड, कॅनडा**

नेदरलँडमध्ये वाहने चालविण्याच्या नियमाप्रमाणे हेल्मेट सक्तीचे आहे. त्यात पगडीधारी शिखांना सूट नाही. कॅनडाच्या शाळेत शीखधर्मीय मुलाला कृपाण धारण करण्याची प्रारंभी परवानगी नव्हती. कोणतेही शस्त्र मुलांनी शाळेत आणता कामा नये, असा तो नियम होता. पुढे ही परवानगी देण्यात आली. कृपाण हे धर्माचे आवश्यक अंग आहे, म्हणून त्याचा अपवाद केला गेला.

आता भारताच्या सेक्युलॅरिझमची सूत्रे इथे विचारात घेऊ. भारताच्या सेक्युलॅरिझमचे अनेक आयाम आहेत. त्यांची पुढच्या प्रकरणांत चर्चा होणारच आहे.

**भारत**

वर नोंदवलेल्या देशांत एकतर ख्रिश्चन किंवा इस्लाम हाच धर्म आहे. भारतासारखी धर्म, संप्रदायांची प्रचंड सरमिसळ तिथे नाही. त्यामुळे त्यांना धर्मापासून राज्याची फारकत वा प्रमुख धर्म म्हणून ख्रिश्चन, इस्लाम स्वीकारणे हे तुलनेने सोपे गेले. भारतात विविध संप्रदायांना मानणारे लोक संख्येने प्रचंड, शिक्षण आणि आर्थिक स्थितीत पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत मागास आहेत. त्यांचा परस्परांत मिसळलेला कित्येक हजार वर्षांचा इतिहास आहे. भारतासारख्या विकसनशील खंडप्राय देशात या सर्वांची मोट बांधून पुढे सरकताना 'सहिष्णुता' हा सेक्युलॅरिझमचा पाया करावाच लागतो.

भारतात सरकारचे सर्व धर्मांना समान संरक्षण असेल. कोणत्याही एका धर्माला सरकारकडून विशेष महत्त्व दिले जाणार नाही. शासनाचा म्हणून कोणताही धर्म असणार नाही. याचा अर्थ सरकार धर्मापासून पूर्ण अलग राहील असे नाही. धर्माच्या नावे चालणाऱ्या आणि मानवी मूल्यांना हानिकारक प्रथा नष्ट करण्यासाठी सरकार पावले उचलेल. घटनेतील १७ व्या कलमाद्वारे भारताने अस्पृश्यता नष्ट केली. हुंडाविरोधी कायदा केला. हिंदू कोड बिल आणून हिंदू स्त्रियांशी धर्माच्या नावाने होणारा भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक, भाषिक अल्पसंख्य गट भोवतालच्या बहुसंख्याकांकडून दुर्लक्षित राहू नयेत, विकासाच्या संधींपासून अलग पडू नयेत म्हणून त्यांना खास संरक्षण व उपायाची धोरणे सरकार घेते.



भारताचा सेक्युलॅरिझम हा धर्मापासून पूर्ण निरपेक्ष नाही, तर त्याच्याशी मानवी मूल्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने हस्तक्षेपाचा अधिकार राखून संबंध ठेवतो. संमिश्र आस्था व संस्कृतीच्या भारतवासीयांत ऐक्य व एकात्मता राहून त्यांचा समतोल विकास व्हावा, यासाठीचा हा खास भारतीय सेक्युलॅरिझम आहे.

**देशात एकाच धर्माचे लोक; तरीही धर्मनिरपेक्षता आवश्यक आहे का?**

धर्म एक असो वा अनेक. धर्माचे क्षेत्र अध्यात्माचे आहे. कायदा व सुव्यवस्था तसेच आधुनिक जगातील विकासाची धोरणे हे शासनाचे काम आहे. एकदा का ही दोन क्षेत्रे वेगळी मानली की धर्मनिरपेक्षता हे तत्त्व तिथे येते. देशात एकाच धर्माचे लोक असले तरीही धर्मनिरपेक्षता गरजेची असतेच. युरोपात एकाच धर्माचे किंवा जवळपास एका धर्माचे लोक असलेले देश आहेत. तरीही त्यांनी धर्मनिरपेक्षता हे राज्यव्यवहाराचे सूत्र स्वीकारले आहे. एकाच धर्माचे सर्वाधिक लोक असले तर इतर धर्मातल्या लोकांशी त्यांचे संबंध ठरवतानाचे प्रश्न फारसे कठीण होत नाहीत, एवढाच फरक पडत पडतो.

सेक्युलॅरिझमची संकल्पना आणि विविध देशांतील त्याच्या रूपांचा संक्षिप्त परिचय आपण इथे करून घेतला. आता पुढील प्रकरणात भारतातील त्याच्या घडणीचा आढावा घेणार आहोत.

■

# भारतातील धर्मनिरपेक्षतेची घडण

इंग्रज आले त्या वेळी इथे राजे होते. काही छोटे. काही मोठे. त्यांचे त्यांचे कायदे त्यांच्या राज्यात चालत. सगळ्या देशात समान कायदे असायचा प्रश्नच नव्हता. बहुतेक कायदे धर्मशास्त्रांच्या आधारे असत. लग्न, घटस्फोट, वारसा याबाबत तर धर्माचाच आदेश चाले. मनुस्मृती, नारद स्मृती, याज्ञवल्क्य स्मृती यांतून या कायद्यांना मार्गदर्शन मिळे. मुस्लिमांच्या आगमनानंतर कुराण व हदिसच्या आधारे शरियतचे कायदे आले. इंग्रजांच्या राजवटीत कायदे व प्रशासनात मोठे बदल होऊ लागले. देशभर एकच कायदा होण्याकडे आणि कायद्याच्या राज्याकडे भारताचा प्रवास होऊ लागला. धार्मिक बाबतींतल्या कायद्यांत ब्रिटिशांनी आस्ते कदम धोरण स्वीकारले. तरीही सतीबंदीसारखे कायदे करत त्यांचा धर्मातला हस्तक्षेप सुरू झाला होता. मात्र हे कायदे करताना त्यांना हिंदूंतल्या राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर अशा उच्चवर्णीय सुधारकांचा पाठिंबा कामी येत होता. त्यामुळे हिंदूंच्यातला मागासपणा दूर व्हायला मदत होत होती. मुस्लिमांच्यातून आपल्या धर्मात सुधारणा करू पाहणारे सुधारक पुढे न आल्याने इंग्रजांनी मुस्लीम धर्माला हात लावला नाही. परिणामी मुस्लिमांतल्या सामाजिक सुधारणेला चालना मिळाली नाही.

लोकशाही, संसदीय प्रणाली, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये मानणाऱ्या प्रगत राज्यातून इंग्रज इथे आले होते हे खरे. पण ते राज्य करायला, साम्राज्य विस्तार करायला आले होते. इथल्या समाजाची उन्नती, सुधारणा हे काही त्यांचे प्रमुख लक्ष्य नव्हते. इथे आपले राज्य सुखेनैव राहायचे असेल तर इथली जनता आपल्या विरोधात एकत्र येता कामा नये, यावर त्यांचा कटाक्ष होता. १८५७ च्या उठावाला निमित्त झालेला हिंदू-मुसलमानांच्या धार्मिक बाबींतला हस्तक्षेप त्यांनी तो उठाव मोडल्यानंतर तातडीने थांबवला. हिंदू व मुसलमान हे दोन प्रमुख विभाग आपसात झुंजत राहतील, यासाठी त्यांनी पावले टाकायला सुरुवात केली.



१९०५ ची बंगालची फाळणी, १९०९ साली मुस्लीमांना स्वतंत्र मतदार संघ आणि पुढे १९१९ च्या कायद्याने शीख, ख्रिश्चन, युरोपियन, अँग्लो-इंडियन यांना असेच स्वतंत्र मतदारसंघ त्यांनी दिले. प्रत्येकाचा असा वेगळा हितसंबंध तयार झाला की ते एकत्र येणार नाहीत, यासाठीचे हे प्रयत्न होते.

तथापि, या सगळ्याला पार करून भारतीय स्वातंत्र्याचा लढा पुढे जात होता. देशाच्या विविध भागांतले विविध धर्माचे नेते राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत एकवटू लागले होते. त्यांना साथ करणारे समुदाय आपल्या वैविध्यासह 'भारतीयत्व' या ओळखीत सामावले जाऊ लागले. हे सामावणे स्वाभाविकच 'सेक्युलर' असायला लागणार होते. कोणा एका धर्माचे, भाषेचे प्रभुत्व असून चालणार नव्हते. शिवाय स्वातंत्र्य चळवळीतील या नेत्यांना १८५७ च्या उठावातील संस्थानिकांप्रमाणे पुन्हा राजेशाही आणायची नव्हती. इंग्लंड-अमेरिकेत शिकलेले, माणसाला केंद्रबिंदू मानणाऱ्या तिकडच्या आधुनिक मूल्यांचे संस्कार घेतलेल्या या नेत्यांना इथे इंग्रजांना घालवून नवा लोकशाही भारत स्थापित करायचा होता. याच शिक्षणाचे संस्कार घेतलेल्या नेत्यांच्या एका विभागाने इथल्या सामाजिक मागासलेपणाच्या विरोधात बंड पुकारले. देश स्वतंत्र व्हायचा तर तो सुधारलेल्या समाजाचा हवा ही त्यांची अपेक्षा होती. 'आधी राजकीय स्वातंत्र्य की आधी सामाजिक सुधारणा' हा वाद या नेत्यांत तयार झाला, तरी या दोहोंना ब्रिटिशांनी घेतलेला देश जसाच्या तसा परत नको होता. तो आधुनिक मूल्यांवर चाललेलाच हवा होता.

महात्मा फुले आणि त्यांच्या मृत्यूनंतर जन्मास आलेल्या त्यांच्या परंपरेचे वाहक डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्रज येथून गेल्यावर इथली सत्ता कोणाच्या हाती जाणार याबद्दल साशंक होते. पुन्हा प्रतिगामी उच्चवर्णीयांच्या हाती सत्ता गेली, तर इंग्रजांच्या काळात काही एक हक्क मिळवत असलेले इथले स्त्रीशूद्रातिशूद्र पुन्हा सनातन्यांचे गुलाम तर होणार नाहीत, ही त्यांना भीती होती. यासाठी ते ब्रिटिशांकडे त्यांच्यासाठी विविध अधिकार मागत होते. सामाजिक सुधारणांबरोबरच अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळण्यासाठी बाबासाहेबांनी जिवाचे रान केले. या क्रमात त्यांचे गांधी, नेहरू तसेच काँग्रेसशी तीव्र खटके उडाले. मात्र या संघर्षासह संविधानाच्या निर्मितीत ही मंडळी एकत्र आली.

या स्वातंत्र्य वा सामाजिक सुधारणांच्या लढ्यातून विविध पुरोगामी मूल्ये विकसित झाली. त्यातले एक महत्त्वाचे मूल्य होते – सेक्युलॅरिझम.

## महात्मा फुलेंनी कल्पिलेले विविध धर्मीय कुटुंब

१८२७ साली जन्मास आलेले महात्मा फुले विविध धर्मांचे लोक एका कुटुंबात नांदू शकतात अशी कल्पना मांडतात. ते म्हणतात –

‘भूमंडळावर महासत्पुरुषांनी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तो धर्म स्वीकारावा. तिच्या पतीने बायबल वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे वाटल्यास ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास महंमदी धर्मी व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. कोणी कोणाचा द्वेष न करिता सर्वांनी निर्मिकाच्या कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांशी वर्तन करावे. म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होईल.’

बापाचा धर्म मुलांना जन्मत: मिळण्याची रीत व संस्कार आजही आहे. बापाचा आणि मुलांचा धर्म वेगळा असेल अशी कल्पनाही कोणी करत नाही. मात्र पावणेदोनशे वर्षांपूर्वी एका कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीच्या उपासनेच्या, आपल्याला पटतो तो धर्म स्वीकारण्याच्या स्वातंत्र्याचा पुकारा हा महान समाजक्रांतिकारक करतो. एवढेच नव्हे, असे वेगळे धर्म स्वीकारल्यानंतर कोणी कोणाचा द्वेष न करता एका कुटुंबातील आहोत हे समजून प्रेमाने नांदावे, असे आवाहन फुले करतात.

व्यक्तीला श्रद्धेचे, उपासनेचे स्वातंत्र्य देणारे संविधान शतकानंतर तयार होणार होते. ते लिहिणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरही जन्मास यायचे होते. अशा काळात महात्मा फुले हा जो विचार मांडतात, तो सेक्युलॅरिझमचा मूलाधार आहे.

संविधान, त्याप्रमाणे कायदे नंतर पुढे झाले. पण त्यातील मूल्यांचा विकास, घडण अशी कितीतरी आधीपासून होत होती.

## राष्ट्रीय सभेचे अहवाल, ठराव

स्वातंत्र्याची चळवळ ही काही केवळ मोर्चे, प्रसार सभा एवढीच नव्हती. या चळवळीसमोर स्वातंत्र्य मिळाल्यावर देश कसा असायला हवा, याचा आराखडा तयार करायचेही आव्हान होते. त्यांच्या अभ्यास समित्या बसत. त्यांचे अहवाल येत. त्यांवर अधिवेशनात चर्चा होई. नवे ठराव मंजूर होत. सेक्युलॅरिझमचाही प्रवास यातून होत होता.



१९२८ ला मोतिलाल नेहरू समितीचा अहवाल सादर झाला. त्यात शिफारस आहे – ‘सामाजिक सुव्यवस्था व नैतिकता यांच्या चौकटीत राहून प्रत्येक व्यक्तीला विचार स्वातंत्र्य व आपल्या धर्मानुसार आचरण आणि धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य’ मूलभूत अधिकारांत दिले जावे. याच अहवालात कोणत्याही प्रांताचा सरकारी धर्म नसावा, सरकारने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही धर्माला आर्थिक साहाय्य देऊ नये, सार्वजनिक निधी मिळणाऱ्या शाळांत विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणास उपस्थित राहण्याची सक्ती केली जाऊ नये, सरकारी पद, सन्मान वा व्यवसाय यासाठी धर्म, जात वा पंथ यांच्या आधारे भेदभाव केला जाऊ नये, अशाही सूचना आहेत.

संविधानातील धर्मस्वातंत्र्याचे कलम २५ तसेच अन्य धर्मांच्या आधारे भेदभावास प्रतिबंध करणारी स्वातंत्र्य व समतेची कलमे यांचा २० वर्षे आधीचा हा स्रोत आहे.

शस्त्र बाळगण्याला आपल्याकडे परवाना नाही. मात्र धर्माचा भाग म्हणून शिखांना सार्वजनिक ठिकाणी कृपाण बाळगायला आपल्या संविधानाने परवानगी दिली आहे. या अपवादाची म्हणजेच कृपाण बाळगण्याची मुभा असल्याची नोंद एका पुस्तीद्वारे मोतिलाल नेहरूंच्या या अहवालाला त्या काळातच जोडलेली होती.

कराचीच्या १९३१ च्या अधिवेशनात कितीतरी नंतर संविधानात आलेल्या मूलभूत अधिकारांचा ठराव मंजूर झालेला आहे. त्यात ‘जात, धर्म, भाषा, लिंग आदी भेदभाव न होता कायद्यासमोर सगळे समान असतील’ तसेच ‘सर्व धर्मांच्या प्रति राज्य तटस्थ भाव ठेवेल’ असे नोंदवलेले आहे.

धर्मनिरपेक्षता संविधानात मागाहून घुसडण्यात आली या आक्षेपाची पुढे यथावकाश चर्चा आपण करणार आहोत. पण इथेच आपल्या लक्षात येते की संविधानात येण्याआधी आपल्या स्वातंत्र्य चळवळीतल्या कर्त्या नेत्यांनी त्याची योजना आधीपासूनच केली होती.

## सावरकरांचा द्विराष्ट्र सिद्धांत

धर्मनिरपेक्षता किंवा अन्य मूल्यांची पायाभरणी स्वातंत्र्य चळवळीतील नेते निर्वेधपणे करत होते असे नाही. त्यांना प्रतिरोध याच मातीतून आपल्याच लोकांकडून होत होता. इंग्रज जावेत असे प्रतिरोध करणाऱ्या गटालाही वाटत होते. मात्र ते गेल्यावर येणाऱ्या आपल्या सत्तेच्या विचारांचा आधार त्यांना बिलकूल उलटा अपेक्षित होता. सावरकर त्यात अग्रणी होते. इंग्रजांच्या फोडा आणि राज्य करा या

नीतीपासून हिंदू-मुसलमानांना सावध करून एकत्र आणण्यासाठी जिवाचे रान स्वातंत्र्य चळवळीतले नेते एकीकडे करत होते. तर दुसरीकडे हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत असे विभाजनाचे वैचारिक सूत्रच सावरकर मांडत होते. पाकिस्तानचा पुरस्कार करणाऱ्या जिनांनीही हे सूत्र मांडले पण ते खूप नंतर. १९३९ साली. सावरकरांनी त्याच्या १६ वर्षे आधी १९२३ लाच 'द्विराष्ट्रा'चा सिद्धांत मांडला.

तो काय ते समजून घेऊ.

पितृभू म्हणजे जिथे पूर्वजांचा जन्म झाला ती भूमी. पुण्यभू म्हणजे जिथे धर्मविषयक आदराची स्थळे आहेत ती जागा. ज्याची पितृभू आणि पुण्यभू भारत आहे, तोच या देशाचा हक्कदार नागरिक. हिंदू , त्यांचे पूर्वज इथेच जन्माला आले. पण त्यांची पूज्य धार्मिक स्थळेही याच देशात आहेत. मात्र मुसलमानांचे तसे नाही. ते भले जन्माला इथे आले असतील. पण त्यांची धर्मविषयक आदराची स्थळे मक्का, मदिना या ठिकाणी म्हणजेच बाहेरच्या देशात आहेत. त्यामुळे ते हिंदूंच्या बरोबरीने या देशाचे हक्कदार मानले जाणार नाहीत.

जिनांनीही हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत, अशी मांडणी केली. पण हिंदुस्थानची फाळणी करून या दोहोंचे दोन स्वतंत्र देश करावेत, अशी त्यांची मागणी होती. सावरकर तसे म्हणत नाहीत. दोन स्वतंत्र देशांची गरज त्यांना वाटत नाही. एकाच देशात दोन्ही राहतील. दोघांचे संविधान एकच असेल. मात्र या संविधानाद्वारे हिंदूंना श्रेष्ठ स्थान असेल, विशेष हक्क असतील. तर मुसलमान दुय्यम असतील. त्यांना हिंदूंसारखे अधिकार नसतील.

सावरकरांची ही भूमिका वाचून एक प्रश्न मनात येतो. भारतातून बौद्ध धर्म जगभर पसरला. जपान, चीन, कोरिया, व्हिएतनाम, श्रीलंका, म्यानमार, भूतान, कंबोडिया आदी अनेक देशांत बौद्ध बहुसंख्य किंवा लक्षणीय आहेत. हे देश त्यांची पितृभू आहे. मात्र त्यांची पूज्य स्थळे बोधगया, सारनाथ इ. भारतात आहेत. म्हणजे भारत त्यांची पुण्यभू आहे. सावरकरांचा निकष लावायचा तर या देशांतले बहुसंख्य लोक दुय्यम नागरिक होतील. तेच ख्रिश्चनांचे होईल. जेरुसलेम, बेथलहेम ही त्यांची पवित्र स्थळे. मग अख्खा युरोप आणि अमेरिका यांतल्या ख्रिश्चनांनाही दुय्यम नागरिक म्हणावे लागेल. कारण ते राहतात त्या देशांत त्यांची पवित्र स्थळे नाहीत.

काय अनवस्था प्रसंग ओढवेल नाही..!



**फाळणीनंतरही पाकिस्तानी भावंडांबद्दल सद्‌भाव**

अखेर देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच फाळणी झाली. पाकिस्तान आणि भारत हे दोन देश तयार झाले. स्वातंत्र्याचा जल्लोष आणि हिंदू-मुस्लीम दंगलींतून होत असलेला रक्तपात या दोहोंच्या पार्श्वभूमीवर भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू १४ ऑगस्ट १९४७च्या मध्यरात्रीचे स्वातंत्र्याचे स्वागत करणारे भाषण संविधान सभागृहात करतात. हे मंत्रमुग्ध करणारे भाषण 'नियतीशी करार' नावाने प्रसिद्ध आहे. त्यातला एक मुद्दा पाकिस्तान संबंधात आहे.

फाळणीच्या पार्श्वभूमीवर जिनांचा भाषा-व्यवहार आणि त्याला प्रतिक्रिया देणारे भारतातील कर्मठ राष्ट्रवादी यांच्यामुळे एक कडवट व विखारी वातावरण तयार झाले होते. ते पार करून बंधुत्वाच्या भावनेला साद घालत नेहरू या भाषणात म्हणतात, 'राजकीय सीमांनी तुटलेल्या (पाकिस्तानातील) आमच्या भावंडांबरोबर स्वातंत्र्य सोहळ्याचा हा आनंद आम्ही एकत्रित भोगू शकत नसलो, तरी ते आमचे आहेत, कायम आमचे राहतील. त्यांच्या सुख-दुःखाचे आम्ही भागीदार असू.'

**नेहरूंची राष्ट्रपतींना विनंती**

सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी १९४७-४८ ला एक समिती तयार करण्यात आली होती. तिच्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पटेल व मुन्शी होते. महात्मा गांधींचा या समितीला सल्ला होता – सरकारच्या तिजोरीतून यासाठी पैसे खर्च करायचे नाही. लोकवर्गणीतून निधी जमा करावा. पुढे मंदिर झाले. पटेलांचा तोवर मृत्यू झाला होता. आता मुन्शींवर जबाबदारी पडली होती. त्यांनी राष्ट्रपती राजेंद्र प्रसादांना मूर्तीच्या प्रतिष्ठापनेला निमंत्रित केले. सरकारी पदावर असताना या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणे हे धर्मनिरपेक्षतेला धरून नाही, अशी नेहरूंची भूमिका होती. त्यांनी ती राष्ट्रपतींना सांगण्याचा प्रयत्न केला. पण राष्ट्रपतींनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही. 'मला उद्या मशीद किंवा चर्चच्या कार्यक्रमाला बोलावले तरी मी त्या कार्यक्रमास जाईन.' असे त्यांनी नेहरूंना उत्तर दिले. ते सोमनाथ मंदिराच्या कार्यक्रमाला गेले.

त्यानंतर नेहरूंनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात – 'आपल्या सर्वांच्या मनात हे स्पष्ट असायला हवे की सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा प्रकल्प सरकारचा नाही. सरकारचा त्यात कोणताही सहभाग नाही. राष्ट्रपती अथवा मंत्री हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर ते त्यांच्या वैयक्तिक कार्यकक्षेत या कार्यक्रमास उपस्थित आहेत. संवैधानिक नैतिकतेला आणि धर्मनिरपेक्षतेच्या आशयाला बाधा पोहोचेल, अशा कृतीत शासनाच्या प्रतिनिधींनी उपस्थित असता कामा नये.'

धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व जपण्याचा नेहरू कसा आटोकाट प्रयत्न करत होते, हे आपल्याला यातून कळते. सरकार आणि धार्मिक कार्यक्रम यांच्या संबंधांची स्पष्टताही यातून आपल्याला येते.

या घटनेनंतर ७० वर्षांनी राम मंदिराच्या भूमिपूजनाचे आयोजक उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ असतात, तर पंतप्रधान मोदींच्या हातून मुख्य धार्मिक कार्यक्रमाचे होमहवन होते.

मोदींनी राममंदिराच्या या कार्यक्रमाला पाहुणे म्हणून हजर राहून शुभेच्छा देणे समजू शकले असते. पण एका धर्मनिरपेक्ष राष्ट्राचा पंतप्रधान म्हणून ते या कार्यक्रमाचे यजमान पद भूषवतात, हे त्यांचे वर्तन आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्षतेला धक्का लावणारे आहे. संसद भवनाच्या भूमिपूजनावेळीही ते त्यांच्या हातून यज्ञयाग करतात. मुळात सरकारी वास्तूचे भूमिपूजन धार्मिक सोपस्कारांनी का व्हावे, असा प्रश्न असताना पंतप्रधानांच्या हातून ही पुढची कृती घडते.

याचा अर्थ, देशाचे मूळ धर्मनिरपेक्षतेचे धोरण व्यवहारात बिनदिक्कत बदलले जाऊ लागले आहे. धर्मनिरपेक्षतेच्या घडणीच्या प्रवासाला हे उलटे वळण आता लागले आहे.

■



# संविधान व धर्मनिरपेक्षता

भारतीय संविधान ही राज्यकारभाराची केवळ नियमावली नाही, तर तो भारतीय जनतेच्या आकांक्षांचा संकल्प आहे. हा संकल्प आपल्याला 'आम्ही भारताचे लोक...' असा प्रारंभ असलेल्या संविधानाच्या उद्देशिकेत सापडतो. उद्देशिकेत संविधानाचे तत्त्वज्ञान आहे. ओळी अनेक असल्या तरी एकच वाक्य असलेल्या या उद्देशिकेत संविधानाचे सार सामावलेले आहे. उद्देशिकेत श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य नमूद आहे. धर्मनिरपेक्षतेची मूळची भूमिका ठळकपणे दर्शवण्यासाठी १९७६ सालच्या घटना दुरुस्तीने त्यात धर्मनिरपेक्षता हा शब्द घातला.

**उद्देशिका आणि ईश्वर**

ही उद्देशिका संविधान सभेत मंजुरीला आली असता, तिच्यावर झालेल्या चर्चेवेळी कामत नावाच्या एका सदस्याकडून एक सूचना आली. कोणत्याही चांगल्या कामाच्या प्रारंभी आपण ईश्वराचे आधी स्मरण करतो. त्याप्रमाणे या उद्देशिकेच्या प्रारंभी 'ईश्वरास स्मरून' असे लिहावे असे त्यांचे म्हणणे होते. अध्यक्ष राजेंद्र प्रसादांसह अनेकांनी घटनेच्या परिशिष्टात ईश्वराला स्मरून शपथ घेण्याचा पर्याय आहे, ही सूचना तुम्ही आणू नये अशी त्यांना विनवणी केली. पण ते इरेला पेटले होते. मताला सूचना टाकली गेली. मात्र मोठ्या बहुमताने ती फेटाळली गेली.

फेटाळणारे सगळे निरीश्वरवादी नव्हते. पण त्या सर्वांना राज्याच्या कारभारात 'ईश्वर' नको, ईश्वरावरचा विश्वास वा श्रद्धा ही व्यक्तीची खाजगी बाब आहे, हे धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व पटलेले होते.

आपण पाकिस्तानच्या घटनेची उद्देशिका पाहिली, तर मात्र तिच्यात आपण नाकारलेली बाब घातलेली दिसेल. पाकिस्तानच्या घटनेच्या उद्देशिकेच्या प्रारंभी अल्लाला स्मरून (इन द नेम ऑफ गॉड) असे लिहिलेले आहे.

ते स्वाभाविक आहे. कारण पाकिस्तान धर्मनिरपेक्ष नाही. त्याचा अधिकृत धर्म 'इस्लाम' आहे.

त्यांचा पाकिस्तान, मग आमचा हिंदुस्थान?

संविधान सभेचे कामकाज १९४६ ते १९४९ या काळात चालले. हा तीन वर्षांचा काळ देशात खूप उलथापालथ घडवणारा होता. दुसऱ्या महायुद्धाने जर्जर झालेल्या इंग्लंडने वेळेच्या आधीच भारताला स्वातंत्र्य दिले. घटनेचे काम पूर्ण व्हायचे होते. त्यामुळे घटना समितीलाच संसदेचीही भूमिका घ्यावी लागली. राष्ट्रीय सरकार बनवावे लागले. संविधान सभेवर मुस्लीम लीगची मंडळी निवडून आली होती. काँग्रेसच्या खालोखाल तोच मोठा पक्ष होता. मात्र जिनांनी संविधान सभेच्या कामावर बहिष्कार टाकला आणि पाकिस्तानची मागणी लावून धरली. त्यामुळे स्वातंत्र्याबरोबरच फाळणी होऊन भारत व पाकिस्तान असे दोन देश तयार झाले. पाकिस्तान धर्माच्या आधारावर आपले राष्ट्र उभे करणार होता. या पार्श्वभूमीवर आपल्याकडच्या काही हिंदू कट्टर शक्तींकडून हा देश आता हिंदूंचा असेल, अशी मोहीम सुरू झाली. याला आपल्या नेत्यांचा विरोध होता.

संविधान सभा बसली होती ती अखंड भारताची घटना लिहायला. सेक्युलॅरिझम हा तिचा पाया होता. दरम्यान भारताचा एक तुकडा वेगळा झाला. तो पाकिस्तान. त्याने आपले धोरण काय घ्यावे, हे ठरवायचा आता अधिकार त्याचा होता. हे जुन्या एकत्रित घरात एक भाऊ भांडून आपला हिस्सा वेगळा घेतो तसे होते. त्याने आपल्या घराला हिरवा रंग द्यायचा की कुठचा हा त्याचा निर्णय असतो. पण त्यामुळे उर्वरित घराचे जे स्वरूप आहे, ते कसे व का बदलायचे? अलग झालेल्या भावाने घराला हिरवा रंग दिला म्हणून आम्ही आमच्या एकत्रित जुन्या घराला भगवा रंग का म्हणून द्यायचा? आधीपासून ठरले असेल त्याप्रमाणेच आम्ही राहणार. त्यामुळे आपल्या घटनेतले सेक्युलॅरिझमचे तत्त्व पाकिस्तान बनल्यामुळे बदलण्याचा प्रश्नच नव्हता.

गांधीजींनी निक्षून सांगितले – 'भारत त्या सर्व लोकांचा आहे जे इथे जन्मले आणि वाढले. त्यामुळे तो जेवढा हिंदूंचा आहे तेवढाच पारशी, ज्यू, भारतीय ख्रिश्चन, मुसलमान आदींचाही आहे. स्वतंत्र भारतामध्ये हिंदूंचे नाही तर भारतीयांचे राज्य चालेल व ते कुठल्याही धार्मिक पंथ वा संप्रदायाच्या बहुमतावर नाही, तर धार्मिक भेदभावाशिवाय, सर्व जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालेल. धर्म हा वैयक्तिक विषय आहे. त्याला राजकारणात कुठलेही स्थान असता कामा नये.'

गांधीजींची ही भूमिका मान्य नसणाऱ्या शक्तींनी नथुराम गोडसे करवी त्यांचा खून केला. घटनेचे काम सुरू असतानाच गांधीजींचा १९४८ साली जानेवारीच्या अखेरीस खून झाला.



ज्यांना देश घडवायचा होता, त्या स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळीतील नेत्यांची सेक्युलॅरिझमबद्दल किती ओढ होती, हे त्यांच्या खालील विधानांवरून ध्यानात येते. आपल्या जात, प्रदेश, धर्माच्या ओळखीच्या पलीकडे जाऊन आपण आपली 'भारतीय' ही ओळख प्रमुख करायला हवी, यावर हे सगळे अढळ होते.

वल्लभभाई पटेल म्हणतात – 'हर भारतीय को अब यह भूल जाना चाहिए की वह एक राजपूत है, एक सिख या जाट है. उसे याद होना चाहिए की वह एक भारतीय है.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात – 'मी प्रथम व अंतिमत: भारतीय आहे.'

बेगम ऐझाज रसूल म्हणतात – 'धर्मनिरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. भारतातील लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील.'

मौलाना अबुल कलाम आजाद म्हणतात – 'अगर एक विशेषता जो आधुनिक भारत को दूसरों से अलग बनाती है, वह है लोकतंत्र की भावना का विकास, जो अपने सभी नागरिकों को अवसर की समानता प्रदान करता है. पहले के सभी अवरोध जो जन्म, विशेषाधिकार, जाति या धन पर आधारित थे, टूट रहे हैं. एक धर्मनिरपेक्ष लोकतांत्रिक राज्य के रूप में, हम अवसरों और सभी के लिए अवसर की समानता को विस्तृत करने को प्रतिबद्ध हैं.'

**कट्टरपंथी हिंदुत्ववाद्यांना संविधान अमान्य**

सेक्युलॅरिझम व अन्य प्रगत मूल्यांवर आधारलेली घटना ज्यांना मंजूर नव्हती, अशांनी जमेल तसा घटनेला विरोध केला. त्यांची ताकद त्यावेळी फारशी नव्हती. त्यामुळे या विरोधाचा काही परिणाम झाला नाही.

घटना मंजूर झाल्यानंतर चारच दिवसांनी आपल्या ऑर्गनायझर या मुखपत्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संपादकीय लिहिले –

''या संविधानाबाबतची सर्वात वाईट गोष्ट म्हणजे यात काहीही भारतीय नाही. ...यात प्राचीन भारतीय सांविधानिक नियम, संस्था, संज्ञा, परिभाषा यांचा मागमूसही नाही. ...प्राचीन भारतातील अतुल्य अशा सांविधानिक विकासक्रमांचा यात उल्लेख नाही. स्पार्टाचा लायकर्गस किंवा पर्शियाचा सोलोन यांच्या कितीतरी आधी मनूचे नियम लिहिले गेले आहेत. आजही मनुस्मृतीतले हे नियम जगात प्रशंसिले जातात आणि भारतीय हिंदूंना उत्स्फूर्तपणे त्यांच्या अनुपालनास व अनुसरणास उद्युक्त करतात. पण आपल्या घटना पंडितांच्या दृष्टीने त्यांस काहीही मोल नाही.' (ऑर्गनायझर, ३० नोव्हेंबर १९४९)

घटना समितीत राष्ट्रध्वजाचा, तिरंग्याचा निर्णय झाल्यावर आपल्या याच 'ऑर्गनायझर' या मुखपत्राच्या १४ ऑगस्ट १९४७ च्या संपादकीयात संघाने आपला अभिप्राय नोंदवला आहे - 'जे लोक नशिबाने सत्तेवर आले आहेत, ते भलेही आपल्या हाती तिरंगा सोपवतील; पण हिंदू त्याचा ना कधी सन्मान करतील ना कधी त्याला स्वीकारतील. ३ हा आकडा मुळातच अशुभ आहे आणि ज्या ध्वजात ३ रंग आहेत, तो खूप वाईट मानसशास्त्रीय परिणाम घडवेल आणि देशाला नुकसानकारक ठरेल.'

काय ही अंधश्रद्धा..! ज्यांनी तिरंग्याला विरोध केला त्यांचा वारसा पूज्य मानणारी भाजपची मंडळी आज त्याच तिरंग्याची यात्रा काढतात. हे विचारांतले परिवर्तन की लोकानुनयाची चलाखी?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठीचे हिंदू कोड बिल आणले. ते मंजूर होत नाही म्हटल्यावर त्यांनी त्याविरोधात आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. बाबासाहेबांच्या लेखी इतक्या महत्त्वाच्या असलेल्या या बिलाला संघाचा किती तीव्र विरोध होता, हे त्यांच्या पुढील अवतरणावरून कळेल –

'या सुधारणांत काहीही भारतीय नाही. विवाह व घटस्फोटाच्या प्रश्नांची सोडवणूक अमेरिका आणि ब्रिटिश नमुन्यांप्रमाणे आपल्या देशात होऊ शकत नाही. हिंदू संस्कृतीप्रमाणे विवाह हा संस्कार आहे. तो मृत्यूनंतरही बदलता येत नाही. केव्हाही बदलावा असा तो 'करार' नाही.' गोळवलकर पुढे म्हणतात, 'अर्थात, देशातील काही भागांत हिंदू समाजातल्या काही खालच्या जातींत घटस्फोटाला मान्यता आहे व रीतीप्रमाणे त्यांच्यात घटस्फोट होतातही. पण त्यांची ही रीत आदर्श मानून सर्वांनी तिचे अनुकरण करावे असे होऊ शकत नाही.' (ऑर्गनायझर, ६ सप्टेंबर १९४९)

आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघाला प्रात:स्मरणीय आहेत. संघाचे स्वयंसेवक असलेले पंतप्रधान मोदी डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा हरघडी जप करतात. त्यांनी लिहिलेल्या देशाच्या संविधानावर माथे टेकतात.

मला उगीचच आठवते. नथुरामने गांधीजींचा खून करण्याच्या आधी त्यांना अभिवादन केले होते.

**संविधान आणि भारतीय संस्कृती**

भारतीय संस्कृतीचा मान राखत नाहीत, असा आरोप करणारे पंडित नेहरूंच्या 'भारताचा शोध' (डिस्कव्हरी ऑफ इंडिया) पुस्तकाला कसे विसरतात? भारतीय संस्कृतीत इतका रस घेणारे आणि त्याची ऐतिहासिक दृष्टीने मांडणी करणारे ते



एकमेव पंतप्रधान आहेत. यूट्यूब वर सहज उपलब्ध असलेली त्यांच्या या पुस्तकावरची मालिका 'भारत एक खोज' जरूर पाहावी. त्यातून याचा पुरावा मिळेल.

जुने, नवे, देशातले, देशाबाहेरचे जे जे चांगले असेल ते आपण स्वीकारले. पण म्हणून भारतीय संस्कृतीला संविधानाने दूर सारले असे नाही. संविधानाची मूळ प्रत हाती लिहिलेली आहे. तत्कालीन सुलेखनकार प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी ती लिहिली तर शांतिनिकेतनमधील कलावंत नंदलाल बोस यांनी सजावट केली. संविधानाच्या मुखपृष्ठावर सिंधू संस्कृतीचे चिन्हे आहेत. तर आतल्या पानांवर बुद्ध, महावीर, अशोक, विक्रमादित्य, राम, अकबर, शिवाजी महाराज, टिपू सुलतान, राणी लक्ष्मीबाई, गांधीजी सुभाषबाबू इ. ची चित्रे आहेत.

**संविधानातील धर्माशी संबंधित कलमे**

१९७६ साली घटना दुरुस्ती होऊन संविधानाच्या उद्देशिकेत धर्मनिरपेक्ष हा शब्द टाकला गेला.

कलम १४ जाती, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारे भेदभाव न करता सर्व नागरिकांना कायद्यासमोर समान मानते व समान संरक्षण देते.

कलम १५ नुसार जाती, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारे जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात भेदभाव केला जाणार नाही.

कलम १६ जाती, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारे भेदभाव न करता सर्व नागरिकांना सरकारी नोकऱ्यांत प्रवेश देते.

कलम २५ सर्वांना सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य व नैतिकता यांच्या अधीन राहून सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य, धर्माचा पुरस्कार, पालन व प्रसार करण्याचा अधिकार देते. सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्यात धर्म न मानण्याचेही स्वातंत्र्य अंतर्भूत आहे.

कलम २६ धार्मिक गट तसेच व्यक्तींना संस्था काढून आपले धार्मिक व धर्मादाय उपक्रम करण्याचे तसेच या संस्थांचे धार्मिक कार्यासंबंधीचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार देते.

कलम २७ नुसार व्यक्तीला धर्म किंवा धार्मिक संस्थेला कर देण्याची सक्ती करता येत नाही.

कलम २८ नुसार पूर्णत: सरकारी साहाय्याने चालणाऱ्या संस्थांत धार्मिक शिक्षण देता येणार नाही. राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या निधीतून साहाय्य मिळणाऱ्या संस्थेतील धार्मिक शिक्षण वा उपक्रमात व्यक्तीला तिच्या संमतीशिवाय सहभागी करता येणार नाही.

कलम २९ व ३० अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकारांचे रक्षण करतात.

कलम ५१ क मधील मूलभूत कर्तव्यांत समाजात सद्‌भाव आणि बंधुता तसेच आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे जतन करण्याचे आवाहन आहे.

**धर्मनिरपेक्षतेच्या व्याख्या**

वरच्या कलमांतून धर्मनिरपेक्षतेचे पैलू व व्यवहार यांचा बोध होतो. पण संविधानात त्याची सुस्पष्ट व्याख्या कुठे केलेली नाही. काही अभ्यास समित्या तसेच न्यायालयीन निकालांवेळी धर्मनिरपेक्षतेची व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला आहे. उदाहरणादाखल खालील दोन व्याख्या पहा.

१९७६ साली संविधानाच्या उद्देशिकेत धर्मनिरपेक्ष शब्दाची भर घालणारी ४२ वी घटना दुरुस्ती ज्यांच्या अहवालाच्या शिफारशींनी केली गेली त्या स्वर्णसिंग समितीने केलेली व्याख्या – 'निरनिराळ्या धर्मांनुसार आचरण करणारे लोक आपल्या राज्यघटनेत कायद्यासमोर समान आहेत. इतकेच नव्हे, तर त्याहूनही अधिक म्हणजे ही कोणत्याही धर्माविरुद्ध भावना नसून सर्व धर्मांप्रति समान आदर, असा याचा अर्थ आहे.'

१९९२ साली सर्वोच्च न्यायालयाचे दिवंगत माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत व कुलदीप सिंग यांनी एका निकाल पत्रात केलेली धर्मनिरपेक्षतेची व्याख्या – 'सेक्युलॅरिझम हा राज्यघटनेचा मूलभूत पैलू आहे. भारतातील सर्वांना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले असले तरी सरकारच्या दृष्टीने एखाद्या व्यक्तीचा धर्म, विश्वास अथवा श्रद्धा महत्त्वाची नाही. सरकारच्या दृष्टीने सर्व समान आहेत व त्यांना समानतेने वागवले जाईल. सरकारच्या व्यवहारात धर्माला स्थान नाही. कोणताही राजकीय पक्ष हा एकाच वेळी धार्मिक पक्ष असू शकत नाही. राजकारण व धर्म यांचे एकत्रीकरण करता येत नाही. राज्य सरकारने धर्मनिरपेक्ष नसलेली धोरणे राबवल्यास वा तशी कृती केल्यास ते घटनेच्या विरोधी मानले जाऊन त्यांच्यावर कलम ३५६ खाली कारवाई करता येईल.'

संसदेला ३६८ कलमानुसार घटनेत बदल करण्याचा अधिकार आहे. मात्र घटनेच्या मूलभूत ढाच्यात (बेसिक स्ट्रक्चर) बदल करता येणार नाही असे १९७३च्या केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च नायालयाने धर्मनिरपेक्षता हा संविधानाच्या मूलभूत ढाच्याचा भाग मानले आहे.

भारतीय संविधानाचा सेक्युलॅरिझम हा अविभाज्य भाग आहे, हे सिद्ध करण्यात आता आणखी वेळ घालवण्याची गरज नाही.

■



# वाद, आव्हाने व पेच

भारतासारख्या व्यामिश्र संस्कृतीच्या समाजाला एका संविधानाखाली आणण्याचे महान काम घटनाकारांनी केले आहे. देशाच्या विविध भागांतील, विविध जात-धर्म, लिंगाचे, पक्षाचे लोक संविधान सभेत होते. त्यांनी केलेल्या विचारविनिमयानंतर घटनेच्या मसुद्यावर जनतेच्या सूचना मागवल्या गेल्या. या सगळ्यांतून तयार झालेली घटना हा सर्व भारतीयांचा सामायिक सहमतीचा दस्तावेज आहे. त्यात पुढच्या पिढीच्या गरजांनुसार बदलाची सोय आहे. त्याप्रमाणे शंभरच्यावर दुरुस्त्या आतापर्यंत झाल्याही आहेत. तरीही घटनेतील मुद्द्यांबाबत वाद होतात. त्यातून काही आव्हाने मिळतात. काही पेच पडतात. वैविध्यपूर्ण प्रवाही समाजात असे होणे स्वाभाविक आहे. धर्म ही तर आपल्याकडे अत्यंत संवेदनशील बाब. हल्ली धर्म घरात-देवळात राहण्यापेक्षा राजकारणात जास्त वावरतो. त्यामुळे तर त्याबाबतच्या वादांना सुमारच नाही. त्यातले काही संक्षेपाने समजून घ्यायचा प्रयत्न करु.

**धर्म व अभिव्यक्तिस्वातंत्र्य**

देशाचे राष्ट्रगीत सर्व नागरिकांनी उभे राहून म्हणायचे असते. पण केरळमधील एका शाळेत दोन मुले राष्ट्रगीताला उभी राहिली. पण त्यांनी राष्ट्रगीत म्हटले नाही. त्याचे कारण त्यांच्या जेव्होआज विटनेसेस या संप्रदायात त्याला परवानगी नाही. शाळेला पटले नाही. शाळेने या दोन्ही मुलांना काढून टाकले. मुलांचे वडील कोर्टात गेले. पुढे सर्वोच्च न्यायालयाने १९८६ साली मुलांच्या बाजूने निकाल दिला.

देश मोठा की धर्म मोठा, असा प्रश्न इथे कोणी उपस्थित करेल. जे राष्ट्रगीत म्हणणार नाहीत, त्यांना हल्ली राष्ट्रद्रोही जाहीर केले जाते. पण एक लक्षात घ्यायला हवे. आपल्या घटनेत राष्ट्रीय चिन्हांचा आदर राखणे हे कर्तव्य आहे. मात्र या चिन्हांना वाजवीहून जास्त पावित्र्य बहाल केलेले नाही. व्यक्तीची प्रतिष्ठा, तिचे हक्क व मोल सर्वाधिक आहे. व्यक्तीसाठी देश आहे. देशासाठी व्यक्ती नाही.

राष्ट्रगीत मुलांनी म्हटले नाही. पण राष्ट्रगीताचा त्यांनी अपमान केलेला नाही. ती उभी राहिली. राष्ट्रगीताला त्यांनी मान दिला. राष्ट्रगीत तोंडाने म्हटलेच पाहिजे, असा कायदा नाही. गप्प राहणे हे मुलांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहे. न्यायालयाने ही भूमिका मानली. न्यायालय निकालात पुढे म्हणते, ते आपले खरे मूल्य आहे – 'आपली परंपरा, संविधान सहिष्णुता शिकवते. आपण ती पातळ करूया नको.'

शिखांची पगडी, कृपाण ही धार्मिक चिन्हे आहेत. त्यांना सार्वजनिक ठिकाणी बाळगायला आपण मनाई केली नाही. सर्वांशी समान व्यवहार हे आपले सूत्र असले तरी ज्या धार्मिक बाबी लोक पवित्र मानतात आणि इतरांना त्या हानिकारक नाहीत, त्यांना तांत्रिक समतेच्या तत्त्वाखाली आपण नाकारले नाही.

कर्नाटकातल्या कॉलेजमध्ये हिजाब बंदीचा निर्णयही याच समतेच्या तांत्रिकतेत ताणला गेला. बाईचा बुरखा, हिजाब ही पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांवर लादलेली बंधने आहेत, अशी भूमिका सुधारकांची असू शकते. मात्र त्या मुस्लीम मुलींना त्यांचे ते व्यक्तिस्वातंत्र्य वाटते. हिजाब वापरायचा की नाही, हे आम्ही ठरवू. तुम्ही कोण सांगणारे? राहिला गणवेशाचा मुद्दा. त्याच रंगाचा हिजाब घातल्याने गणवेशाला आणि शिकण्या-शिकवण्याच्या कामात अडचण काय येणार आहे? शिवाय आतापर्यंत तर अशी बंदी नव्हती. मग आताच का? ज्यांनी हिजाबवर बंदी आणली त्यांना मुस्लीम स्त्रियांच्या गुलामीची कणव आली म्हणून त्यांनी बंदी आणली नाही. एकूण देशातला आणि खास करून कर्नाटकातला मुस्लीम द्वेषाचा ज्वर त्यामागे आहे.

भारताची धर्मनिरपेक्षता कठोर प्रकारातली नाही, तांत्रिक तर नाहीच नाही. ती सर्वसमावेशी आहे आणि ते स्पृहणीय आहे. तथापि, आपल्याकडचे धर्मस्वातंत्र्य अनिर्बंध नाही. कोणतीच स्वातंत्र्ये वा मूलभूत अधिकार अनिर्बंध नाहीत. इतरांच्या तशाच अधिकारांना आणि संविधानातील मूल्यांना बाधा येणार नाही, अशा पद्धतीने ते उपभोगता येतात.

मग ईशनिंदा या प्रकाराचे काय करायचे?

### निंदा नको; पण चिकित्सा हवी

निंदा आणि चिकित्सा यात फरक करायला हवा. कलम १९ नुसार मला माझ्या विचारांच्या प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य आहे. डॉ. आंबेडकर, त्याही आधी महात्मा फुले, प्रबोधनकार ठाकरे आदींनी कठोर धर्मचिकित्सा केली आहे. देवतांची नावे घेऊन त्यांच्यावर टीका केली आहे. ही चिकित्सा केल्यानेच आपण सामाजिक,



वैचारिक प्रगती करू शकलो. धर्मसुधारणा करू शकलो. त्यांनी हीच टीका आज केली तर तो काही जण धर्मद्रोह समजतील. पण ते चूक आहे. चिकित्सेत हेतू जाणीवपूर्वक अवमानाचा, भावना दुखावण्याचा नसतो. मुद्दामहून धर्मभावना दुखावल्या तर त्यावर १८६० च्या भारतीय दंडविधानाच्या कलम २९५ अ खाली कारवाई होऊ शकते. त्याहून वेगळ्या ईशनिंदेच्या कायद्याची आपल्याकडे अजिबात गरज नाही.

हा मुद्दा हिंदूप्रमाणे मुसलमान, ख्रिश्चन, शीख सगळ्याच धर्मांना भारतात लागू आहे. हिंदूंमध्ये चिकित्सेची एक मोठी परंपरा आहे आणि ते चांगलेच आहे. त्यात कर्मठ आहेत, त्याचबरोबर सुधारक मोठ्या प्रमाणात आहेत. मुस्लिमांत ही स्थिती नाही. हमीद दलवाईंसारखे सुधारक भारतात खूपच दुर्मीळ आहेत. ही मुस्लीम समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने चांगली बाब नाही. मुल्ला-मौलवींच्या पकडीत सर्वसामान्य मुस्लीम असतो. त्यामुळे धर्मातील बाबी, त्याचे संस्थापक प्रेषित यांच्याबद्दल चिकित्सेला मुस्लिमांची तयारी नसते. भाजपाच्या प्रवक्त्या नूपुर शर्मा जे बोलल्या ती अजिबात चिकित्सा नव्हती. त्यांच्या मांडणीचा आविर्भाव जाणूनबुजून अवमान करण्याचाच होता. भाजपने त्यांना पक्षप्रवक्तेपदावरून वा पक्षातून काढून टाकणे पुरेसे नाही. सरकारने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायलाच हवी. पण गंभीर चिकित्सेला मुस्लिमांनी आपले मन तयार करण्याची नितांत गरज आहे. तुमचा देव पवित्र आणि आमचे देव टीका करायला काय रस्त्यावर पडलेत? असा हिंदूंकडून प्रश्न आला तर त्यात चूक काय?

### धर्म व दर्जाची समानता

शनिशिंगणापूर, हाजीअली या दोन्ही प्रार्थना स्थळांत पुरुषांना जिथवर जाता येते तिथवर स्त्रियांना प्रवेश मिळावा यासाठी अनुक्रमे हिंदू आणि मुस्लीम स्त्रियांची काही वर्षांपूर्वी आंदोलने झाली. संविधानाने स्त्री-पुरुषांना दर्जाची व संधीची समानता दिली आहे. सरकारमधील लोक संविधानाची शपथ घेऊन सरकारात येत असतात. लिंगाच्या आधारे भेदभाव करणाऱ्या विश्वस्तांवर कारवाई करून या महिलांच्या बाजूने सरकारने उभे राहणे गरजेचे होते. पण सरकारने कायदा-सुव्यवस्था धोक्यात येण्याचे कारण दाखवून ही आंदोलने दडपायचाच प्रयत्न केला. धर्माच्या ठेकेदारांना सरकार दुखवू इच्छित नव्हते. पुढे न्यायालयाने या महिलांच्या बाजूने निकाल दिला.

केरळच्या सबरीमला मंदिराचा प्रश्न अजून सुटायचा आहे. या प्रकरणाने काही पेच संविधानासमोर तयार झाले आहेत. मुद्दा असा. मासिक पाळी सुरु होऊन ती

संपेपर्यंतच्या (१० ते ५० वर्षे) वयोगटातील स्त्रियांना या मंदिरात प्रवेश नाही. त्याविरोधात महिलांनी आंदोलने केली. न्यायालयात प्रकरण गेले. पहिला निकाल महिलांच्या बाजूने आला. पण त्याला आव्हान दिल्यानंतर ही रीत 'धर्माच्या गाभ्याचा घटक आहे का?' हा मुद्दा पुढे आला. ज्या बाबी धर्माच्या गाभ्याच्या असतील त्यांना प्रतिबंध सरकारला करता येणार नाही. हिजाब घालणे ही धर्माची बाब आहे. पण तो धर्माच्या गाभ्याचा घटक नाही. म्हणजेच कलम २५ नुसार सरकारला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. या कारणाने न्यायालयाने कॉलेजमधील हिजाब बंदी कायम ठेवली. त्यालाही वरच्या न्यायालयात आव्हान दिले गेले आहे. घटनेचा अर्थ लावायचे हे मुद्दे घटनापीठासमोर येतात. पाच किंवा त्याहून अधिक न्यायाधीशांचे पीठ म्हणजे घटनापीठ. सबरीमलाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशांच्या घटना पीठासमोर येणार आहे. हिजाबबाबतची पुढील सुनावणी सबरीमलाच्या निर्णयावरच अवलंबून राहणार आहे, असे जाणत्यांना वाटते.

**गाभ्याचा घटक असो नसो; संविधानातील मूल्ये प्रमाण मानावी**

इथे एक प्रश्न तयार होतो. अस्पृश्यता हा हिंदू धर्माच्या गाभ्याचा अविभाज्य घटक आहे, म्हणून ती नष्ट करण्याचा सरकारला अधिकार नाही, त्याबाबतचे कलम १७ रद्द करायला हवे, असे कोणी म्हटले तर? अस्पृश्यता ही माणूसपण हिरावणारी बाब आहे. त्याच रीतीने रजस्वला स्त्रियांना सबरीमला मंदिरात प्रवेश न देणे हा त्यांच्या माणूसपणाचा अपमान आहे. हे धर्माच्या गाभ्याचा घटक असोत, नसोत त्यावर सेक्युलर सरकारने महिलांच्या बाजूने कारवाई करायलाच हवी. न्यायालयानेही त्याच बाजूने उभे राहायला हवे.

बरे, न्यायाधीश हे काही धर्माचे अभ्यासक नाहीत. त्यांनी कोणता भाग धर्माच्या गाभ्याचा आणि कोणता नाही, याचा निर्णय कसा द्यायचा? ज्याचा आधार घ्यायचा असा प्रमाणित धर्मग्रंथ वा स्मृती कोणती? सल्ल्यासाठी कोणत्या व्यक्ती त्या धर्माच्या अधिकारी मानायच्या? ...या गुंत्यात न्यायालयाने का अडकावे? संविधानातील मूल्यांत न बसणाऱ्या धर्मातील बाबींना ठाम नकार न्यायालयाने द्यायला हवा. संविधान हीच न्यायालयाची कक्षा हवी. कलम २५ नुसार धर्मात हस्तक्षेप करण्याचे तत्त्व आपण स्वीकारले आहे. धर्म व शासन पूर्ण स्वतंत्र; कोणी कोणाच्या क्षेत्रात दखल द्यायची नाही, असा सेक्युलॅरिझम आपण स्वीकारलेला नाही.

या ७ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची प्रत्यक्ष सुनावणी सुरु होईल, त्या वेळी या मुद्याचे आणखी पैलू आपल्या लक्षात येतील.



**धर्म व नागरिकत्व**

आपल्या संविधानात नागरिकत्वाचा आणि धर्माचा संबंध नाही. कलम ५ नुसार व्यक्तीचा किंवा त्याच्या आई-वडिलांपैकी एकाचा जन्म भारतात झालेला असावा किंवा संविधान लागू होण्यापूर्वी ५ वर्षे वास्तव्य भारतात असावे एवढेच अपेक्षित आहे. तथापि, पुढील गरजा लक्षात घेऊन घटनेतील कलम ११ नुसार संसदेला नागरिकत्वासंबंधी कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला. त्यानुसार १९५५ साली नागरित्वाचा कायदा (सीए) करण्यात आला. त्यातही इथल्या जन्माची अटच प्रमुख होती. नागरिकत्वासंबंधीचा भारताचा दृष्टिकोण समजण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांची पुढील विधाने महत्त्वाची आहेत – 'केवळ भारतात जन्म झाला ही एकच गोष्ट भारताचे नागरिकत्व मिळण्यासाठी पुरेशी आहे. एका सभ्य जगाच्या स्वप्नामध्ये आम्ही एक वैश्विक दृष्टिकोन घेऊन हा निर्णय घेतलेला आहे.'

पुढे १९८७ आणि २००३ साली या नागरिकत्वाच्या कायद्यांत काही दुरुस्त्या झाल्या. आई-वडिलांपैकी एकाच्या जन्माऐवजी दोघांचाही जन्म इथला वगैरे. इथवर नागरिकत्व आणि धर्माचा संबंध नव्हता. मात्र २०१९ च्या नागरिकत्व दुरुस्ती कायद्यात (सीएए) पहिल्यांदा तो आला. त्यात म्हटले आहे – 'अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेश यांपैकी कुठल्याही देशामधील, हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन यांपैकी कुठल्याही धर्माची व्यक्ती ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेली असेल तर काही विशिष्ट सरकारी नियमांतर्गत त्या व्यक्तीला बेकायदेशीर स्थलांतरित न मानता, रीतसर नावनोंदणी करून भारताच्या नागरिकत्वासाठी अर्ज करता येईल.'

आपल्या सभोवतालच्या देशांतील धार्मिक पीडितांना आधार देण्यासाठी हा कायदा आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. तसे असेल तर मुस्लिमांना का वगळले गेले? आणि तीन मुस्लीमबहुल देशच का? नेपाळ, श्रीलंका, म्यानमार हे पण शेजारी देशच आहेत. म्यानमारमधील रोहिंग्या, श्रीलंकेतील तामीळ हिंदू तेवढेच पीडित आहेत. मात्र त्यांचा समावेश नव्या कायद्यात नाही. बरे, कायद्यात समाविष्ट तीन देशांत मुस्लीम बहुसंख्य असले तरी मुस्लिमांतर्गत काही संप्रदायांचे लोकही पीडित आहेत. उदा. अफगाणिस्तानमधील हजारा. पाकिस्तानमधील शिया, अहमदिया. यांचा नव्या कायद्यात समावेश नाही.

केवळ मुसलमान वगळून कायद्यापुढे सर्व समान या कलम १४ व अन्य कलमांचा या दुरुस्तीने भंग केला आहे. भारताच्या धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशकतेच्या मूळ ढाच्याला हात लावला आहे.

न्यायालयात यास आव्हान देण्यात आले आहे. मात्र अजून सुनावणी झालेली नाही. कायद्याविरोधातली आंदोलने आणि कोविड आदी कारणांनी या कायद्याच्या अंमलबजावणीला अजून तशी सुरुवात झालेली नाही. मात्र आम्ही हा कायदा अमलात आणणारच आहोत, हे गृहमंत्री अमित शहांनी जाहीर केले आहे.

## एक देश, एक धर्म, एक भाषा

एक देश, एक भाषा, एक धर्म असला की असा एकजिनसी देश मजबूत असतो, अशी धारणा असणारे सज्जन आणि बनचुके असे दोन्ही असतात. त्यातल्या सज्जनांनी थोडे जग आणि इतिहास समजून घ्यायला हवा. ख्रिश्चन धर्म असलेल्या हिटलरने ख्रिश्चन युरोप नेस्तनाबूत करायचा प्रयत्न केला. इराक-इराण दोघेही इस्लाम धर्मीय पण दोहोंत युद्धे झाली. बौद्ध जपानने बौद्ध चीनवर केलेले हल्ले बुद्धाच्या अहिंसेला मान खाली घालायला लावणारे होते. पूर्व व पश्चिम पाकिस्तान दोन्ही प्रदेश मिळून इस्लामवर आधारित एक देश फाळणीनंतर झाला. पण १९७१ ला युद्ध करून तो फुटला. पूर्व पाकिस्तानचा स्वतंत्र बांगलादेश झाला. धर्म, भाषा बव्हंशी एक व बरीच सारखी संस्कृती असलेले आणि आपल्यापेक्षा आकाराने लहान असलेले आपल्या भोवतालचे नवमुक्त देश म्यानमार, श्रीलंका, नेपाळ सतत धगधगत राहिले. पाकिस्तान धर्माच्या नावाने उभा राहिला. पण लोकांऐवजी लष्करच तिथे राज्य करते अशी स्थिती आहे. या देशांत लोकशाही टिकली नाही वा स्थिर झाली नाही. हिंदुराष्ट्र असलेले चिमुकले नेपाळ आता नव्या घटनेनुसार धर्मनिरपेक्ष बनले आहे.

भारत तर धर्म, भाषा, प्रदेश, आकार, विविधता यांत प्रचंड फरक असलेला. तो मात्र अजून टिकला आहे. निवडणुका होऊन इथे सत्तापालट होतो. लष्कराला हस्तक्षेपाची त्यात संधी नाही. याचे कारण काय? जगातले अनेक विद्वान त्याचा शोध घेत आहेत. अजूनही घेत राहतील. प्राचीन काळापासून वैविध्यासह सहजीवन असलेला भारत स्वातंत्र्याच्या चळवळीत आणखी एकवटला. समावेशी संस्कृतीसह भविष्याच्या समान आकांक्षा, त्याचे वैचारिक आधार त्याच्या मनात तयार झाले. त्या सगळ्याची ओळख 'भारतीयत्व' आहे. तो एक विविध रंगांच्या फुलांचा गुच्छ आहे. हे वैविध्य म्हणजे भेद नव्हे. त्या रंगच्छटा आहेत. भारतीयत्व खुलविणाऱ्या.

तरीही बनचुकी मंडळी एक देश एक भाषेचा घोष करत असतात. हे एका साच्यात कोंबणे भारताच्या प्रकृतीत बसत नाही हे आपण वारंवार पाहिले आहे. तरीही ही मंडळी आपला धोषा आणि प्रयत्न चालू ठेवतात. हे देश स्वतंत्र झाल्यापासून सुरू आहे.



हिंदी, हिंदू, हिंदुस्थान ही घोषणा तेव्हा होती. आजही काहींच्या मनात आहे.

हिंदी राष्ट्रभाषा आणि तिच्यातून देशाचा कारभार ही सूचना अर्धी मान्य झाली. म्हणजे हिंदी राष्ट्रभाषा नाही. इथल्या सगळ्या भाषा समान दर्जाच्या. प्रारंभी इंग्रजी व हिंदी दोन्ही भाषांत केंद्राचा कारभार आणि पंधरा वर्षांनी पूर्ण हिंदीत सुरू होईल, असे ठरले. प्रत्यक्षात अजून तसे घडलेले नाही. दक्षिणेकडचे लोक बहुसंख्येने हिंदूच आहेत. पण तरीही त्यांना हिंदी, हिंदू, हिंदुस्थान मान्य नाही. हिंदीच्या प्राबल्याने उत्तरेकडचे लोक आपल्या द्रविड संस्कृतीवर प्रभुत्व गाजवू पाहत आहेत, ते आम्ही होऊ देणार नाही. अखंड हिंदुस्थानची कल्पना त्यांना भावत नाही. स्वतंत्र द्रविडस्तान ही एकेकाळची मागणी संपूर्णत: विस्मरणात अजून गेलेली नाही. खुद्द उत्तरेकडच्या सीमावर्ती भागात हिंदी चालत नाही. तेथील आपापल्या भाषा स्थानिकांना जपायच्या आहेत.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पुन्हा हिंदी, हिंदू, हिंदुस्थानला जोर आला होता. पण त्यास विरोध होऊन संविधानाच्या पहिल्या कलमात देशाच्या नावाची नोंद झाली. – 'इंडिया दॅट इज भारत.'

## धर्मनिरपेक्ष की पंथनिरपेक्ष?

हा वादही दोन प्रकारचे लोक घालतात. सज्जन आणि बनचुके. सज्जनांच्या मते पंथनिरपेक्ष याचा अर्थ राष्ट्र एका धर्माचे होणार आणि त्या धर्मातल्या पंथांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. थोडक्यात, जाती-पातींत भेद न करणारे हिंदुराष्ट्र. म्हणजेच सेक्युलॅरिझम जाऊन धर्मराष्ट्र तयार होईल.

बनचुक्यांच्या मनात हाच डाव असतो. ते हिंदू म्हणत नाहीत. धर्म म्हणजे नैतिक धारणा असे समोर ठेवतात. भारत हा पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत आध्यात्मिक ताकद असलेला देश. जगातून लोक भारताच्या आध्यात्मिकतेकडे, धर्माकडे खेचले जातात. असा धर्म भारताचा मज्जारज्जू आहे. ..हा शब्दच्छल म्हणजे शुद्ध बनवाबनवी आहे. आपल्या घटनाकारांनी धर्माला नाकारलेले नाही. फक्त पंथांना नाकारले आहे, असे म्हणत हिंदुराष्ट्रासाठीची मानसिकता तयार करण्याच्या दिशेने पुढे सरकण्याची ही चलाखी आहे.

वास्तविक, आपण सुरुवातीपासून पाहिले की सेक्युलॅरिझम याला थेट प्रतिशब्द आपल्याकडे नाही. कारण धर्मनिरपेक्षता किंवा सर्वधर्मसमभाव या दोहोंतून आपल्या सेक्युलॅरिझमचे पूर्ण स्वरूप व्यक्त होत नाही. ते आपल्याला स्वतंत्रपणे स्पष्ट करावे लागते. तथापि, सोयीसाठी आपण 'धर्मनिरपेक्ष' असा शब्द आपल्या सेक्युलॅरिझमसाठी वापरतो.

उद्देशिकेचा हिंदी अनुवाद करताना त्यात सेक्युलॅरिझमच्या जागी 'पंथनिरपेक्ष' असा शब्द आहे. म्हणजे सरकारनेच तो घातलेला आहे. पंथनिरपेक्ष याचा अर्थ धर्म असो वा छोटे छोटे पंथ वा संप्रदाय या सगळ्यांशी तटस्थ अथवा सकारात्मक समभाव ठेवणे. आपल्याकडे धर्म हे निवडक आहेत. पण कोणत्याही धर्माशी संबंध नसलेले पंथ पुष्कळ आहेत. त्या सर्वांना सेक्युलॅरिझमचे तत्त्व लागायचे असेल तर फक्त धर्मनिरपेक्ष म्हणणे पुरेसे नाही; तर धर्म, पंथ, संप्रदाय या सर्वांच्या निरपेक्ष असा अर्थ मिळण्यासाठी 'पंथनिरपेक्ष' हा शब्द अधिक सयुक्तिक ठरतो. शिवाय धर्म म्हणजे कर्तव्य वगैरे अर्थांचा गोंधळही दूर होतो.

हा आदर्श अर्थ समजवायला फुरसत लागते. शिवाय समाजातल्या सर्वच लोकांपर्यंत वेगाने आपले म्हणणे पोहोचत नाही. बनचुक्यांच्या प्रचार तोफा मात्र धडाडत अर्थाचा अनर्थ करतच राहतात. हे लक्षात घेऊन देश कोणत्याही एका धर्माचा नाही. तो सगळ्यांचा आहे हे सुगमपणे कळण्यासाठी 'धर्मनिरपेक्ष' याच शब्दाचा वापर व्यवहार्य ठरतो.

**गोहत्याबंदी**

गोपूजक गायींचे पावित्र्य जपण्यासाठी माणसाची हत्या करतात. त्यामुळे हा प्रश्न खूप गंभीर आहे. संविधान तयार होत असतानाच हा मुद्दा आला होता. सावरकर गायीला उपयुक्त पशू मानत. पण त्यांचे हे मत बाजूला सारून हिंदुत्ववादी आणि काही गांधीवादी गोवधबंदीच्या बाजूने आहेत. गायीला हिंदू धर्मात पवित्र मानले आहे. ती गोमाता आहे, हेच या मागणीमागे कारण असते. संविधानाच्या मार्गदर्शक सूत्रांत कलम ४८ मध्ये शेतीस उपयुक्त गायींसह इतर प्राण्यांची हत्या होऊ नये म्हणून राज्यांनी कायदे करावेत असे म्हटले आहे. घटनेत याचा निर्णय नाही. भविष्यात राज्यांनी हा विचार करावा. त्यात पवित्रता, धार्मिक हेतू नसून शेतीस उपयुक्त जनावरे कमी पडू नयेत ही भूमिका आहे.

सनातनी हिंदू, गायीला पवित्र मानणारे महात्मा गांधी यांची याबद्दलची भूमिका महत्त्वाची आहे. ते म्हणतात – 'हिंदू धर्माने हिंदूंना गोवध करण्यास मनाई केली आहे, संपूर्ण जगाला नाही. ही धार्मिक मनाई अंत:प्रेरणेने आलेली आहे. कोणाच्या सांगण्यावरून ही बंदी आल्यास ती सक्ती ठरेल. अशी सक्ती धर्माला मान्य नाही. भारत हा केवळ हिंदूंचा देश नाही.' अन्यत्र मांडलेले त्यांचे हे अजून एक मत – 'हिंदुस्थानात गोवधबंदीचा कायदा करता येणार नाही. हिंदूंना गोहत्येस मनाई करण्यात आली आहे, याबद्दल मला शंका नाही. ...परंतु माझा धर्म हा संपूर्ण



हिंदुस्थानातील जनतेचा धर्म कसा काय असेल? हिंदू नसणाऱ्यांसाठी तो जुलूम ठरेल. '

तरीही आपल्याकडे अजून केंद्राने नाही, पण वेगवेगळ्या राज्यांनी गोवधबंदीचे कायदे केले. त्यातून भाकड गायींचा प्रश्न तीव्र झाला आहे. अशा गायी शेतकऱ्यांना परवडत नाहीत. ते त्या मोकळ्या सोडून देतात. सरकारच्या गोशाळा अपुऱ्या आणि पुरेसा निधी नसलेल्या आहेत. रस्त्यावर भटकत राहणे, नाहीतर गोशाळांत कुपोषणाने मरून जाणे हे या पवित्र गायींचे सध्याचे प्राक्तन आहे.

गायींना मारल्याच्या संशयाने माणसे मारणे हा या कायद्याचा आनुषंगिक पण अमानुष परिणाम आहे. कायदा हातात घेणाऱ्या गोरक्षकांना धर्माचे ठेकेदार आणि सरकार यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संरक्षण हा चिंतेचा व संतापाचा विषय आहे.

हिंदू अस्मिता रक्षणाचा वसा घेतलेल्या भाजपच्या नेतृत्वाखालच्या मणिपूर, अरुणाचल, गोवा या राज्यांत गोवध बंदीचा कायदा करण्याची त्यांची हिंमत नाही. 'जे गोमांस खातात त्यांनी पाकिस्तानात जावे' असे भाजपचे एक केंद्रिय मंत्री म्हणतात. त्यावर भाजपचे दुसरे केंद्रीय मंत्री रिजीजू उत्तर देतात – 'मी अरुणाचल प्रदेशचा आहे आणि मी गोमांस खातो. मला कोणी थांबवू शकेल का?'

या सगळ्या अंतर्विरोधांना सामावणारी गांधीजींची भूमिका देश टिकवणारी आहे. सेक्युलर आहे. तर परस्पर विरुद्ध मते मांडणारे सोयीने एकत्र घेऊन जाणारा भाजप देशाच्या एकात्मतेला सुरुंग लावत आहे, सेक्युलॅरिझमला जखमी करत आहे.

**धर्म व राजकारण**

सेक्युलॅरिझम धर्म व राजकारणाची फारकत करणारे तत्त्व आहे. मात्र आपल्या राजकारणाचा धर्म हा सध्या केंद्रबिंदू झाला आहे. याआधीच्या विवेचनातून ते लक्षात आले असेलच. भाजप यात अग्रणी असला तरी बहुतेक पक्ष याला जबाबदार आहेत. मतांसाठी धर्माच्या ठेकेदारांचे लांगूलचालन आणि लोकमानसातील धार्मिक मतांचा कच्चेपणा, भावनिकता यांचा वापर हे आपल्या राजकारणाचे सूत्रच बनले आहे.

नेहरूंनी सेक्युलॅरिझम मुरवायचा प्रयत्न केला. सोमनाथ मंदिराचे प्रकरण आपण वाचले आहेच. पुढे हिंदू कोड बिल आले. ते मंजूर होत नाही, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. नेहरूंचा बाबासाहेबांना मनापासून पाठिंबा होता. तरीही काँग्रेसअंतर्गत तीव्र विरोधामुळे त्यांनाही तात्पुरती माघार घ्यावी लागली. मात्र १९५२ च्या निवडणुकांचा एक महत्त्वाचा विषय त्यांनी

हिंदू कोड बिल म्हणजेच हिंदू स्त्रियांच्या दृष्टीने हिंदूंमधील सुधारणा हा केला होता. एक प्रकारे लोकांचा या मुद्द्याला होकार घेऊन त्यांनी नंतर टप्प्याटप्प्याने हिंदू कोड बिल मंजूर केले. त्या वेळी मुस्लिमांतील सुधारणांचे काय हा प्रश्न आला. फाळणीमुळे सामान्य मुस्लिमांत मानसिक असुरक्षितता होती. बहुतेक सधन, शिक्षित मुस्लिम थर पाकिस्तानात गेला होता. इथे राहिलेला मुख्यत: गरीब, निरक्षर मुसलमान होता. अशा वेळी नव्या सुधारणा झेलण्याची त्याची मानसिक क्षमता नव्हती. त्याला त्याच्या धर्मावरचा तो हल्ला वाटू शकला असता. तो अधिकच असुरक्षित झाला असता. शिवाय हिंदूंमध्ये थेट अठराव्या शतकाच्या सुरुवातीपासून राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या स्वत:च्या धर्मात सुधारणा करू पाहणाऱ्या सुधारकांची मोठी व सशक्त परंपरा होती. तशी सुधारकांची परंपरा मुस्लिमांत नव्हती. म्हणून सुधारणा झेपण्याची मानसिकता तयार करत यथावकाश सुधारणा मुस्लिमांत कराव्यात, ही नेहरूंची भूमिका होती.

तथापि, नंतरच्या काँग्रेस नेतृत्वांनी देशातील अन्य मुद्यांच्या प्राधान्यक्रमामुळे वा सोयीने मुस्लिमांतील सुधारणांना बगल दिली. १९८४ साली इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजकारणाशी फारसा संबंध नसलेल्या राजीव गांधींना तरुणपणातच देशाचे नेतृत्व स्वीकारावे लागले. अशा वेळी मुसलमान व हिंदू या दोहोंना सांभाळण्याच्या कसरतीत त्यांचे तोल गेले. त्याची फळे आजही देश भोगतो आहे. एक म्हणजे, न्यायालयाने १९८५ साली शहाबानो या मुस्लीम महिलेला पोटगीचा अधिकार देणारा पुरोगामी आदेश दिला होता. मुस्लीम कायद्यांतील सुधारणांना त्यामुळे चालना मिळणार होती. तो निर्णयच संसदेत कायदा करून राजीव गांधींनी फिरवला. यातून मुस्लिमांतील कर्मठांचे फावले. मुस्लीम स्त्रियांचे नुकसान झाले. मुस्लिमांतील सुधारणांना वेसण बसली. यामुळे हिंदूंमध्ये राजीव गांधी व काँग्रेस ही मुस्लीमधार्जिणी अशी प्रतिमा होऊ लागली. तिला ठीकठाक करण्यासाठी त्यांनी बाबरी मशिदीत १९४९ साली ठेवलेल्या राममूर्तीचे टाळे उघडले. हिंदू कट्टरपंथीयांनी ही मूर्ती बाबरी मशिदीत लपून ठेवली. ती हलवण्यातून आणखी प्रश्न तयार होईल म्हणून ती प्रशासनाने कुलूपबंद करून ठेवली होती. राजीव गांधींनी टाळे उघडल्याने हिंदू पूजेला तिथे येऊ लागले आणि हिंदू कट्टरपंथीयांना बाबरी मशीद हटवून राम मंदिर बांधण्याचा जोरदार कार्यक्रम मिळाला. भाजपने लालकृष्ण अडवाणींच्या नेतृत्वाखाली रथयात्रा काढली. मंदिर वहीं बनायेंगेच्या नाऱ्यांनी सांप्रदायिक वारे वेगात वाहू लागले. विश्व हिंदू परिषदेने गंगा जल, विटा जमा करून या वातावरणाला चहूकडे पसरवले. 'एक धक्का और दो' म्हणत बाबरी



मशीद हिंदू कट्टरपंथीयांनी उद्ध्वस्त केली. साक्षीला अडवाणी, उमा भारती समोर होत्या. याच हिंदुत्वाच्या राजकारणातून भाजप सत्तेचा सोपान चढत आता केंद्रात भारी बहुमताने देशावर अंकुश ठेवून आहे.

यात मराठी माणसे हा मुद्दा मागे ठेवून शिवसेनेने हिंदुत्व अंगीकारले. समाजवादी पक्ष मुस्लीमधार्जिणा झाला. एमआयएमसारखे आधीपासून मुस्लिमांचे म्हणवणारे पक्ष आता अधिकच कडवे झाले. पंजाबात अकाली दल शिखांचा पक्ष आहे. बाकी सेक्युलर, लोकशाही म्हणवणाऱ्या पक्षांनीही मुस्लीम, हिंदू, बौद्ध, शीख आदी सगळ्यांच्यातल्या मुखंडांना मतांसाठी जोजारणे सुरु केले.

भाजपचा हिंदूंतील आधार एवढा वाढला की त्यांना आता मुस्लीम वा बिगर हिंदूंच्या मतांची गरज राहिली नाही. त्यामुळे नाम के वास्ते मुस्लीम उमेदवार देण्याची निकडही त्यांची संपली. एका मोठ्या लोकसंख्येतील हिश्शाला आपण या लोकशाहीत गणले जात नाही, हे वाटणे त्याची असुरक्षितता, अलगता वाढवणारे आहेच. पण आपल्या लोकशाहीला ते लाजिरवाणे आहे. लोकशाहीचे यश त्या देशातील, समाजातील अल्पसंख्याकांना किती सुरक्षित वाटते, यावर अवलंबून असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यासाठी संविधान सभेत एक सूचना केली होती. पण तिला पाठिंबा मिळाला नाही. बहुसंख्य समाजाचा उमेदवार निवडणुकीत विजयी घोषित करण्यापूर्वी त्याने त्याच्या मतदारसंघातील अल्पसंख्याक समाजाची काही किमान मते मिळवलेली असावीत, अशी ती सूचना होती. यातून मुसलमानांसारख्या अल्पसंख्याक विभागांना आपण व्हेटोचाच अधिकार देतो आहोत असे वाटल्याने बाबासाहेबांच्या सूचनेला विरोध झाला.

आता जेव्हा हा धोका प्रत्यक्षात आला आहे. अल्पसंख्याकांची गरजच भाजपसारख्या पक्षाला राहिलेली नाही, अशा वेळी बाबासाहेबांच्या सूचनेचा विचार करण्याची वेळ आली आहे.

### काशी-मथुरा बाकी है

बाबराने रामाचा जिथे जन्म झाला ते मंदिर पाडून मशीद बांधली या आक्षेपाच्या साहाय्याने चार-पाच दशके सत्तेची पोळी भाजता आली. आता तो प्रश्न संपला आहे. न्यायालयाच्या निकालावर सेक्युलॅरिझमच्या निकषावर टीकाटिप्पणी झाली. पण आता ते होऊन गेले. न्यायालयाने बाबरी मशीद राममंदिर पाडून बांधली गेल्याचा निर्वाळा दिला नाही. तर जमिनीचा निकाल दिला.

राममंदिराच्या आंदोलनावेळीच लालकृष्ण अडवाणी घोषणा देत होते- 'यह तो एक अंगडाई है, काशी, मथुरा बाकी है.' राममंदिर रांकेला लागले. आता काशी-मथुरेचा प्रश्न पुढे आला आहे. त्यातही काशी ऐरणीवर आहे. काशीची ज्ञानवापी मशीद शंकराचे मंदिर नेस्तनाबूत करून त्यावर औरंगजेबाने बांधली. तो अन्याय दूर करण्यासाठी ज्ञानवापी मशीद तिथून हटली पाहिजे, यासाठी आंदोलन सुरू झाले आहे. कोर्टाने कमिटी नेमून या मशिदीच्या अंतरंगाचा अभ्यासही केला आहे. न्यायालयीन प्रक्रिया पुढे चालणार आहे.

औरंगजेबाने मंदिर पाडून मशीद बांधली हे खरे असू शकते. अन्य अनेक ठिकाणी जेत्यांनी केलेल्या विध्वंसाबाबतची उदाहरणे असू शकतात. थोडे आणखी खणले तर काशीत बौद्ध स्तूपांच्या, विहारांच्या, शिल्पांच्या खुणा मिळू शकतील. राजमुद्रा म्हणून स्वीकारलेला अशोकाचा सिंहस्तभ जिथे आहे ते सारनाथ काशीच्या जवळच आहे. बौद्धकालीन साम्राज्याचा हा सगळा परिसर आहे. तिथे बौद्ध खुणा न सापडणे म्हणजे आश्चर्य आहे. बौद्धांचा तिथला प्रभाव हा हिंदूंच्या आधीचा. बौद्ध स्तूपांचे रूपांतर देवळात केल्याचे पुरावे अनेक आहेत. आपल्या महाराष्ट्रात लेण्याद्री, कार्ल्याच्या लेण्यांतील एका गुंफेत एकवीरा देवी किंवा कान्हेरी लेणीत हिंदू देवतेचे मंदिर हे प्रकार सर्रास आहेत. या बाबी जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणीही झालेल्या आहेत. खूप वर्षे पडिक राहिलेल्या वास्तूत कोणीतरी त्यावेळच्या श्रद्धेला अनुसरून मूर्ती ठेवतो. उपासना सुरू करतो.

उद्या बौद्धांनी लेण्याद्रीचा गणपती हटाओ, कार्ला लेणीतली एकवीरा देवी बाहेर काढा अशी आंदोलने सुरू केली तर काय करायचे?

जुना इतिहास आपल्याला आवडो न आवडो. तो झाला. तो बदलणे आपल्या हातात नाही. तो आहे तिथे ठेवून त्यातला योग्य तो धडा घेऊन पुढे जायला हवे. यासाठीच आपण १९९१ साली एक कायदा केला. त्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ सालापूर्वी असलेली पूजास्थानांची स्थिती तशीच ठेवली जाईल, असे ठरवले गेले. न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने फक्त बाबरी मशीद यास अपवाद केली गेली होती.

या कायद्याची कठोर अंमलबजावणी करून जुनी मंदिरे, मशिदी, वास्तू यांच्या आस्थेसंबंधीच्या वादांना संपूर्ण बंदी घालायला हवी. न्यायालयाने कमिटी करून ज्ञानवापी मंदिर तपासणे हेही गैरलागू आहे. पुरातत्त्व संशोधन चालू द्या. पण त्या स्थानावर कोणत्या धर्माचा अधिकार चालणार यासाठीचे खोदकाम निरर्थक आहे.



ज्ञानवापी मंदिर शंकराच्या मंदिरावर बांधले असे संशोधनातून सिद्ध झाले तर काय ती मशीद पाडून त्यावर मंदिर बांधणार? मग या पूजास्थळांच्या १९९१ च्या कायद्याचे काय होईल? तो कायदा बदलू असे काही लोक किंवा सध्याचे सरकारही म्हणू शकेल.

हे म्हणणे म्हणजे प्रेतांच्या कफनांचा बाजार तेज करणे आहे. सामूहिक विवेक हरवला की प्रेतांच्या सौदागरांचे फावते.

**भोंगे-हनुमान चालीसा**

काही काळापूर्वी राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंगे उतरवा नाहीतर त्या मशिदीसमोर हनुमान चालीसा सुरू करू, असा इशारा दिला. त्यावरून वातावरणात तणाव तयार झाला. मुस्लिमांत एक प्रकारची असुरक्षितता आली. क्रियेला प्रतिक्रिया होऊन दंगली भडकल्या तर काय, ही रास्त चिंता होती. तथापि, महाराष्ट्रातल्या मविआ सरकारने ही स्थिती चांगली हाताळली. पोलिसांनी मुस्लीम वस्त्यांत ठेवलेल्या बंदोबस्ताने मुस्लीम समाज आश्वस्त झाला होता. पुढे राज ठाकरेंनीही दोन-चार इशारे देण्यापलीकडे हे आंदोलन चालवले नाही. तूर्त, या मुद्द्यावर शांतता आहे.

इथे प्रश्न येतात दोन. एक, जुना. मशिदी असो वा मंदिरे यांवर भोंगे आले, ते लाऊडस्पीकरचा शोध लागल्यावर. त्या आधी अजान असो वा आरती ही बिन भोंग्याचीच व्हायची. मग आताच भोंगा हा धर्माचा भाग कसा काय झाला? तर तो तसा नाही. सोय म्हणून वा सार्वजनिक कार्यक्रम लाऊडस्पीकर लावूनच करायचा असतो, या सवयीपायी भोंगे आले. आता आले तर त्यांना नियम आहेत. वेळा, आवाजाचे प्रमाण कायदा वा न्यायालयाच्या आदेशाने नक्की झालेले आहे. अशा वेळी नियमात न बसणाऱ्या भोंग्यांच्या विरोधात राज ठाकरे लोकांना पोलिसांत तक्रार करायला सांगू शकतात. तशी कार्यकर्त्यांकरवी मोहीम घेऊ शकतात. पण स्वत:च कायदा हातात घेण्यास कार्यकर्त्यांना उद्युक्त करणे हे गैर आहे. गुन्हा आहे.

प्रश्न दुसरा. हनुमान चालीसा ही शांतपणे ईश्वराशी एकरूप होत करावयाची प्रार्थना आहे. मन विशुद्ध, कपटभावरहित असल्याशिवाय आध्यात्मिक समाधान साधत नाही. मशिदीसमोर जाऊन घोषणा देणे गैर असले, तरी समजू शकते. पण तिथे जाऊन हनुमान चालीसा म्हणणे म्हणजे हनुमानाची आणि प्रार्थनेची चेष्टा नव्हे काय? मनात द्वेष, कोणाला तरी धडा शिकवायचा आहे, या भावनेतून ईश्वराशी तादात्म्यता येणार कशी?

म्हणजेच राजकीय हिशेब करण्यासाठी हा धर्माचा वापर आहे. हिंदूंना हे कळत कसे नाही? आपला धर्म आपण कोणाच्या तरी राजकीय लाभासाठी बिनदिक्कत कसा काय वापरू देतो?

**लव्ह जिहाद**

लव्ह म्हणजे प्रेम आणि जिहाद म्हणजे धर्मयुद्ध या दोन गोष्टींचा परस्परांशी संबंध काय? कोणीतरी प्रेम हिरावून घेते आहे, त्याच्याविरोधात युद्ध समजू शकते. पण प्रेमाचे धर्मयुद्ध कसे असू शकते? त्या नावाने ओळखले जाणारे कायदे केले गेले आहेत. वैधानिक नसले तरी प्रचलित नाव लव्ह जिहाद कायदा असेच आहे.

इथे गृहीत आहे ते, मुस्लीम धर्मप्रसारासाठी युद्ध करतात. मानेवर तलवार ठेवून लोकांना मुसलमान बनवतात. लोक धर्म स्वीकारतात, त्यामागे तलवारीचे, दहशतीचे कारण इतिहासात अगदीच नगण्य आहे. वेगवेगळ्या कारणांनी तो पटतो म्हणून आणि नंतर वडिलांकडून जन्मत: आला आहे म्हणून स्वीकारला जातो. मुस्लीम मुलाच्या प्रेमात हिंदू मुलगी पडते आणि मग त्यांचे लग्न मुस्लीम पद्धतीने होते. ते होत असताना ती मुस्लीम बनते. मुसलमानांची संख्या या एका मुलीने वाढते. हिंदूंच्या मुलींना फूस लावून, फितवून अशी लग्ने करण्याची मोहीम धर्मयुद्ध म्हणून मुस्लीम तरुणांनी हाती घेतली आहे. त्यांची संख्या वाढत जाऊन हिंदूंपेक्षा संख्येने ते भारी होतील आणि मग एक दिवस हा हिंदुस्थान त्यांच्या ताब्यात जाईल. असा हा तर्क हिंदू कट्टरपंथी मांडतात. हिंदूंच्या मुलींना अक्कल नाही. बाईला अक्कल कमीच असते, अशी इथे धारणा असते. बरे मुली हिंदूंच्यातल्याच मुस्लिमांत जातात का? मुस्लीम मुली हिंदू मुलांच्या प्रेमात पडून लग्न करत नाहीत? अशा वेळी त्या हिंदू धर्म घेतात. म्हणजेच हिंदूंची संख्या एकने वाढते. मुस्लिमांची एकने कमी होते.

हे लक्षात घेऊ की, पटलेला धर्म स्वीकारण्याचा अधिकार घटनेने आपल्याला अनुच्छेद २५ नुसार दिलेला आहे. मी माझा जन्मजात धर्म सोडून मला पटलेला दुसरा धर्म स्वीकारु शकतो. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या हिंदू धर्मात जन्मास आले तो सोडून १४ ऑक्टोबर १९५६ ला ते बौद्ध झाले. त्यांच्या आवाहनाप्रमाणे त्यांच्या लाखो अनुयायांनीही त्यांचे अनुकरण करत हिंदू धर्म त्यागून बौद्ध धर्म स्वीकारला. हिंदू धर्म त्यागाची व बौद्ध धर्म स्वीकाराची कारणे बाबासाहेबांनी दिली आहेत. ती कोणाला पटोत न पटोत, पण ती ठोस आहेत, हे कबूल करावे लागते.

लग्नासाठी धर्म बदलणे यात अशी कारणे नाहीत. पहिला धर्म सोडून दुसरा स्वीकारण्यामागे तो पटल्याचा मुद्दा इथे नाही. यात एक तांत्रिक अपरिहार्यता आहे.



घटनेने पती-पत्नी म्हणून कोणत्याही धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या व्यक्तीची निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. विशेष विवाह कायद्याची त्यासाठी तरतूद सरकारने केली आहे. या कायद्याखाली लग्न करताना उभयतांपैकी कोणालाही आपला धर्म बदलण्याची गरज नसते. तथापि, यासाठीच्या प्रक्रियेत एक अडचण आहे. या कायद्याखाली एक महिन्याची नोटीस द्यावी लागते. म्हणजेच फॉर्म भरल्यानंतर एक महिन्याने लग्न करता येते. हा एक महिना विवाह नोंदणी निबंधकांच्या वेब पोर्टलवर कोणाचे काही आक्षेप आहेत का ते विचारण्यासाठी लग्न करू इच्छिणाऱ्या जोडीची माहिती जाहीर केली जाते. या लग्नाच्या विरोधात जर आई-वडील वा अन्य नातेवाईक वा धर्माचे ठेकेदार असतील तर त्यांनाही एक महिन्याची मुदत व माहिती म्हणजे लग्नात मोडता घालायला आयती संधीच असते. कायदेशीरदृष्ट्या सज्ञान व दोहोंची संमती असेल तर नातेवाईक काहीच करू शकत नाहीत. पण मारहाण, धमक्या, अपहरण या मार्गांनी ते हे लग्न मोडतात. अशा विरोधामुळे तातडीने व लपून-छपून लग्न करू पाहणाऱ्या जोडप्याला हा कायदा आधार देत नाही. त्यासाठी मग धार्मिक विधीचा आधार घेतला जातो. धार्मिक पद्धतीत वधू-वर एकाच धर्माचे असावे लागतात. ज्या एकाचा तो धर्म नसेल त्याला तो पटो वा न पटो केवळ लग्नासाठी जोडीदाराचा धर्म स्वीकारावा लागतो. याला उपाय विशेष विवाह कायद्यातली जाहीर नोटिशीची अट रद्द करणे व या जोडप्याला त्यांनी मागणी केल्यास सुरक्षितपणे महिनाभर गुप्तपणे राहता येईल अशी व्यवस्था सरकारने करणे हा आहे.

जीवनाचा साथीदार निवडताना धर्म बदलण्याचे हे अपरिहार्य कारण आहे. त्याला लव्ह जिहाद संबोधून धर्माचे ठेकेदार तरुण जिवांच्या प्रेमाचा आणि अनेकदा प्रत्यक्षात त्यांच्या प्राणांचा बळी घेतात.

**एकरूप नागरी संहिता (युनिफॉर्म सिव्हिल कोड)**

समान नागरी कायदा झालाच पाहिजे अशा घोषणा विशेषत: भाजप आणि संघपरिवाराच्या मंडळींकडून सालोसाल आपण ऐकत आलो आहोत. म्हणजे काय व्हायला पाहिजे, असे त्यांना विचारले की ते म्हणतात – 'त्यांना (म्हणजे मुसलमानांना) चार बायका करण्याची परवानगी आणि आम्हाला (मात्र ) एक.'

'आपल्याला एकच बायको करता येते याचे वैषम्य वाटते तुम्हाला?' हा प्रश्न चिडविण्याकरता विचारता येतो. पण यात वेदना आहे. ती स्त्रियांची आहे. आपल्याला सवत असणे हे कोणत्या स्त्रीला आवडेल? एक पती–एक पत्नी हा

आता आदर्श मानला जातो. युद्धात पुरुष मारले गेल्याने त्यांची संख्या कमी आणि स्त्रियांची अधिक याचा मेळ घालण्यासाठी इतिहासकाळातली गरज म्हणून पुरुषाने अधिक स्त्रियांशी विवाह करणे असेल किंवा शिवाजी महाराजांनी ८ बायका करण्यात जे राजकारणातले हिशेब असतील, ते आता काळाआड गेले. हिंदूंच्यात द्विभार्या प्रतिबंधक कायदा आला, ही चांगली गोष्ट घडली. ती मुसलमानांच्यातही व्हायला हवी. चार बायकांची धर्माने परवानगी हा आजच्या काळात मुस्लीम स्त्रियांवर अन्याय आहे. या अन्यायाच्या पोटी समान नागरी कायद्याची मागणी होते का?

अजिबात नाही. यालाही मुस्लिमांविषयीचा द्वेषच कारण असतो.

चार चार बायका. तेवढी मुले जास्त. तेवढी मुस्लिमांची लोकसंख्या वाढणार. हा हिशेबही तर्काला धरून नाही. मुले बाईलाच होतात. पुरुषांना नाही. चार बायका चार नवऱ्यांकडे जाण्याऐवजी एका नवऱ्याकडे राहिल्याने त्याच्या घरात मुलांची संख्या वाढेल, हे बरोबर. पण एकूण मुस्लीम समाजातली मुलांची संख्या त्यामुळे अधिक वाढेल हा तर्क कसा? या चार बायका चार नवऱ्यांकडे गेल्या तर समाजातली मुलांची संख्या कमी होईल? मुलांची संख्या ही शिक्षण व आर्थिक प्रगतीवर अवलंबून आहे. ही प्रगती जिथे आहे, तिथे मुलांना जन्म देण्याचे प्रमाण कमी दिसते. मग ते हिंदू असोत नाही तर मुसलमान.

धर्म व कायद्याने परवानगी आहे म्हणून प्रत्येक मुस्लीम पुरुष एकापेक्षा अधिक बायका करतात का? आपल्या आजूबाजूला असलेली मुस्लीम कुटुंबं पाहिली तर कळेल, वस्तुस्थिती अशी नाही.

पण कायद्याने ही जी अधिक बायका करण्याची परवानगी आहे, तिच्यामुळे उद्या सवत येईल, या भीतीची तलवार तिच्या डोक्यावर लटकत असतेच. ती भीती जायलाच हवी. मुस्लीम महिलांवरचा हा अन्याय दूर होण्यासाठी मुस्लिमांच्यातही द्विभार्या कायदा आला पाहिजे, असेच मला वाटते.

समान नागरी कायद्याची मागणी करणारे हे असे निवडकच ध्यानात घेतात. समान नागरी कायदा करताना सर्व रीती सारख्या कराव्या लागतील. हिंदूंच्यात मामाची मुलगी पत्नी करतात. मुस्लिमांच्यात चुलत भावंडांत लग्न होते. हिंदूंच्यात लग्नासाठी हे नाते निषिद्ध आहे. गोत्र वगैरे आणखी बऱ्याच बाबी हिंदूंत आहेत. एकच कायदा सर्व भारतीयांना लागू केला, तर लग्नासाठी कोणती नाती निषिद्ध मानायची? याचा निर्णय कसा करायचा? खुद्द हिंदूंत प्रश्न तयार होईल. मामाची मुलगी हे सर्रास चालते. पण काही ठिकाणी मामाशी लग्न करतात. तर अन्य



ठिकाणी ते निषिद्ध आहे. मामाची मुलगी चालते, पण मामाचा मुलगा चालत नाही. अशा वेळी दोन ठिकाणच्या हिंदूंत सोयरिक करतानाचा हा प्रश्न समान नागरी कायद्याने कसा सोडवायचा? समान नागरी कायदा करायला असे एकाच धर्मातले वेगळ्या रीती असलेले लोक बसले तर त्यांच्यात सहमती कशी होणार?

इस्लाममध्ये लग्न हा करार आहे. त्यामुळे दोन्हींकडून तो मोडायला मोकळीक आहे. तो माणसांच्यातला व्यवहार आहे. त्यात अल्लाचा संबंध नाही. हिंदूंच्यात लग्न हा संस्कार मानला जातो. लग्नगाठी ब्रह्मदेव मारतो. त्यामुळे त्या तोडायला इहलोकी परवानगी नाही. शिवाय पती हा परमेश्वर. त्यामुळे नवऱ्याने कितीही छळले तरी त्याच्यापासून घटस्फोट घेता येत नाही. ही स्थिती इस्लामी कायद्यापेक्षा नक्कीच प्रगत नाही. हिंदू कोड बिल आले आणि ही स्थिती बदलली गेली. त्रिवार तलाक ही अन्यायकारक बाब होती. ती कायद्याने गेली. तलाकनंतर त्याच पतीशी लग्न करायचे असल्यास आधी दुसऱ्या पुरुषाशी लग्न करून शारीरिक संबंध येऊ द्यावेत आणि नंतरच त्याच्याशी तलाक घ्यावा, अशी अट आहे. तिला हलाला म्हणतात. ही रीत घृणास्पद व स्त्रीत्वाचा अपमान करणारी आहे. ती कायद्याने बंद करायला हवी. तसे कोड बिल मुसलमानांसाठी आणायला हवे. त्याद्वारे त्यांच्यातले प्रगत ठेवून वाईट दूर केले पाहिजे.

गुन्हेगारी कायदे समान आहेत. मात्र वैयक्तिक कायदे आज वेगवेगळे आहेत. त्या त्या धर्मातल्या लोकांच्या रीतीभाती, संस्कृती, धारणा, आस्था यांना धरून ते आहेत. त्यांत सगळेच प्रगत नाही. जसे चार बायका करण्याची मुस्लिमांत असलेली परवानगी. या चांगल्या वाईटाचा हिशेब करून सगळ्यांच्यातले चांगले एकत्र घेऊन एकच कायदा राष्ट्रीय कायदा होऊ शकेल. पण त्यातही सांस्कृतिक, विभागीय रीतींची सूट द्यावीच लागेल. जसे मामाच्या मुलीशी, मामाशी, चुलत भावंडांशी लग्न वगैरे. हे अपवाद त्या कायद्यात करावेच लागतील. सात फेरे झाल्यावर की मुलीने कबूल म्हटल्यावर लग्न संपन्न झाले समजायचे, हाही अपवाद ठेवावा लागेल. हिंदू वारसा कायदा करताना बंगालातील पत्नी व मुलांच्या हिश्शाचे वाटप आणि अन्यत्र असलेली हिंदूंची पद्धत याचा विचार करावा लागलाच होता.

गुन्हेगारी कायदे देशासाठी एक. उदा. भारतीय दंड संहिता आणि भारतीय दंड प्रक्रिया संहिता. त्याच प्रकारे वैयक्तिक कायद्यांचे जमेल तितके एकत्रीकरण करायला हवे. आपल्या संविधानात ती अपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांच्या ४४ व्या कलमात आहे. त्यात म्हटले आहे – 'नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.'

इथे लक्षात घेऊया, घटनेत समान नागरी कायदा असे म्हटलेले नाही. समान ऐवजी एकरूप असा शब्द आहे. इंग्रजीत युनिफॉर्म. शाळेचा गणवेश सारखा असतो. म्हणजे रंग व रचना (फुल किंवा हाफ पँट किंवा स्कर्ट) सारखी असते. पण प्रत्येकाची मापे समान नसतात. ती प्रत्येक मुलप्रमाणे वेगळी असतील. समान मध्ये एकसारखेपणा, तर एकरूपमध्ये व्यक्तिनिहाय बदलांना परवानगी ठेवून सारखेपणा अभिप्रेत आहे. दुसरा शब्द संहिता. कायदा नव्हे. संहिता याचा अर्थ अनेक कायद्यांचा संच किंवा गट. दंड संहिता ही अनेक कायद्यांची संहिता आहे. हिंदू कोड बिल हे अनेक कायद्यांच्या गटाचे विधेयक होते. ज्यात लग्न, घटस्फोट, संपत्ती, वारसा, दत्तक असे स्वतंत्र कायदे होते.

आपल्या देशाचे वैविध्य ध्यानात घेऊन विविध धर्मीयांसाठी त्यांच्या आताच्या कायद्यांतल्या घातक बाबी दूर करून, त्यातल्या चांगल्या बाबी सगळ्यांसाठी लागू करण्यासाठीची काही रीतींचे अपवाद करून संहिता बनवायला हवी.

कधी बनवायची? ज्यांची सतत मागणी होती समान नागरी कायद्याची त्या भाजपचीच आता केंद्रात सत्ता आहे. त्यांनी कायदा आयोगाकरवी संविधानातील कलम ४४ मध्ये नमूद केलेल्या एकरूप नागरी संहितेचा मसुदा बनवावा. तो चर्चेला देशासमोर ठेवावा. विविध धर्म, समाजविभागांच्या त्यावर सूचना घ्याव्यात. केवळ धर्मगुरू वा विद्वान यांवर सोडून चालणार नाही. सामान्य लोकांना मसुदा समजावून त्यांची मते घ्यायला हवी. या सगळ्यात जास्तीत जास्त सहमती करायचा प्रयत्न करावा. याला वेळ लागेल. लागेल तेवढा वेळ द्यावा. पण प्रक्रिया सुरू करावी. सतत चालू ठेवावी. नंतरच त्याला कायद्याचे रूप द्यावे.

खूपच मतभेद असतील, तर असा कायदा प्रारंभी काही काळ स्वैच्छिक ठेवावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही सूचना होती. समजण्यासाठी आपण विशेष विवाह कायद्याचे उदाहरण घेऊ. हा कायदा एक प्रकारे समान नागरी कायदाच आहे. त्याच्या खाली लग्न करताना धर्म बदलावा लागत नाही. देशातले कोणत्याही जात, धर्म, भाषा, प्रदेशातील कायद्याने संमत वय व नाते यांत बसणारे युवक-युवती या कायद्याखाली लग्न करू शकतात. हा कायदा सक्तीचा नाही. धर्माचे वैयक्तिक कायदे आहेत. कोणता कायदा निवडायचा तो अधिकार व्यक्तीला आहे. त्याचप्रकारे डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे प्रारंभी एकरूप नागरी संहिता स्वैच्छिक ठेवता येईल.

भाजपला ही संधी आहे. त्यांनी लवकर या दिशेने प्रयत्न करावेत. राजकारणासाठी, मुस्लीम द्वेष माजवण्यासाठी समान नागरी कायद्याची सोयीने मागणी करण्याचा प्रकार पूर्णतः थांबायला हवा.

■



# उपाय व दिशा

धर्म व संविधानाचा संबंध, त्याचे विविध आयाम, त्यातले ताण, वाद, आव्हाने खूप विस्ताराने आपण पाहिली. त्या क्रमात बऱ्याच उपायांची, दिशांची नोंद निवेदनाच्या ओघात केली आहे. वास्तविक, धर्म व संविधानाच्या या संबंधांचे आकलन होणे आणि त्याप्रमाणे आपण व्यवहारात दक्षता घेणे हाच मोठा उपाय आहे. आकलनाचे काम आपण बऱ्यापैकी वर केले आहे. व्यवहार हा ज्याचा त्याने, काही बाबतीत सामूहिक तर काही बाबतीत सरकारने करायचा आहे. काही बाबी खाली अधोरेखित करतो आहे. त्या विचारार्थ आणि उदाहरणादाखल आहेत. सर्वंकष कायदेशीर प्रस्ताव असे त्यांच्याकडे पाहू नये.

**धर्म आध्यात्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित हवा**

मध्ययुगीन भक्ती आणि सूफी संतांविषयी आपण वर चर्चा केली. या संतांनी व्यक्ती आणि ईश्वर किंवा अल्ला यांतील नाते वैयक्तिक मानले. त्यांचे अभंग, कव्वाल्या यांतून हे नाते स्पष्ट होते. त्यात मध्यस्थ नाही, कर्मकांड नाही, माणसांतल्या श्रेणी नाहीत, देऊळ-मशीद नाही. अगदी आधुनिक काळात ओशो, जे. कृष्णमूर्ती आढळतात. त्यांनी ईश्वरी शक्तीच्या शिवाय अध्यात्म सांगितले आहे. या सगळ्यातून जो बोध होतो तो म्हणजे धर्माचे क्षेत्र आध्यात्मिक आहे. ज्या वेळी समाजाच्या भौतिक जीवनाचे नियमन करणारी आजच्यासारखी शासन यंत्रणा नव्हती, त्या वेळी धर्माने त्यात दखल देणे हे समजू शकत होते. आता धर्माला पूर्णतः आध्यात्मिक क्षेत्रापुरतेच ठेवायला हवे. सामाजिक, सार्वजनिक जीवनातील बाबी हाताळायला आता संविधान आहे. संविधानाच्या क्षेत्रात धर्माचा हस्तक्षेप होता कामा नये. धर्म नीती शिकवतो. ती शिकावी. मात्र सर्वांना सामावणारी न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि त्याला जोडून परमताचा आदर व सहिष्णुता ही मूल्ये संविधानाने दिलेली आहेत. ती स्वीकारून त्या पलीकडची धर्माची मूल्ये जरूर

समजून घ्यावीत. सर्व धर्मातल्या भारतीय नागरिकांनी ही बाब स्वत:ला पटवली पाहिजे.

## शासनाचा कोणताही धर्म नाही हे दिसले पाहिजे

विठ्ठलाला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मोठे स्थान आहे. आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या लोकांना त्यासाठी शुभेच्छा जरूर द्याव्यात. या उत्सवावेळची पंढरपूरची तसेच त्या आधी वारीने येणाऱ्या लोकांच्या व्यवस्थेसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत. पण विठ्ठल या ईश्वरी शक्तीची शासकीय महापूजा असू नये. राज्याचे मुख्यमंत्री मुख्यमंत्री या शासकीय पदाच्या नात्याने या पूजेस बसतात. ती त्यांची वैयक्तिक पूजा नसते. धर्मनिरपेक्षतेत शासन इहवादी आहे, हे गृहीत आहे.

उद्घाटनाला नारळ वाढवणे, सत्काराला श्रीफळ देणे या रीती हिंदू धर्मातल्या आहेत. बहुसंख्याकांचा धर्म म्हणून त्याच्या रीती याच सार्वजनिक रीती होणे स्वाभाविक आहे, हे समजू शकते. हिंदुत्वाचा पुरस्कार करायचा म्हणून कोणी त्या मुद्दामहून करते आहे, असेही समजायचे कारण नाही. अभावितपणे या बाबी होतात. पण शासनाची धर्मापासूनची तटस्थता व निरपेक्षता दिसण्यासाठी या बाबी जाणीवपूर्वक टाळल्या पाहिजेत. उद्घाटनाला फीत कापता येते. स्वागत, सत्कार करताना पुष्पगुच्छ, शाल, भेटवस्तू देता येतात. शासकीय वास्तूच्या उभारणीवेळी भूमिपूजन असता कामा नये. भूमीचे पूजन हा प्रकार इहवादाला सोडून आहे. शिवाय हे पूजन होते ते मुख्यत: हिंदू पद्धतीने. आपल्याकडे अनेक धर्म आहेत. या प्रत्येक धर्माची काहीतरी पद्धत, विधी असणारच. ते का नाही करायचे? बहुसंख्याकांच्या रीती प्रमाण मानण्याची रीत सोडली पाहिजे. हिंदू हे मुख्य नागरिक आणि इतर धर्मीय दुय्यम ही भावना त्यातून नकळत दृढ होते.

जुन्या वास्तू, स्थळे हा सांस्कृतिक वारसा असतो. त्याच्या रक्षणाचे व संवर्धनाचे काम शासनाचे असते. या वास्तू विशिष्ट धर्माशी संबंधित असू शकतात. या वास्तू देवळे, मशिदी, चर्च, बुद्ध विहार किंवा स्तूप असू शकतात. अशा वेळी त्यांच्या दुरुस्ती, संवर्धनाचे काम हे सेक्युलॅरिझमला सोडून नाही. पण विशिष्ट धर्माच्याच सांस्कृतिक वारशाच्या जतनाला, त्यातही प्रार्थना स्थळांना प्राधान्य देणे होता कामा नये. शासन तांत्रिकदृष्ट्या भले नियमात बसवून हे करत असेल. आपण न्याय होणे केवळ पुरेसे नाही, तो झाला हे दिसले पाहिजे असे म्हणतो. त्याच प्रकारे आपण तटस्थ आहोत, विशिष्ट धर्माची बाजू घेत नाही हे दिसले पाहिजे.



## तीर्थाटनासाठीचे अनुदान व साहाय्य बंद व्हायला हवे

हज यात्रेसाठीचे अनुदान आता बंद झाले आहे. त्याप्रमाणे जे कोणते अनुदान तीर्थाटनासाठी दिले जात असेल ते बंद व्हायला हवे. अनेक राज्ये हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन आदी धर्मांच्या काही पवित्र ठिकाणांना भेटी देण्यासाठी विशेषत: वृद्ध भाविकांना आर्थिक अनुदान तसेच वाहनादी साहाय्य, सवलत देतात. केजरीवालांनीही अलीकडे दिल्लीत ही योजना सुरु केली. वृद्धांना पेन्शन, आरोग्य विमा, वृद्धाश्रम, मनोरंजनाची केंद्रे यांची व्यवस्था उत्तमात उत्तम करावी. पण धार्मिक क्षेत्रांना भेटी ही त्यांची खासगी बाबच राहिली पाहिजे. सरकारने तत्त्व म्हणून आणि खर्चाचा प्राधान्यक्रम म्हणूनही तीर्थाटनासाठीच्या अनुदानात पडता कामा नये. तीर्थक्षेत्री वृद्धांची नीट व्यवस्था व्हावी, यासाठी सवलतीत अथवा मोफत चांगल्या दर्जाच्या धर्मशाळा जरूर बांधाव्यात.

## राजकीय पक्षाला धर्म असू नये

हिंदू धर्माचा हितकर्ता म्हणवणाऱ्या भाजपचे सदस्य होताना सेक्युलॅरिझम तसेच हा देश कोणत्याही एका धर्मावर चालणार नाही, यावर माझा विश्वास आहे, असे लिहून घेतले जाते. मात्र अकाली दलाच्या घटनेतच सदस्य शीख धर्माचा असायला हवा ही अट आहे. शिवसेना स्वत:ला हिंदूंचा पक्ष म्हणविते. अशा रीतीची मुभा पक्षाला असता कामा नये. पक्ष सेक्युलरच असायला हवा. त्याने धर्माचे प्रवक्तेपण केले तर त्याची मान्यता जायला हवी.

## सरकारी कार्यालयांच्या आवारात प्रार्थनास्थळे नको

अनेक सरकारी कार्यालये, पोलीस ठाणी यांच्या आवारात देवळे असतात. ती या कर्मचाऱ्यांनीच वर्गणी काढून बांधलेली असतात. ती बांधली की मग तिथे पूजा, आरत्या, सत्यनारायण, प्रसाद, त्यासाठीच्या वर्गण्या सुरू होते. सरकारी आवारात अशी धार्मिक स्थळे उभारली जाऊ नयेत.

## धर्मनिरपेक्षतेची अधिकृत व्याख्या व तपशील ठराव

संविधानात धर्मनिरक्षेता आहे, याबद्दल कोणतीही शंका नाही हे आपण विस्तृतपणे वर पाहिले आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय, याच्या व्याख्या न्यायालयांच्या निकालपत्रात, काही कमिट्यांच्या अहवालात केलेल्याही आपण वाचल्या आहेत. मात्र, संविधानात किंवा सरकारकडून धर्मनिरपेक्षतेची व्याख्या आणि तिचे विविध पैलू नोंदवलेले नाहीत. ती जर स्पष्टता झाली, तर सरकारी पदावरील व्यक्तीने धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हायचे का, सरकारी इमारतींच्या

आवारात देऊळ उभारायचे यासारखे तुलनेने छोटे प्रश्नही सुटतील. त्याबद्दल संदिग्धता राहणार नाही. या व्याख्येबरोबरच धर्मनिरपेक्षता आयोग स्थापन करावा, अशीही मागणी जाणते करतात. असा आयोग झाल्यास देशात धर्मनिरपेक्षतेचा अंमल नीट होतो आहे की नाही, यावर तो देखरेख करेल. जिथे संदिग्धता राहील तिथे स्पष्टता करेल. धर्मनिरपेक्षता परिणामकारकतेने अमलात येण्यासाठी शिफारशी करेल.

## सामाजिक सलोखा समिती

मोहल्ला कमिट्या म्हणा, शांतता कमिट्या म्हणा सामाजिक सलोख्यासाठी सर्वधर्मीय समित्या स्थानिक पातळीवर लोकांच्या पाठिंब्याने तयार व्हायला हव्या. सरकारी आदेश म्हणून अशा कमिट्या झाल्या तर स्थानिक पातळीवर विविध धर्मीय टगे त्यात पुढाकार घेतात, हे लक्षात येते. मग त्यांची परिणामकारकता कमी होते.

## सामाजिक सलोखा समितीचा उद्देश व काम काय?

लोकांच्या मनात दुसऱ्या धर्माबद्दलचे, जातीबद्दलचे खरेखोटे ग्रह असतात. त्यामुळे अफवा वेगात पसरतात. हिंसा भडकली तर सत्प्रवृत्त लोक तटस्थ राहतात. ही तटस्थता गेली पाहिजे. काहीही ग्रह किंवा मत भिन्न धर्मीय-जातीय लोकांविषयी असले तरी हिंसा होता कामा नये, प्रश्न चर्चेने किंवा कायद्याने सुटला पाहिजे. हा आग्रह या समितीचा असावा. अनिष्ट काही होणार असले तर त्याची चाहूल स्थानिक ठिकाणी आधी लागते. अशा बाबी न लपवता, त्यांकडे दुर्लक्ष न करता पोलिसांच्या निदर्शनास आणायला हव्या. त्यामुळे पुढील आपत्ती टळू शकते. आम्ही धर्म, जात व लिंग यांवरून होणाऱ्या हिंसेच्या ठाम विरोधात आहोत, हे सामाजिक सलोखा समितीने व्यवहारातून दाखवून दिले पाहिजे. शाळा, कॉलेज, वस्तीतील तरुण, महिला मंडळे यांच्या साहाय्याने हिंसाविरोधी शपथांचे कार्यक्रम संघटित करायला हवे. समोरच्याबद्दल मत कितीही कलुषित असले तरी बहुसंख्य समाज हिंसेच्या बाजूने नसतो. बहुसंख्य समाजातील हा हिंसाविरोधी सद्भाव जागवणे व क्रियाशील करणे हे सामाजिक सलोखा समितीचे काम आहे.

## सोसायट्यांनी पाळायचे पथ्य

२६ जानेवारीला इमारतीच्या आवारात ध्वजारोहणाबरोबरच सत्यनारायण ठेवायची प्रथा बऱ्याच ठिकाणी सुरू झाली आहे. सत्यनारायण योग्य की अयोग्य हा प्रश्न निराळा. पण राष्ट्रीय सण हे सगळ्या धर्मीयांचे असतात. अशा वेळी एका धर्माचा विधी टाळायला हवा. सोसायटीच्या तर्फे व खर्चाने गणपती बसतात. हेही



टाळायला हवे. अनेक धर्मीय लोक सोसायटीत असतात. त्या प्रत्येकाच्या धर्माचे सण काही आपण सोसायटीतर्फे साजरे करत नाही. बहुसंख्य आहोत म्हणून हिंदूंनी नकळत किंवा कळत आपले सण सोसायटीतर्फे दामटून करणे अयोग्य आहे. अशा वेळी गणपतीसाठी वेगळी स्वेच्छेने येणाऱ्या लोकांची कमिटी करावी. तिने लोकांकडून वर्गणी नव्हे, देणग्या घ्याव्यात. उत्सवाचे निमंत्रण सगळ्यांना द्यावे. अशा वेळी बिगर हिंदूही देणगी देतात, उत्साहाने सहभागी होतात, असे दिसते.

## व्यक्तीच्या सेक्युलर कृतींचा आदर व साहाय्य

आपल्या घटनेने धर्माला मानण्याचे तसेच न मानण्याचेही स्वातंत्र्य दिले आहे. ज्या व्यक्ती निधर्मी होऊ इच्छित असतील त्यांच्या निर्णयाचा समाजाने, शासनाने आदर केला पाहिजे. त्यांना साहाय्य केले पाहिजे. तामिळनाडूच्या एका महिलेने तामिळनाडू सरकारकडून निधर्मी असल्याचे प्रमाणपत्र मिळवले. गुजरातमधील एक महिला असाच संघर्ष करत आहे. राज्याने सहकार्य केले नाही, म्हणून ती न्यायालयात गेली आहे. जात, धर्म, आडनाव नाकारणाऱ्या व्यक्तींना नोकरशाहीच्या पारंपरिक मानसिकतेची अडचण येणार नाही, याचा सरकारने प्रयत्न करायला हवा. मिश्रविवाह तसेच विशेष विवाह कायद्याखाली लग्न करणाऱ्या जोडप्यांचा सत्कार करायला हवा. विशेष विवाह कायद्याखाली लग्न करण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन द्यायला हवे.

## मुस्लीम द्वेषापासून मुक्ती

हिंदू-मुस्लीम तणाव, दंगली ही नवी गोष्ट नव्हे. मात्र देशातला मुख्य प्रवाह याच्या विरोधात होता. आपापल्या परीने सामंजस्याचे प्रयत्न होत असत. हिंदू-मुस्लीम भाईचारा हा तर हिंदी सिनेमांतील एक प्रमुख विषय असे. आता हे वेगाने बदलले आहे. आमच्या एका मित्राच्या लहान मुलाने मॉलमधील एका दाढी व टोपी असलेल्या माणसाकडे बोट दाखवले आणि तो म्हणाला- ‘बाबा, तो पहा वाईट मनुष्य.’ घरात मुस्लीम द्वेषाचे कोणतेही वातावरण नसताना या मुलाच्या मनात मुस्लीम हा वाईट ही प्रतिमा कशी तयार झाली, हा प्रश्न आमच्या या मित्राला पडला. भले घरात नसेल, पण शाळा, शेजार, खेळाचे मैदान अशा भोवतालातून हा विषाणू आला असणार. सोसायट्यांमध्ये मुस्लिमांना घर भाड्याने किंवा विकत दिले जात नाही. अलीकडे तर थेट सांगतात – मुस्लीम चालणार नाही. आंतरजातीय लग्नाला तयार असणारेही स्पष्टपणे हे दोन लोक नको असे सांगतात – मुस्लीम आणि जय भीमवाले. अशा अवमानाचा आणि वगळले जाण्याचा

मुस्लिमांवर, विशेषत: त्यातील मुलांवर खूप वाईट परिणाम होतो. हा देश आमचा नाही, ही भावना त्यांच्यात बळावते. या भावनेचा फायदा मग देशाचे शत्रू घेतात.

विविध आरोपांखाली मुस्लीमांना पकडणे आणि विनाजामीन तुरुंगात वर्षानुवर्षे खितपत ठेवणे पोलिसांकडून सुरू असते. एकूण सरकारी नोकऱ्यांत मुस्लीम नाममात्र. पोलीस खात्यात तर आणखी कमी. जे होते तेही दरवर्षी कमी होत आहेत. वास्तविक, काही तज्ज्ञांनी पोलीस आणि सुरक्षा दलांतली मुस्लीमांची संख्या दरवर्षी जाहीर करा, अशी मागणी केली आहे. मुस्लिमांच्या वस्त्यांत नागरी सुविधा पोहोचवण्यात प्रशासनातले लोक दुजाभाव करतात, हे अनेक अभ्यास अहवालांत आले आहे. आपण हिंदूबहुल आणि मुस्लीमबहुल वस्त्यांत फेरफटका मारला तरी हे उघड दिसते. लोकप्रतिनिधींच्यातली मुस्लीमांची संख्या कमी होते आहे. निर्णय प्रक्रियेतला मुस्लिमांचा हिस्साच जर नगण्य होत गेला तर लोकशाही तेवढी कमजोर झाली समजायचे. फाळणी आधी मनात होते, नंतर प्रत्यक्षात. ही फाळणी प्रत्यक्षात यायची व्यवहारातील शक्यता नाही. याचा अर्थ ती प्रत्येक शहरात, वस्तीत होईल. ...आणि ते सर्वनाशी अराजकाला निमंत्रण ठरेल.

सेक्युलॅरिझम हे केवळ तत्त्व नाही. तो आपल्या देशाचा, पर्यायाने आपल्या वैयक्तिक अस्तित्वाचा मूलाधार आहे. तो प्राणपणाने जपूया.

---

**संदर्भ व तपशिलांसाठीचा आधार**

या लिखाणासाठी काही संदर्भ व तपशिलासाठी ज्या साहित्याचा मला उपयोग झाला, त्यातील प्रमुख साहित्य : भारताची धर्मनिरपेक्षता: धोक्याच्या वळणावर– माधव गोडबोले (अनु. सुजाता गोडबोले), अक्कमहादेवी – निशा शिरुरकर, भारतीय विवाह संस्थेचा इतिहास – वि. का. राजवाडे ही पुस्तके. याचबरोबर रामचंद्र गुहा, रोमिला थापर, अमर्त्य सेन यांचे लेख, 'भारत एक खोज' दूरदर्शन मालिका, अन्य ऑनलाइन साहित्य व माझे काही जुने लिखाण.

---

लेखकाशी संपर्क : मो. क्र. ९८९२८६५९३७

ईमेल आयडी - sawant.suresh@gmail.com

■



दादा पुरव रिसर्च
ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट
: तर्फे प्रकाशित